७० वर्ष

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

गुरुवार, दि. ०५ मार्च २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०६९ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


## टी-२० वर्ल्डकपला ५० कोटींहून अधिक लोकांनी पाहिले

पुणे (दै. संध्या) : भारत आणि श्रीलंकेच्या यजमानपदी खेळल्या जात असलेल्या टी-20 विश्वचषकाला विविध माध्यमांतून 50 कोटी लोकांनी पाहिले आहे. ही माहिती आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे (ICC) अध्यक्ष जय शहा यांनी बुधवारी दिली. त्यांनी सांगितले की, ही संख्या कोणत्याही विश्वचषकापेक्षा जास्त आहे, तर अजून उपांत्य आणि अंतिम फेरीचे सामने बाकी आहेत. जय शहा यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर आनंद व्यक्त करत सांगितले की, स्पर्धेला जागतिक आणि सुलभ बनवण्याचे उद्दिष्ट पूर्ण होताना दिसत आहे. त्यांनी लिहिले, 'मला हे सांगताना अभिमान वाटतो की भारतात या कार्यक्रमाची दर्शकसंख्या 50 कोटींच्या पुढे गेली आहे. जिओ-हॉटस्टारवर थेट प्रक्षेपणादरम्यान एकाच वेळी सर्वाधिक 6.05 कोटी प्रेक्षक एकाच वेळी सामना पाहत होते.' शहा यांनी आशा व्यक्त केली की, आज रात्रीपासून सुरू होणाऱ्या नॉकआउट सामन्यांमध्ये हा विक्रम आणखी पुढे जाईल. यावेळची आकडेवारी गेल्या वर्षी अमेरिका आणि वेस्ट इंडिजमध्ये झालेल्या 2024 टी-20 विश्वचषकापेक्षा खूप जास्त आहे.

### ढिंग-टांग




### ब्रेकिंग न्यूज

#### सोने ६१४९ रूपयांची स्वस्त

मुंबई (दै. संध्या) : 4 मार्च रोजी सोने आणि चांदीच्या दरात घसरण झाली आहे. इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशननुसार, 10 ग्रॅम 24 कॅरेट सोन्याचा भाव 6,149 रुपयांनी घसरून ₹1.61 लाखांवर आला आहे. यापूर्वी सोमवारी त्याची किंमत प्रति 10 ग्रॅम 1.67 लाख रुपये होती. तर, एक किलो चांदी 23,417 रुपयांनी घसरून ₹2.66 लाखांवर आली आहे. यापूर्वी सोमवारी त्याची किंमत प्रति किलो 2.89 लाख रुपये होती. सोने-चांदीच्या दरातील ही घसरण प्रॉफिट बुकिंगमुळे झाली आहे. मंगळवारी होळीच्या सणामुळे बाजार बंद होता.

#### विलीनीकरणाचा विषय संपला

मुंबई (दै. संध्या) : राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाबद्दल ठाकरेंशी काहीही चर्चा झाली नाही. पण आता हा विलीनीकरणाचा विषयच नाही, कारण ज्यांच्याशी चर्चा केली ते आज दुर्दैवाने आपल्यात नाहीत त्यामुळे आता तो प्रश्नच नाही, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांनी म्हटले आहे. उद्धव ठाकरे गटाकडून आमच्या कुठल्या नावाला विरोध झाला असे काही नाही. प्रत्येक पक्षाला आपल्या विद्यमान उमेदवारासाठी जागा मिळावी असे वाटत असते. जयंत पाटील म्हणाले की, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाची चर्चा अजित पवार यांच्या निधनामुळे पूर्णपणे थांबलेली आहे. आता ही चर्चा पुढे जाणे शक्य नाही आणि आम्ही कुणासोबत चर्चाही करत नाही. त्यामुळे दोन्ही बाजूच्या भावना काय आहे हे समजून घेणाराच आता नसल्याने विलीनीकरणाची चर्चा पूर्णपणे थांबली असून यापुढे ही शक्यता नाही. विलीनीकरणाची चर्चा अजित पवार यांच्या आग्रहाने सुरू झाली होती ती पूर्ण होऊ शकली नाही. आता हा प्रश्न बाजूला गेलेला आहे. आमच्यावर दोन्हीही पक्षाला शंका असण्याचे कारण नाही. जयंत पाटील म्हणाले की, काल मी आणि सुप्रिया सुळे यांनी उद्धव ठाकरेंची भेट घेतली. शरद पवार यांनी दिल्लीत असणे गरजेचे आहे, त्यासाठी त्यांची राज्यसभेसाठी निवड करण्यात यावी अशी आमची इच्छा आहे ती उद्धव ठाकरेंच्या कानावर घातली.

# उदंचन जलविद्युत प्रकल्प उभारणीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार

मुंबई (दै. संध्या)



पुणे व रायगड जिल्ह्यांत २१०० मेगावॅट क्षमतेचा पिंपळपाडा-सावळे उदंचन जलविद्युत प्रकल्प विकसित करण्यासाठी चॅम्बेरी पॉवर (ईडीएफ सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड यांची समूह कंपनी) यांच्यासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. विधान भवन येथे यावेळी आयोजित या कार्यक्रमास जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा (विदर्भ, तापी,कोकण पाटबंधारे विकास महामंडळ) व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी (महाजनको)चे व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी., ईडीएफ सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुरिएक सर्वन तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राज्य शासनाच्या सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) धोरणानुसार २१०० मेगावॅट क्षमतेचा उदंचन जलविद्युत प्रकल्प उभारण्यासाठी हा करार करण्यात आला आहे. ऊर्जा साठवण आणि स्थिर वीजपुरवठा सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. चॅम्बेरी पॉवर प्रायव्हेट लिमिटेडमार्फत पिंपळपाडा-सावळे उदंचन जलविद्युत प्रकल्प पुणे व रायगड जिल्ह्यांत विकसित करण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी सुमारे १० हजार २१७ कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित असून अंदाजे २,५०० रोजगार निर्मिती होणार आहे. राज्यात आतापर्यंत एकूण ५५ उदंचन जलविद्युत प्रकल्पांद्वारे ७८,२१५ मेगावॅट वीज निर्मिती अपेक्षित आहे. या माध्यमातून सुमारे ४.१७ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक तर १.२८ लाख मनुष्यबळासाठी रोजगारनिर्मिती होणार आहे. या योजनांनुसार औद्योगिक दराने सुमारे १,७६२.२१ कोटी रुपयांचा महसूल तर प्रतिवर्ष पुनर्भरणातून सुमारे १२८.३२ कोटी रुपयांचा महसूल राज्याला मिळणे अपेक्षित आहे. ऊर्जा क्षेत्रातील ही मोठी गुंतवणूक राज्याच्या औद्योगिक विकासाला चालना देणारी ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## विनोद तावडे, रामदास आठवले, रामराव वडकुते, माया इवनाते यांना उमेदवारी

मुंबई (दै. संध्या)



राज्यसभेसाठी भाजपने आज उमेदवार यादी जाहीर केली. महाराष्ट्रातून विनोद तावडे, रामदास आठवले, रामराव वडकुते आणि माया इवनाते यांना उमेदवारी देण्यात आली आहे. महाराष्ट्रातील राज्यसभेच्या 7 जागांसाठी 16 मार्च रोजी मतदान होणार आहे. भाजपचे राष्ट्रीय महासचिव अरुण सिंह यांनी ही यादी जाहीर केली. राज्यसभेसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख 5 मार्च असून, 6 मार्च रोजी अर्जांची छाननी होईल. उमेदवारांना माघार घेण्यासाठी 9 मार्चपर्यंतची मुदत आहे. विनोद तावडे महाराष्ट्र विधान परिषदेत विरोधी पक्षनेतेपद भूषविले आहे. त्यांनी शालेय शिक्षण, उच्च आणि तांत्रिक शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास तसेच मराठी भाषा (भाषा) आणि संस्कृती खात्याचे मंत्रिपदही भूषविले आहे. मात्र, त्यानंतर पुन्हा त्यांना पक्षसंघटनेत काम करण्याची संधी देण्यात आली. सध्या ते भाजपच्या महाराष्ट्र युनिटचे सरचिटणीस आहेत. अखिल भारतीय राष्ट्रीय कार्यकारी परिषदेचे सदस्य आणि 12 व्या आणि 13 व्या लोकसभा निवडणुकीसाठी भाजपच्या समन्वय समितीचेही ते प्रमुख सदस्य होते. आता राज्यसभेची उमेदवारी मिळाल्यामुळे ते पुन्हा एकदा संघटनात्मक कामातून मुख्य प्रवाहात आलेत. रिपाइंचे रामदास आठवले यांना यंदा राज्यसभेची उमेदवारी मिळणार की नाही, याबाबत साशंकता होती. त्यांचा पत्ता कट होणार, अशी शक्यताही वर्तवली जात होती. मात्र, भाजपने आपल्या कोट्यातून सलग तिसऱ्यावेळेस आठवलेंना राज्यसभेची संधी दिलीय. विशेष म्हणजे रामदास आठवले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंगळवार 3 मार्च रोजी भेट घेतली होती. त्यांनी स्वतः एक्सवर पोस्ट करून याबाबत माहिती दिली होती.

## सारंगवाडी तलाव कामात २९ कोटींचा गौण खनिज घोटाळा


मुंबई (दै. संध्या)

■ कंत्राटदाराच्या बिलातून होणार दंडाची वसुली, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंची माहिती

बुलढाणा जिल्ह्यातील सारंगवाडी (ता. मेहकर) साठवण तलावाच्या कामात वॉटरफ्रंट कन्स्ट्रक्शन प्रा. लि. या कंपनीने केलेल्या कोट्यवधींच्या अवैध गौण खनिज उत्खननाचा मुद्दा आज विधानसभेत गाजला. या कंपनीवर आकारण्यात आलेला 29 कोटी 18 लाखांचा दंड कंत्राटदाराच्या शासनाकडे प्रलंबित असलेल्या बिलातून वसूल केला जाईल, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रश्नोत्तराच्या तासाला दिली. आमदार श्वेता महाले यांनी कंत्राटदाराला पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईची आणि कंपनीला काळ्या यादीत टाकण्याची मागणी केली. महाले म्हणाल्या की, चिखली व मेहकर तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला सारंगवाडी प्रकल्प हा त्या भागातील सिंचन वाढविण्यासाठी सुरू करण्यात आला होता. 2009 मध्ये मंजूर झालेल्या या प्रकल्पाचे काम अद्याप पूर्णत्वास गेलेले नाही. मात्र या साठवण तलाव परिसरात संबंधित कंपनीने कोणतीही वैध परवानगी न घेता क्रशर मशीन उभारून मोठ्या प्रमाणात गौणखनिज उत्खनन व वाहतूक केल्याचे शासकीय चौकशीत निष्पन्न झाले असल्याचे त्यांनी सांगितले.

## मविआकडून राज्यसभेसाठी शरद पवार; ५९ वर्षांचा ट्रॅक रेकॉर्ड कायम राहणार?

मुंबई (दै. संध्या)




महाविकास आघाडीकडून राज्यसभा निवडणुकीसाठी शरद पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब झालं आहे. याबद्दलची घोषणा काँग्रेस नेत्यांच्या उपस्थितीत शरद पवार यांच्या कन्या आणि राष्ट्रवादी काँग्रेस शपच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली. यावेळी त्यांनी महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांचे आभार मानले. राज्यसभा निवडणुकीसाठी अर्ज भरण्याचा उद्या शेवटचा दिवस आहे. शरद पवार रिंगणात उतरल्यानं राज्यसभेची निवडणूक बिनविरोध होण्याची दाट शक्यता आहे. राज्यातील राज्यसभेच्या ७ जागा रिक्त होत आहेत. यातील ४ जागा महाविकास आघाडीच्या आहेत. मविआच्या ४ खासदारांचा कार्यकाळ २ एप्रिलला संपणार आहे. एकूण ७ जागांसाठी १६ मार्चला मतदान होईल. महाविकास आघाडीकडे केवळ १ जागा जिंकण्याइतकं संख्याबळ आहे. मविआत शिवसेना उबाठाचे २०, काँग्रेसचे १६ आणि राष्ट्रवादी शपचे १० आमदार आहेत. त्यांची बेरीज ४६ च्या घरात जाते. राज्यसभेची १ जागा जिंकण्यासाठी ३७ मतांची गरज आहे.

काँग्रेस नेत्यांच्या उपस्थितीत खासदार सुप्रिया सुळेंनी शरद पवारांच्या नावाची घोषणा केली. राज्यसभेसाठी शरद पवारांच्या नावाला पाठिंबा दिल्याबद्दल त्यांनी काँग्रेस, शिवसेना उबाठाच्या नेत्यांचे आभार मानले. 'महाविकास आघाडीतील पक्षांची साथ कायम राहणार आहे. आम्ही पूर्ण ताकदीनं एकमेकांना साथ देऊ. काँग्रेस, शिवसेना उबाठाच्या नेत्यांनी मोठं मन दाखवलं, त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे,' असं सुप्रिया सुळे म्हणाल्या. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, वरिष्ठ नेते विजय वडेट्टीवार, बंटी पाटील यावेळी उपस्थित होते. पण शिवसेना उबाठाचा एकही नेता पत्रकार परिषदेला हजर नव्हता. या गैरहजेरीबद्दल सुळे यांना प्रश्न विचारण्यात आला. त्यावर खासदार संजय राऊत आताच शरद पवारांना सिल्व्हर ओकवर येऊन भेटून गेले. त्यांनी तब्येतीची विचारपूस केली. उद्धव ठाकरेंनी उमेदवारीला पाठिंबा दिला. त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे, असं सुळे म्हणाल्या.

## हरकत असेल तर तक्रार करा, पण बाप काढणे योग्य नाही

**विधिमंडळाच्या पोर्चमध्ये आमदार जाधव-कल्याणशेट्टींमध्ये शब्दयुद्ध**

मुंबई (दै. संध्या)



मुंबईत सुरू असलेल्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राजकीय वातावरण आधीच तापलेले असताना मंगळवारी आणखी एक नवा वाद समोर आला. आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि आमदार भास्कर जाधव यांच्यात विधिमंडळ परिसरातच जोरदार शाब्दिक चकमक झाली. विधानसभा इमारतीच्या पोर्चमध्ये दोन्ही आमदार आमनेसामने आल्याने काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. तुम्ही बाप का काढला? या प्रश्नावरून हा वाद चांगलाच रंगला. उपस्थित आमदार, कर्मचारी आणि कार्यकर्त्यांसमोर झालेल्या या बाचाबाचीमुळे अधिवेशनाच्या चर्चांना वेगळे वळण मिळाले. सध्या सुरू असलेले बजेट सेशन विविध मुद्द्यांमुळे वादग्रस्त ठरत आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातासंदर्भातील संशय, तसेच इतर राजकीय घडामोडींमुळे सभागृहात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. त्यातच हा नवा वाद उफाळून आला. माहितीप्रमाणे, विधानसभा आमदार राहुल आवाडे यांची मुलगी सानिका आणि राजेंद्र पाटील यड्रावकर यांचे चिरंजीव अजय यांच्या विवाहसोहळ्याची पत्रिका आमदारांच्या खासगी सहाय्यकांकडून विधिमंडळ परिसरात वाटली जात होती. एकाच ठिकाणी सर्व सदस्य उपस्थित असल्याने सोयीसाठी हे वाटप सुरू होते.

याच पत्रिका वाटपावरून नाराजी व्यक्त करताना भास्कर जाधव यांनी तीव्र शब्दांत टीका केल्याचे सांगितले जाते. विधिमंडळ आवारात अशा प्रकारे पत्रिका वाटणे योग्य नसल्याची भूमिका त्यांनी मांडली. या चर्चेदरम्यान जाधव यांच्या बोलण्यात सरकारचा बाप, असा उल्लेख झाल्याचा आरोप सचिन कल्याणशेट्टी यांनी केला. हा शब्दप्रयोग ऐकताच कल्याणशेट्टी संतापले आणि त्यांनी जाधवांना थेट जाब विचारला. तुम्ही बाप काढलाय, तुम्हाला तो अधिकार आहे का? तुम्ही ज्येष्ठ सदस्य आहात. तुम्ही बाप काढला तर मीही काढेल, असे त्यांनी स्पष्ट शब्दांत म्हटल्याची माहिती समोर आली आहे.

या प्रश्नावर भास्कर जाधव यांनीही तितक्याच ठामपणे उत्तर दिले. तुम्हाला माझा बाप काढायचा असेल तर काढा, असे प्रत्युत्तर त्यांनी दिल्याचे सांगितले जाते. दोन्ही आमदारांमधील ही शाब्दिक देवाणघेवाण काही काळ सुरू राहिली. परिसरात उपस्थित असलेल्या सदस्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी परिस्थिती शांत करण्याचा प्रयत्न केला. या घटनेमुळे विधिमंडळाच्या पोर्चमध्ये काही वेळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

## रामदासांचा दासबोधच स्वतंत्र ग्रंथ

### गोविंददेव गिरींचे वादग्रस्त वक्तव्य

मुंबई (दै. संध्या)

पुण्यात झालेल्या एका राष्ट्रीय चर्चासत्रात केलेल्या वक्तव्यामुळे स्वामी गोविंददेव गिरी महाराज पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आयोजित 'ज्ञानोबा ते तुकोबा' या तीन दिवसीय कार्यक्रमात बीजभाषण करताना स्वामी गोविंददेवगिरी महाराज यांनी संतपरंपरेबाबत केलेली मांडणी वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार संतपरंपरेत दासबोध हाच एकमेव स्वतंत्र ग्रंथ आहे; तर ज्ञानेश्वरी आणि एकनाथी भागवत ही भाष्ये आहेत. तसेच तुकाराम गाथा आणि नामदेव महाराजांच्या गाथा या संकलन स्वरूपातील असल्याने त्यांना स्वतंत्र ग्रंथ म्हणता येणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. गोविंददेव गिरी महाराज यांच्या या



विधानानंतर वारकरी समाजात तीव्र नाराजी पसरली आहे. वारकरी परंपरा ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील समता, बंधुता आणि भक्तीभावाची मूळाधार मानली जाते. संत ज्ञानेश्वर माऊली, संत एकनाथ आणि संत तुकाराम यांच्या कार्यातून महाराष्ट्र धर्माची वीण घट्ट विणली गेली. ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासी कळस, ही परंपरेची शिकवण आजही भाविकांच्या ओठांवर आहे.

## श्री क्षेत्र तुळजाभवानी मंदिर विकासकामे भव्य, दिव्य आणि दर्जेदार व्हावीत - पालकमंत्री प्रताप सरनाईक

मुंबई (दै. संध्या)



मराठवाड्याच्या श्रद्धास्थानाचा मुकुटमणी असलेल्या श्री क्षेत्र तुळजाभवानी देवी मंदिराच्या विकासकामांना भव्यतेची आणि दिव्यतेची नवी उंची देण्याचा निर्धार व्यक्त करत महाराष्ट्राचे परिवहन मंत्री तथा धाराशिवचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी मंत्रालयात संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसोबत महत्त्वपूर्ण आढावा बैठक घेतली.

कोट्यवधी भाविकांच्या अखंड श्रद्धेचे केंद्र असलेल्या या तीर्थक्षेत्राचा विकास केवळ आजचाच नव्हे, तर पुढील शंभर वर्षांचा विचार करून दूरदृष्टीने आणि उत्कृष्ट दर्जाने व्हावा, अशा स्पष्ट सूचना मंत्री सरनाईक यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

बैठकीत तुळजापूर येथील श्री क्षेत्र तुळजाभवानी देवी मंदिर विकास आराखड्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला. भाविकांच्या सोयी-सुविधा वाढविण्यासाठी हुडको पार्किंग परिसरात उभारण्यात येणाऱ्या भाविक सुविधा केंद्र, आधुनिक भक्तनिवास, व्यावसायिक संकुल, बहुउद्देशीय सभागृह आणि विस्तीर्ण वाहनतळ अशा विविध प्रकल्पांचा समावेश असलेल्या सुमारे ५८२.१७ कोटी रुपयांच्या महत्त्वाकांक्षी विकास आराखड्याची माहिती अधिकाऱ्यांनी सादर केली. यासोबतच या कामासाठी आवश्यक असलेल्या भूसंपादन आणि निविदा प्रक्रियेच्या प्रगतीचा देखील आढावा घेण्यात आला.

यावेळी बोलताना मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, श्री क्षेत्र तुळजाभवानी मंदिराचा विकास हा केवळ पायाभूत सुविधांचा प्रकल्प नसून तो महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक अस्मितेशी जोडलेला आहे. त्यामुळे या प्रकल्पात गुणवत्तेत कोणतीही तडजोड होऊ नये, यासाठी प्रशासनाने विशेष दक्षता घ्यावी. अयोध्येतील श्रीराम मंदिराच्या निर्मितीचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून तुळजाभवानी मंदिर परिसराचा विकास भव्य, आकर्षक आणि शाश्वत पद्धतीने करावा. देशातील नामांकित विकासक आणि तज्ज्ञ संस्थांचा सहभाग घेऊन या प्रकल्पाला राष्ट्रीय दर्जा प्राप्त करून देण्याचेही निर्देश त्यांनी दिले.

"तुळजाभवानी मातेला दरवर्षी लाखो भाविक दर्शनासाठी येतात. त्यामुळे भाविकांना अधिक सुटसुटीत, सुरक्षित आणि सुसज्ज सुविधा उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. योग्य नियोजन, काटेकोर अंमलबजावणी आणि उच्च दर्जाची कामे यामुळेच या तीर्थक्षेत्राचा सर्वांगीण विकास साध्य होईल," असेही मंत्री सरनाईक यांनी नमूद केले.

या बैठकीत धाराशिव जिल्ह्यात सुरू असलेल्या इतर महत्त्वाच्या विकासकामांचाही सखोल आढावा घेण्यात आला. धाराशिव येथे उभारण्यात येणाऱ्या ५०० खाटांच्या आधुनिक जिल्हा रुग्णालयाच्या बांधकामाची प्रगती, धाराशिव व परंडा येथील न्यायालयीन इमारतीचे बांधकाम, तुळजापूर येथील व्हीव्हीआयपी विश्रामगृह तसेच विविध रस्ते विकास प्रकल्पांची स्थिती यावर चर्चा झाली. नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी सर्व प्रकल्प नियोजित वेळेत आणि उच्च दर्जाने पूर्ण करण्याचे निर्देश मंत्री सरनाईक यांनी अधिकाऱ्यांना दिले.

बैठकीस धाराशिव जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

श्रद्धा, विकास आणि सुशासन यांचा सुंदर संगम घडवून श्री क्षेत्र तुळजाभवानी मंदिर परिसराला नवे वैभव प्राप्त करून देण्याचा निर्धार यावेळी मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.

## संपादकीय

# ‘किवीं’चा ओढा ‘कांगारु’कडे!

जेसिंडा अर्डेन आठवतात? २०१७मध्ये वयाच्या ३७व्या वर्षी त्या, किवींसाठी प्रसिद्ध असलेल्या न्यूझीलंडच्या पंतप्रधान झाल्या. जगातील प्रमुख सत्ता उजवीकडे झुकत असताना त्या अनेक कठीण प्रसंगांत डावी आणि उदारमतवादी भूमिका घेऊन ठामपणे उभ्या राहिल्या. ख्राइस्टचर्च येथील एका मशिदीवर एका माथेफिरूने केलेल्या गोळीबाराच्या प्रसंगी त्यांनी घेतलेली भूमिका किंवा करोना साथरोगात त्यांनी घेतलेले निर्णय यांमुळे त्या काही काळ जगात चर्चेत राहिल्या. पदावर असतानाच त्या प्रसूतही झाल्या होत्या. करोनाकाळात उतरणीला लागलेली न्यूझीलंडची अर्थव्यवस्था पूर्वपदावर आणण्यात अर्डेन अयशस्वी ठरल्याने त्यांच्या विरोधात असंतोष वाढीला लागला. त्यांच्या विरोधात आंदोलनेही झाली. अखेर २०२३मध्ये त्यांनी पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर हार्वर्ड विद्यापीठाची शिष्यवृत्ती घेऊन त्यांनी एका प्रकल्पावर काम केले. गेल्याच वर्षी त्यांचे आत्मचरित्रही प्रसिद्ध झाले. अर्डेन पुन्हा चर्चेत आल्या आहेत, ते कांगारूंसाठी प्रसिद्ध असलेल्या ऑस्ट्रेलियात त्या स्थायिक झाल्याच्या बातमीमुळे. पती क्लार्क गेफोर्ड आणि सात वर्षांची कन्या नीव यांच्यासह त्या सिडनीत स्थलांतरित झाल्या आहेत. मात्र, न्यूझीलंडमधून ऑस्ट्रेलियात स्थलांतरित होणाऱ्या अर्डेन या एकट्या नाहीत. गेल्या ऑक्टोबरपर्यंत न्यूझीलंडच्या राजधानीचे शहर असलेल्या वेलिंग्टनच्या महापौर असलेल्या टोरी व्हनाऊ यांनीही ऑस्ट्रेलियात स्थलांतर केले आहे. महापौरपदाची कारकीर्द संपल्यानंतर ४२ वर्षांच्या व्हनाऊ यांना काम मिळणे अवघड झाले होते. त्यामुळे कामाच्या शोधार्थ त्यांना देश सोडून बाहेर जावे लागले. माजी पंतप्रधान, माजी महापौर यांच्यावर अशी वेळ आली असेल, तर इतरांची स्थिती काय असेल? अर्डेन, व्हनाऊ यांच्याप्रमाणेच गेल्या वर्षी तब्बल ७१ हजार न्यूझीलंडवासीयांनी रोजगाराच्या किंवा नव्या संधींसाठी देश सोडला आहे. या चिमुकल्या देशाची एकूण लोकसंख्या (सुमारे ५१ लाख) पाहता ७१ हजार हा आकडा मोठाच म्हणायला हवा. त्यांपैकी सुमारे साठ टक्के लोक शेजारच्या ऑस्ट्रेलियात गेले आहेत. पण, मुळात न्यूझीलंडमधून बाहेर पडण्याची वेळ त्यांच्यावर का आली आहे? या प्रश्नाचे उत्तर दडले आहे, ते न्यूझीलंडच्या मंदावलेल्या अर्थव्यवस्थेत. करोनामुळे तेथील अर्थव्यवस्थेवर झालेले परिणाम अद्याप दूर झालेले नाहीत. न्यूझीलंडची अर्थव्यवस्था सुमारे २६० अब्ज डॉलर असून, २०२५मध्ये त्यात जेमतेम एक टक्का वाढ झाली. त्याच्या आधीच्या दोन-तीन वर्षांतील स्थिती याहून अधिक वाईट होती. या मंदीसदृश स्थितीमुळे तिथे रोजगार कमी होत गेले. सध्या तेथील बेरोजगारीचा दर ५.३ टक्के आहे. महागाई निर्देशांक १२.५ टक्क्यांपर्यंत वाढत गेला आणि अनेकांना रोजचा खर्च भागविण्यात अडचणी येत गेल्या. हा निर्देशांक आता खाली आला असला, तरी मधल्या काळात तेथील लोक बाहेर संधी शोधू लागले. नवीन रोजगार, आकर्षक करिअर, उत्तम वेतन यांसाठी ऑस्ट्रेलिया हा चांगला देश असल्याचे तेथील बहुतेकांना वाटते. स्थलांतरितांमध्ये सर्व वयोगटांतील लोकांचा समावेश असला, तरी विशीतील आणि तिशीतील तरुणांची संख्या लक्षणीय आहे. कौशल्ये असलेले तरुण बाहेर पडत असल्याने आणखी विपरीत परिणाम होऊ शकतो, याची कल्पना न्यूझीलंडमधील सरकारला आहे. म्हणूनच स्थलांतर रोखण्यासाठी पावले उचलली जात आहेत. देशाचे भवितव्य असलेले तरुणच परदेशी जात असल्याची चिंता वाटत असल्याचे तेथील अर्थमंत्री निकोला विलिस यांनी म्हटले आहे. प्रज्ञावान आणि कुशल तरुणांना देशातच संधी निर्माण करण्यासाठी योजना आखण्यात आली आहे. मात्र, परिस्थितीत म्हणावी तशी सुधारणा झालेली नाही. दरम्यान, माजी पंतप्रधान अर्डेन या ऑस्ट्रेलियात गेल्याबद्दल काहींनी त्यांना लक्ष्य केले आहे. मात्र, चांगल्या संधींसाठी इतर लोक बाहेर जात असतील, तर अर्डेननी का जाऊ नये, असा सवालही केला जात असून, तो रास्तही आहे; नाही का?

## संस्कृत सुभाषित

अनिर्वेदेन दीर्घेण निश्चयेन ध्रुवेण च
देवदेवप्रसादाच्च क्षिप्रं फलम्वाप्यते ।।
(शांतीपर्व, अध्याय १५३, ११७, महाभारत)
– अर्थ दीर्घोद्योगाने, दृढनिश्चयाने व ईश्वरी कृपेने सत्वर कार्यसिद्धी होते.

## गुरु वचन

### राजाचे अहोभाग्य

पुरातनकाळातील गोष्ट आहे. एक परमतपस्वी साधूसंत होते. ते जंगलामध्ये परमेश्वराचे भजन आणि साधनामध्ये तल्लीन राहत असायचे. एका दिवशी त्यांनी जास्तीचे अन्न गोळा करायचे नाही, असा निश्चय केला होता. पाहुण्यांनाही आपल्या भिक्षेतील अर्धे अन्न देऊन परमसुखाचा अनुभव घेत होते. एका दिवशी ते राजाजवळ गेले आणि म्हणाले की, या भागात दुष्काळ पडला आहे. राजधर्मानुसार हे लक्षात ठेवा की, प्रजेतील एकही व्यक्ती उपासी रहायला नको. राजाने दुष्काळ पीडितांची सेवा करण्याचा दृढ निश्चय केला. जाताजाता राजाने साधूला धन देण्याचा आग्रह केला. तेव्हा ते म्हणाले राजन मला एका वेळेची भिक्षा द्या. मी धन व अन्नाचा संग्रह करत नाही. मी माझ्या झोपडीपट्टीसमोरील उंबराचे फळ खाऊन माझे जीवन व्यतीत करत आहे. राजाने विचार केला की, साधू धन घेण्यास इन्कार करत आहे. राजाने आपल्या मंत्रीला काही उंबराचे फळ आणायला सांगितले. आणि त्यामध्ये सोने, चांदी, हिरे भरुन साधूच्या उंबराच्या झाडाखाली टाकले. साधूने खाण्यासाठी जेव्हा उंबर उचलले आणि तोडून बघितले तर त्यामध्ये सोने आणि हिरे पाहून ते जमीनवरच फेकून दिले. राजाने संध्याकाळी गुप्तमंत्रीला तिथे पाठवले. मंत्र्याला उंबर तिथेच पडलेले दिसले. जेव्हा त्याने राजाला जाऊन सांगितले असता, राजा म्हणाला माझ्या राज्यात असे साधू आहेत. त्यामुळे मी नशीबवान आहे.

## उपदेशकथा

### मीच बोलत होतो

स्वामी विवेकानंदांची ही विद्यार्थी असतानाची कथा. त्यांचे लहानपणीचे नाव होते नरेंद्र. एकदा वर्गामध्ये दोन तासांच्या मधल्या वेळात नरेंद्राने मित्रांना असेच काहीतरी सांगायला सुरुवात केली. पुढच्या तासाच्या शिक्षकांनी दरम्यान फळ्यावर शिकवायला प्रारंभ केला. थोड्या वेळाने त्यांना मुलांच्या कुजबुजण्याचा आणि हसण्याचा आवाज आला. त्यांनी चिडून मागे पाहिले आणि कोण बोलत होते ते कळावे म्हणून सांग मी काय शिकवित होतो ते असे प्रत्येकाला विचारण्यास सुरुवात केली. कोणाचेच लक्ष नसल्याने त्यांना काहीच सांगता येईना. नरेंद्राची पाळी आली तेव्हा त्याने मात्र गुरुजी काय शिकवत होते ते बरोबर सांगितले. कारण एकीकडे तो बोलत असला तरी दुसरीकडे त्याचे लक्ष शिकवण्याकडे नीट होते. पण असे झाले, तरी कोण नेमके बोलत होते ते गुरुजींना समजेना. त्यांनी सांगितले त्यावर गुरुजींचा विश्वास बसणे शक्यच नव्हते, कारण एकट्या नरेंद्रानेच बरोबर उत्तर दिले होते. शिक्षा म्हणून गुरुजींना नरेंद्र सोडून सर्वांना बाकावर उभे राहण्यास फर्मावले, पण सर्वांबरोबर नरेंद्रही उभा राहिला. त्याला खाली बसायला सांगितल्यावर तो गुरुजींना म्हणाला, नाही गुरुजी मी पण बाकावर उभे राहायला हवे, कारण मीच त्यांच्याशी बोलत होतो.

कथा उपदेश : प्रामाणिकपणाचा गुण लहानपणापासून बाळगायला हवा.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | योग:शूल ०७:४५:०७ |
| ५ मार्च २०२६ | करण:गर १७:०३:५६ |
| गुरूवार | करण:वणिज |
| विक्रम संवत्– २०८२ | २९:२४:२५+ |
| फाल्गुन शके | सूर्य:कुम्भ |
| संवत्– १९४७ | चन्द्र:कन्या |
| संवत्सर – विश्वावसूनाम | हिजरी सन् – १४४५ |
| अयन– उत्तरायणारंभ | मुस्लिम मास – रमजान |
| मास– फाल्गुन | तारीख – १५ |
| ऋतु– सौर वसंत | विशेष |
| कृष्ण पक्ष | संत तुकाराम बीज |
| तिथि:द्वितीया १७:०३:५६ | बीजोत्सव – देहू |
| नक्षत्र:उत्तराफाल्गुनी ०८:१७:२४ | जळू (अमरावती) |

## दै. ‘संध्या’ धमाल सूडोकु क्र. ८७७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | | 6 | | | 4 | 7 | | |
| | 5 | 4 | 7 | | | 2 | | 1 |
| 7 | | | 1 | 2 | | | | |
| 3 | | | | 1 | | | | |
| 1 | 9 | 8 | | 6 | | 3 | 7 | 5 |
| | | | | 5 | | | | 4 |
| | | | | 7 | 3 | | | 9 |
| 4 | | 3 | | | 1 | 5 | 2 | |
| | | 1 | 2 | | | 8 | | 7 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८७६ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 5 | 7 | 6 | 3 | 2 | 8 | 9 | 4 |
| 2 | 9 | 6 | 8 | 1 | 4 | 5 | 7 | 3 |
| 4 | 3 | 8 | 7 | 9 | 5 | 1 | 2 | 6 |
| 6 | 1 | 9 | 2 | 8 | 3 | 7 | 4 | 5 |
| 5 | 4 | 2 | 1 | 6 | 7 | 3 | 8 | 9 |
| 8 | 7 | 3 | 5 | 4 | 9 | 6 | 1 | 2 |
| 7 | 2 | 4 | 3 | 5 | 8 | 9 | 6 | 1 |
| 9 | 6 | 5 | 4 | 7 | 1 | 2 | 3 | 8 |
| 3 | 8 | 1 | 9 | 2 | 6 | 4 | 5 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८३६ – मॅक्सिकोचा अलामोवर हल्ला.
- १८५६ – कोवेंट गॉर्डन ओपेरा हाऊस अगीमध्ये भस्म झाला.
- १८९६ – इटलीचे पंतप्रधान क्रीस्पी यांनी राजीनामा दिला.

### राष्ट्रीय

- १९३१ – महात्मा गांधी आणि ब्रीटीश वॉसराय लॉर्ड इरवीन यांनी करारावर स्वाक्षरी केली.
- २००७ – हाँगकाँगमध्ये आयोजित ग्रेटेस्ट रेस ऑन द अर्थ (जीआरओई) च्या अंतिम फेरीत चांगल्या प्रदर्शनाने भारतीय मॅरेथॉन संघ सलग तिसऱ्या वर्षी दक्षिण आशिया चॅंपियनचे अजिंक्यपद कायम ठेवण्यात यशस्वी राहिला.
- २००८ – महाराष्ट्राचे राज्यपाल एस. एम. कृष्णा यांनी महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाचा राजीनामा दिला.
- २००८ – वाराणसीत दोन अज्ञात शस्त्रधाऱ्यांनी समाजवादी पार्टीचे (सपा) नेता मुरारी यादव यांची दिवसाढवळ्या हत्या केली.
- २००८ – ऑलिम्पिक पात्रता स्पर्धेत भारतीय हॉकी संघाने मॅक्सिकोचा १८–१ असा धुव्वा उडविला.

### जन्म

- १३२४ – डेव्हीड दुसरा ब्रुस, स्कॉटलंडचे राजा यांचा जन्म.
- १३२६ – लुईस पहिला, हंगरीचे राजा यांचा जन्म.
- १८२५ – जोसेफ अलबर्ट, जर्मन छायाचित्रकार याचा जन्म.
- १९६३ – इडो ब्रांडीस, झिम्बाब्वेचा क्रिकेटपटू याचा जन्म.

### निधन

- ०२५४ – पोप सेंट लुसीअस पहिला यांचे निधन.
- १६२५ – जेम्स पहिला, इंग्लंडचे राजा यांचे निधन.

## : SMS :

Sweet candies are nice to eat â€¦ Sweet words are easy to say â€¦ but, sweet ppl are hard to find â€¦ OH MY GOD! how did u find me?

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३२ | २१.१ |
| अहमदनगर | ३१.६ | २०.४ |
| अकोला | ३४.९ | २२.२ |
| अमरावती | ३४ | २२.४ |
| बीड | ३५.३ | २२.३ |
| भंडारा | ३३.६ | २०.१ |
| बुलढाणा | २८.७ | १५.७ |
| चंद्रपूर | ३५ | २२.२ |
| चेन्नई | ३३.८ | २०.६ |
| नवी दिल्ली | २९.५ | १७.४ |
| धुळे | ३३.२ | २२.२ |
| गोंदिया | ३२.४ | १९.३ |
| जळगाव | ३५ | २१.८ |
| कोल्हापूर | ३२.९ | १८.३ |
| लातूर | ३२.९ | २१.९ |
| मुंबई | ३१.९ | २४.६ |
| नागपूर | ३३.२ | २०.७ |
| नांदेड | ३४.२ | २२.४ |
| नंदूरबार | ३१.३ | २१.५ |
| नाशिक | ३२.३ | १८.५ |
| पुणे | ३१.४ | १९ |
| पंढरपूर | ३४ | २२.२ |
| सातारा | ३३.४ | १८.१ |
| सांगली | ३४.२ | १९.७ |
| सोलापूर | ३३.६ | २५.२ |
| वर्धा | ३५.४ | २२.२ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग: पिवळा: शुभ दिशा: पूर्व अचानक धन मिळण्याची शक्यता आहे. आपल्या प्रयत्नामुळे वाद संपुष्टात येईल.

**वृषभ :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा:उत्तर मित्र व मुलांच्या सहकार्यामुळे उत्साह वाढेल. व्यवसायिक फायदा होईल. मान सन्मानात वाढ होईल.

**मिथुन :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा: पूर्व राजकीय कामात अडचणी येतील. अधिकारी वर्गाचा विश्वास संपादन करा.

**कर्क :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा:उत्तर महत्वाच्या कामाकडे लक्ष द्या. आपल्या कामाची स्तुती झाल्यामुळे आनंदी रहाल. आत्मविश्वास वाढणार आहे.

**सिंह :** शुभ रंग:हिरवा,शुभ दिशा: पश्चिम मानसिक सुख शांती राहील. भाग्याच्या सहकार्याने आर्थिक परिस्थिती मजबूत होईल.

**कन्या :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा:पश्चिम सामाजिक कार्याची आवड निर्माण होईल. नवीन योजना व्यापारात फायदेशीर राहतील.

**तुळ :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा: पश्चिम काम करण्याच्या पद्धतीत सुधारणा होईल. फायदेशीर व्यवहार राहतील.

**वृश्चिक :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पूर्व आपल्या इच्छा आकांक्षा पूर्ण होण्याचे योग आहेत. प्रतिष्ठीत व्यक्तिशी संबंध वाढतील. मुलांची प्रगती राहील.


**धनु :** जांभळा, शुभ दिशा:पूर्व नौकरीमध्ये इच्छे प्रमाणे बदली किंवा बढती मिळण्याची शक्यता आहे. कौटुंबिक जीवन आनंदी राहील.

**मकर :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पश्चिम नवीन कामाचा प्रारंभ करू नका. व्यावसायिक स्पर्धेमुळे नुकसान होणार आहे.

**कुंभ :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: उत्तर योजलेले काम वेळेत पूर्ण होतील. खर्च वाढणार आहे परंतु त्याच प्रमाणे उत्पन्न राहील. प्रत्येक क्षेत्रात मान सन्मान मिळेल.

**मीन :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पश्चिम कौटुंबिक वातावरण आनंदी राहील, कामामध्ये मन लागणार नाही. स्वाभिमान व अहंकार यामध्ये अंतर राखा.

## ‘दै. संध्या’ जम्बो शब्दकोडे क्र. ८७७



**आडवे शब्द**
१. जमिनीवरचे प्राणी, पशू
४. अग्रलेख
९. पहारा करणारा
१०. प्रचंड, तीव्र
११. नजरेचा तीर
१६. गालबोट
१७. उडाणटप्पूंची चैन
१८. बादशहाचा प्रधान
२०. सबब
२१. नूतन
२२. मृतिका, मृदा
२३. निरर्थक
२४. शृंखला
२६. कर्ण
२८. जास्तीत जास्त
२९. हाताचा तळवा
३२. दिखाऊ, वरपांगी
३४. अवघा, सगळा
३६. गार, थंड
३७. प्रत्येक ठिकाणी, सर्वत्र
३८. वंचित
३९. टक, दृष्टी
४२. दोस्त
४३. अंत:करण
४४. जाणकार
४६. तासाशी गुणोत्तर
४७. अथवा
४८. युवती
५०. जानकी
५१. आजार, रोग
५५. लेंगा
५७. परिस्थिती
५८. अंगठी घालण्याचे बोट
५९. मूळ आधार
६०. आजच्या आधीचा दिवस
६१. गोव्यातील दैवत
६२. हालचालीवरील नजर
६४. गवत, गुरांचे खाद्य
६६. बस्तान
६७. शहर, गाव
६९. स्वच्छ, चकचकीत
७१. श्रीमंत
७२. शत्रूला गाठण्याची चिंचोळी जागा
७३. बासरी
७४. उद्याच्या नंतरचा दिवस
७७. वृक्ष
७८. बघू नये अशी स्वयंपाकाची जागा!
७९. जयाचा नामघोष

**उभे शब्द**
१. ’सिने में –––, आंखो ने तुफान सा क्यों है, इस शहर में हर शख्स परेशानसा क्यों है’
२. पक्के वचन
३. सभ्य माणसांचे ’व्यसन’!
४. संकटाच्या वेळी
५. मोदकाचे आवरण
६. आमंत्रक, कुटुंबोप्रमुख
७. संकटातून निभावणे
८. जवळचा घरातील शत्रू
९. गोव्याची राजधानी
१०. बारीक वाळू
१२. चांगला
१४. योग्य, बरोबर
१५. चोख, निर्भेळ सोने
१७. कण्यातील हाड
१९. पाताळ
२२. आईचा भाऊ
२३. ऐनवेळी कच खाणे
२५. दुष्ट, खल
२७. नुकतेच जन्मलेले
२८. कर देण्यास योग्य
३०. मौल्यवान खडा (हिंदी)
३१. मालवणी गोडी शेव
३३. अंगातील मस्ती, जोश
३५. शाहरुखचे फिल्मी नाव
४०. रम्य, मनोहर
४१. तेंडुलकरांचे वादग्रस्त नाटक ’घाशीराम ––––’
४२. पैजेत पीळ देण्याची–उतरवण्याची
४४. जननी
४५. शाळकरी मुलांना, नोकरदारांना हवाहवासा दिवस
४६. धातूचा धागा
४९. भारतीय चलन
५०. वेस, हद्द
५२. गायींचे पिल्लू
५३. लक्ष्मीवल्लभ
५४. ठेकेदार
५६. निकट
५७. चलनवलन
५८. अगम्य
५९. बाजीप्रभूंनी लढवलेली जागा
६२. पलीकडे
६३. समशेर
६५. रक्षाबंधनाचा धागा
६६. अटीची भाषा
६८. डोंगरी किल्ला
७०. तपश्चर्या, साधना
७३. पाण्याचा प्रवाह
७५. मातीचा कण
७६. इंग्रेजी वर्णमालेतील शेवटून दुसरे अक्षर

### जम्बो शब्दकोडे क्र. ८७६ चे उत्तर

आडवे उत्तर : १.अजगर ३.अढळपद ६.अर्जुन भीम १०.दाम ११.दरवाजा १३.यमन १४.समोरासमोर १७.भार १८.सागवान १९.खाद २०.अनमोल २२.बाजार २३.पंकज २५.रत २७.डहाळी २८.घण २९.रमा ३१.याचना ३२.मान ३४.बजबजपुरी ३६.कसाबसा ३८.मानस ४०.कळस ४१.चव ४२.अवजार ४४.जल ४५.बळकट ४७.वरण ४८.वसाहत ५०.पाहुणचार ५२.कासरा ५४.नवलकोल ५७.रखरखीत ५८.समर ५९.कालवड ६१.कान ६२.रहदारी ६३.तळ ६४.भाववाढ ६६.मध ६७.गर ६९.हेर ७०.मणेर ७२.नवार ७५.हरक ७६.मतदान ७७.साय ७८.रविवार ७९.मदत

उभे उत्तर : १.अवस २.गजरा ३.अमर ४.पदरमोड ५.दर ६.अजागळ ७.नयनबाण ८.भीम ९.मन मारणे १०.दामोदर १२.वासा १५.मोहक १६.सम १७.भान २१.लहानसा २३.पंजाब २४.जरब २६.तयारी २८.घन ३०.माजघर ३२.मासा ३३.मौन ३५.जनावर ३६.कसब ३७.बदक ३८.मावळण ३९.सरदार ४०.कलह ४२.अवतरणे ४३.जाणकार ४४.जसा ४६.टपाल ४८.वरात काढणे ४९.तनमनधन ५१.चाकवत ५३.सखी ५५.वर ५६.कोलाहल ५९.कारीगर ६०.डळमळीत ६४.भारत ६५.वामन ६८.रकम ६९.हेम ७१.रसा ७३.वार ७४.रवि ७५.हर

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## तुला पाहताना...' मनाला भिडणारी प्रेमाची रेशीमधून विणलेली मेलडी सादर

■ मनाच्या तारा छेडणारी धून — 'तुला पाहताना...' ची भावस्पर्शी सफर

■ 'तुला पाहताना...' रौप्यमहोत्सवी सोहळ्याची उत्साहपूर्ण नांदी

पुणे (दैनिक संध्या) : गायक व संगीतकार केदार गणेश अभ्यंकर (उपाख्य गणेशसुत) यांच्या 'तुला पाहताना...' या नव्या कोऱ्या मेलडीच्या रौप्यमहोत्सवी प्रयोगानिमित्त गीतांच्या पुस्तिकेचे प्रकाशन उत्साहात पार पडले. पौॲड्स क्रिएशनतर्फे आयोजित या कार्यक्रमात ज्येष्ठ गायिका व संगीत शिक्षिका स्मिता जोशी यांच्या हस्ते पुस्तिकेचे अनावरण करण्यात आले. यावेळी प्राचार्य उज्ज्वला अंधारे, कवी रास उपाख्य डॉ. रामकृष्ण सहस्रबुद्धे तसेच ज्येष्ठ साहित्यिक अविनाश बागडे यांनी मार्गदर्शन केले. अनेक कवी-साहित्यिक व रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कवी रास यांनी गणेशसुत यांच्या नव्या गीतांना रसिकांपर्यंत पोहोचविण्याच्या प्रयत्नांचे कौतुक करत सर्वांनी या कार्याला पाठबळ द्यावे, असे आवाहन केले. अविनाश बागडे यांनी पूर्वी थिएटरबाहेर वितरित होणाऱ्या गाण्यांच्या पुस्तकांची आठवण सांगत इतिहासाची पुनरावृत्ती होत असल्याचे समाधान व्यक्त केले. स्मिता जोशी यांनी २५ व्या प्रयोगापर्यंत पोहोचणे ही सोपी गोष्ट नसल्याचे नमूद करत गणेशसुत यांच्या सातत्यपूर्ण परिश्रमांचे कौतुक केले. मार्चमध्ये होणाऱ्या रौप्यमहोत्सवी प्रयोगाला रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.



## अलेक्झांड्रा ब्रँड यांनी केले भारताच्या शाश्वत कृषी प्रगतीचे कौतुक

पुणे (दैनिक संध्या) : पुण्याजवळील नारायणगाव येथे नुकतेच सिंजेंटा समूहाच्या ग्लोबल सस्टेनेबिलिटी लीडर व सस्टेनेबिलिटी, कॉर्पोरेट अफेयर्स आणि ट्रान्सफॉर्मेशन विभागाच्या कार्यकारी उपाध्यक्ष अलेक्झांड्रा ब्रँड यांनी भेट दिली. आपल्या भेटीदरम्यान ब्रँड यांनी शेतकरी, विद्यार्थी आणि ग्रामीण युवकांशी थेट संवाद साधला. हा संवाद सिंजेंटा इंडियाच्या वुई केअर स्टीवर्डशिप मोहिमेद्वारे सुरक्षित वापर पद्धतींना प्रोत्साहन देणे आणि आय राईज युवा कौशल्य विकास उपक्रमाद्वारे ग्रामीण क्षमतांना बळकटी देणे यावर केंद्रित होता. त्यांनी जबाबदार पीक संरक्षण पद्धती अधिक बळकट करण्याबरोबरच भविष्यासाठी सक्षम ग्रामीण प्रतिभेला घडविण्यासाठी सिंजेंटाची बांधिलकी पुन्हा अधोरेखित केली. ब्रँड यांनी विद्यार्थी आणि शिक्षकांशी संवाद साधत पीक संरक्षण उत्पादनांच्या सुरक्षित हाताळणी आणि जबाबदार वापराबाबत जागरूकता निर्माण केली. भारतामध्ये शाश्वत विकास आणि हवामान-अनुकूल शेतीतील वाढत्या गतीचे कौतुक करत, अलेक्झांड्रा ब्रँड म्हणाल्या की, शाश्वत शेतीमध्ये जगाचे नेतृत्व करण्याची क्षमता आणि महत्त्वाकांक्षा दोन्ही भारताकडे आहे. हवामान-स्मार्ट कृषी पद्धतींच्या प्रगतीपासून ते नियोजित वेळेआधीच अपारंपरिक ऊर्जा क्षमतेची उद्दिष्टे साध्य करण्यापर्यंत भारताने केलेली प्रगती जबाबदार वाढीसाठी असलेली बांधिलकी दर्शवते. भारताचा व्यापक आकार, वैज्ञानिक क्षमता आणि नवोन्मेषावर वाढता भर यामुळे जागतिक स्तरावर शाश्वत शेतीचे भविष्य घडविण्यात भारताला अनन्यसाधारण स्थान प्राप्त झाले आहे, असे ब्रँड यांनी सांगितले.

## डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली महिला सुरक्षिततेवर उच्चस्तरीय बैठक



मुंबई (दैनिक संध्या) : सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत महिलांच्या सुरक्षिततेसंदर्भात करण्यात आलेल्या राज्यव्यापी सेफ्टी ऑडिटचा आढावा घेण्यासाठी विधानभवनात उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक पार पडली. बदलापूर येथील अल्पवयीन मुलीवरील अत्याचाराची घटना आणि स्वारगेट बसस्थानकावरील प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर ही बैठक आयोजित करण्यात आली. स्वयंसेवी संस्थांमार्फत राज्यातील २४२ ठिकाणी करण्यात आलेल्या सेफ्टी ऑडिटमधील शिफारशी तातडीने आणि निश्चित कालमर्यादेत अंमलात आणाव्यात, असे स्पष्ट निर्देश डॉ. गोऱ्हे यांनी प्रशासनाला दिले. अहवालात बसस्थानके, रेल्वे स्थानके व सार्वजनिक वाहतुकीशी संबंधित ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी करून सीसीटीव्ही, प्रकाशव्यवस्था, महिला पोलिसांची गस्त, हेल्पलाईन, पॅनिक बटण, स्वच्छतागृहे, तक्रार नोंदणी प्रणाली आणि 'हिरकणी कक्ष' यांची स्थिती तपासण्यात आली. अनेक सुविधा अस्तित्वात असूनही त्यांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले. विशेषतः पॅनिक बटण प्रणाली कार्यक्षम नसल्याचे आढळल्याने ती नियंत्रण कक्षाशी तसेच व्हॉट्सॲप क्रमांकाशी थेट जोडण्याचे निर्देश देण्यात आले, जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीत महिलांना त्वरित मदत मिळेल. डॉ. गोऱ्हे यांनी प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर देत शालेय बस चालक व कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण देणे, बसस्थानकांवर सीसीटीव्ही संदर्भातील स्पष्ट फलक लावणे, पॅनिक बटणाविषयी जनजागृती वाढवणे आणि शाळांनी बस शाळेच्या आवारातच उभ्या करण्याची व्यवस्था करणे आवश्यक असल्याचे सांगितले. पीडित मुलींना शासकीय योजनांचा लाभ मिळतोय का याची पडताळणी करून आवश्यकतेनुसार समुपदेशनाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, असेही त्यांनी नमूद केले. असंघटित क्षेत्रातील महिला कामगारांच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र उपाययोजना आखून त्यांच्या नोंदीसाठी विशेष ॲप विकसित करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. तसेच वन स्टॉप क्रायसिस सेंटरचा नियमित आढावा घेऊन प्रत्यक्ष लाभार्थींना मदत मिळते का याचे मूल्यमापन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. परिवहन विभागाने ६३३ ठिकाणी सीसीटीव्ही बसविल्याची माहिती दिली असून प्रत्येक बसस्थानकावर सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात आल्याचे सांगितले. शालेय बसमध्ये महिला सहाय्यक नेमणे बंधनकारक करण्यात आले असून लवकरच सर्व बसमध्ये सीसीटीव्ही, जीपीएस आणि पॅनिक बटण प्रणाली अनिवार्य करून ती पोलीस विभागाशी जोडण्यात येणार आहे. पोलीस विभागाने शाळा सुटण्याच्या वेळेत गस्त वाढवली असून प्रत्येक पोलीस चौकीत 'भरोसा सेल' कार्यरत असल्याचे स्पष्ट केले.

# हसतखेळत पुणेकरांनी घेतला योग सवयीचा धडा

### रोटरीच्या प्रिस्टीन परिवर्तन पुरस्कार समारंभात सौरभ बोथरा ह्यांनी सांगितले सातत्याचे महत्व




पुणे (दै. संध्या) :

रोटरी पुणे प्रिस्टिन ह्यांच्या नुकत्याच पार पडलेल्या कार्यक्रमात प्रसिद्ध योग गुरू सौरभ बोथरा ह्यांचा "परिवर्तन पुरस्कार" देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर झालेल्या योगसत्रात श्री बोथरा ह्यांनी प्रत्येकाने जमेल तेव्हा व जमेल तो, पण रोज योग किंवा व्यायाम करणे आवश्यक आहे ही आग्रही भूमिका मांडली. आपले मत मांडताना त्यांनी असे सांगितले की सुरवातीला तुम्ही किती आणि कसा योग किंवा व्यायाम करता ह्यापेक्षा तुम्ही तो रोज करता का हे महत्वाचे आहे. एकदा सवय झाली कि आपोआपच तुमची ताकद, लवचिकता व कौशल्य वाढत जाईल व त्यातून तुम्हाला फक्त शारिरीकच नाही तर मानसिक स्वास्थ्य पण प्राप्त होईल. सुमारे दीड तास हसत खेळत चाललेल्या ह्या कार्यक्रमात चार हजारांहून अधिक प्रेक्षकांना त्यांनी मंत्रमुग्ध केले. व्यासपीठावर त्यांच्याबरोबर योग करत असलेल्या तीन वर्षांची मुलगी, व दोन जेष्ठ नागरिक ह्यातून व्यायामाला वय नाही तर इच्छा व सवय महत्वाची हे दाखवून दिले. त्याआधी रोटरी प्रांतपाल संतोष मराठे ह्यांच्या हस्ते श्री बोथरा ह्यांचा सत्कार व मानपत्र प्रदान करण्यात आले. रोटेरियन मराठे ह्यांनी बोथरा ह्यांच्या कार्याचे कौतुक केले. पुरस्काराची पार्श्वभूमी सांगताना कार्यक्रमाचे निमंत्रक रोटेरियन सुदिन आपटे म्हणाले "बोथरा ह्यांनी योग व सहज व्यायाम सर्वसमावेशक केले. व्याधी असलेले, शारीरिक लवचीकता नसलेले, वयस्कर ह्यासर्वांना जमेल असे योगशिक्षण तर बोथरा देतातच पण जिथे असु तेथुन व जेव्हा जमेल तेव्हा हे शिकता येईल ह्याची पण सोय त्यांच्या उपक्रमात आहे." ह्या परिवर्तनाच्या यशात परिणामकारक माहीती तंत्रज्ञानाचा वापर, माफक शुल्क व बोथरा ह्यांच्या संभाषण कौशल्याचा पण मोठा वाटा आहे असे आपटे म्हणाले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला रोटरी प्रिस्टिन अध्यक्ष सुनया आपटे ह्यांनी संस्थेच्या आरोग्य शिक्षण क्षेत्रातील कामाची माहिती दिली तर नियोजित अध्यक्ष देवेंद्र सारळकर ह्यांनी आभार प्रदर्शन केले.

## बँकॉक-पुणे विमानातून ७५ लाखांचा हायड्रोपोनिक गांजा जप्त

पुणे (दै. संध्या) :

बँकॉकहून पुण्यात आलेल्या विमानाच्या स्वच्छतागृहात लपवून ठेवलेला सुमारे ७५ लाख रुपये किमतीचा हायड्रोपोनिक गांजा (मारिजुआना) पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर जप्त करण्यात आला. या कारवाईत ७४५ ग्रॅम अमली पदार्थ हस्तगत केला असून, याप्रकरणी अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही. पुणे परिक्षेत्राच्या एअर इंटेलिजन्स युनिटच्या अधिकाऱ्यांनी तीन मार्च रोजी ही कारवाई केली. एअर इंडियाच्या बँकॉक-पुणे विमानाच्या स्वच्छतागृहातील टिश्यू कॅबिनेटमध्ये पिवळ्या रंगाचे दोन पाकिटे आढळून आली. तपासणी केली असता, त्या खाद्यपदार्थांच्या पाकिटांमध्ये व्हॅक्युम सीलबंद आठ पाकिटांममध्ये हायड्रोपोनिक गांजा आढळला. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. हा हायड्रोपोनिक गांजा विमानात कोणी आणि कशा पद्धतीने लपवून ठेवला, याचा शोध घेतला जात आहे.

## 'जेएनयू'च्या कुलगुरूंची हकालपट्टी करा!

■ बहुजन विरोधी मानसिकतेला संरक्षण देऊ नये : डॉ. हुलगेश चलवादी

पुणे (दै. संध्या) :

बहुजनांविरोधात गरळ ओकने आज कालची फॅशन झाली आहे. हक्काचे आरक्षण आणि बहुजन विचारधारेला लक्ष करीत चळवळीबद्दल अपप्रचार करण्याचे काम सर्रास सुरु आहे. मात्र, हे प्रकार बहुजनांनी खपवून घेऊ नये. बहुजनांविरोधात गरळ ओकणाऱ्या जेएनयूच्या कुलगुरू शांतिश्री धुलिपुडी पंडित यांची हकालपट्टी करा, अशी मागणी बहुजन नेते, माजी नगरसेवक डॉ.हुलगेश चलवादी यांनी बुधवारी (ता.४) केले.



कुलगुरू पंडित यांनी एका पॉडकास्टमध्ये जातव्यवस्था आणि 'पीडित मानसिकता' यावर वादग्रस्त वक्तव्य केले.या मुलाखतीत त्यांनी दलित समाजाच्या संघर्षाची तुलना अमेरिकेतील कृष्णवर्णीय समुदायाशी करत, 'सतत स्वतःला पीडित म्हणवून घेऊन प्रगती होत नाही. जसे कृष्णवर्णीयांबाबत झाले, तसेच येथे दलितांबाबत घडले,' असे विधान केले होते.कुलगुरूंच्या विधानानंतर 'जेएनयू' सह बहुजनांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. डॉ.चलवादी म्हणाले की, हे विधान ऐतिहासिक जातीय अन्याय आणि सामाजिक विषमतेकडे दुर्लक्ष करणारे आहे. भारतीय राज्यघटनेने दिलेल्या आरक्षणासह समतेच्या तरतुदींना कमी लेखण्याचा हा प्रयत्न असून, बहुजन समाजाच्या संघर्षाचा अवमान आहे. अशा मानसिकतेला संरक्षण देणे म्हणजे सामाजिक सलोख्याला तडा देणे होय, असे त्यांनी स्पष्ट केले. कुलगुरुंच्या वादग्रस्त वक्तव्यामुळे विद्यार्थी संघटना, प्राध्यापकांनी तीव्र संताप व्यक्त करीत आंदोलन पुकारले आहे. हे विधान जातीय अन्यायाकडे दुर्लक्ष करणारे व समतेसाठीच्या विविध तरतुदी अमान्य करणारे असल्याचे डॉ.चलवादी म्हणाले.

## 'द वन अँड ओन्ली' संकल्पनेतून ब्लेंडर्स प्राईड वॉटरची अनोखी मांडणी

पुणे (दै. संध्या) :

■ नव्या कॅम्पेनमध्ये ब्रँड असे दाखवतो की, कितीही लोकांच्या गर्दीत असलं तरी एकच जण आपल्या जबरदस्त ऑरा, पूर्ण आत्मविश्वास आणि हटके स्टाईलमुळे सगळ्यांवर भारी ठरतो – अगदी त्याच्या सांस्कृतिक लीडरशिप आणि वारशासारखंच.




ब्लेंडर्स प्राईड पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर, पिढ्यान् पिढ्या यशाची वेगळीच लेव्हल सेट करणारा कल्चरल आयकॉन, आता त्याची नवीन मोहिम 'द वन अँड ओन्ली' घेऊन आलाय – जी आहे यशाची एकदम दमदार आणि फ्रेश स्टोरी. आजच्या जगात यशाची चिन्हं सगळीकडेच दिसतात, आणि स्पर्धाही जबरदस्त वाढलीये. पण ब्रँड पुन्हा एकदा तेच सांगतो – खरं यश वेगळेपणात आहे - जे लोकांना आपोआप प्रभावी करते आणि माणसाला सगळ्यांपेक्षा खूप पुढे नेऊन उभं करतो.

नव्या मोहिमेमध्ये हा जोश तीन जबरदस्त चेहऱ्यांमधून दिसतो — अवंती नगराथ, किरणदीप चहल आणि माहिका शर्मा — आणि प्रत्येक जण ब्रँडचा वेगळा अंदाज दाखवतो. अवंती तिच्या बिनधास्त आत्मविश्वास आणि स्वतःची वेगळी ओळख यामुळे जबरदस्त करिश्मा पसरवते, किरणदीप तिच्या जबरी आकर्षण आणि कुणालाही खुश करण्याची गरज न भासणारी दमदार उपस्थितीने सगळ्यांचं लक्ष वेधून घेते. तर माहिका तिच्या शांत पण रॉयल स्वभावामुळे आणि सूक्ष्म आकर्षणामुळे लोकांना थक्क करून टाकते. सगळीकडे भरपूर स्पर्धा असलेल्या या आशादायी जगात त्या तिघी आणि त्यांच्यासोबत ब्रँड — कायम बाकी सगळ्यांवर भारी ठरतात आणि सभोवताली असलेल्या लोकांवर आपोआप छाप पाडतात.

स्टाईल आणि दमदार आशयावर उभा असलेला हा ब्रँड, नवकल्पकतेमध्ये पुढे राहून, उद्योगामध्ये अनेक क्षेत्रात प्रथम येऊन आणि फेमस आणि हटके फॅशन प्लॅटफॉर्म तयार करून - आधुनिक भारतीय संस्कृतीवर आशादायी यशाची दिशा कायम सेट करत आलाय.

आता 'द वन अँड ओन्ली' सोबत तो आपल्या पुढच्या टप्प्यात वाटचाल करतोय — थेट त्या नव्या पिढीशी बोलतोय जी फक्त ओळख मिळवण्यासाठी नाही, तर लोकांना इम्प्रेस करून आदर आणि प्रभाव मिळवण्यासाठी धडपडते.

ही 360 डिग्री इंटिग्रेटेड मोहिम आता डिजिटल आणि सोशल मीडियावर सुरू आहे, त्यात चालू असलेला ICC T20 वर्ल्ड कप, मोठ्या बातम्यांच्या पेपर्सवरील मुख्य पानावरच्या जाहिराती आणि मोठ्या शहरांतील परिणामकारक बाहेरील जाहिरात पोस्टर्स सगळं सामील आहे. यामुळे ब्रँडची ओळख आणि प्रसिद्धी भरपूर वाढते आणि त्याची सांस्कृतिक नेतृत्वाची ताकद पुन्हा दिसून येते.

पर्नोड रिकार्ड इंडियाचे मुख्य विपणन अधिकारी देबश्री दासगुप्ता म्हणाल्या की, "ब्लेंडर्स प्राईड नेहमीच स्टाइल आणि प्रतिष्ठेसह यशाच्या ताकदीवर विश्वास ठेवतो. 'द वन अँड ओन्ली' यशाची एक नवी आणि ठाम कल्पना घेऊन आली आहे, जी वेगळेपणावर चालते. ती हे दाखवते की, आजच्या भारतातील महत्वाकांक्षी तरुण फक्त यशस्वी होण्यावर नाही, तर आत्मविश्वासाने आणि हटकेपणाने सगळ्यांपेक्षा वेगळे दिसण्याकडेही लक्ष देतात. या यशाच्या गोष्टीतून ब्लेंडर्स प्राईड तरुणांच्या मोठ्या आकांक्षांना साकार करतो आणि त्याचबरोबर आपल्या प्रेरणादायी सांस्कृतिक नेतृत्वाची ओळख अधिक मजबूत करतो."

## दुबई येथून १११ नागरिक पुण्यात सुखरूप पोहोचले

### उर्वरित नागरिकांना आणण्याची कार्यवाही सुरु

पुणे (दै. संध्या) :

मध्यपूर्व व आसपासच्या काही देशांमध्ये निर्माण झालेल्या तणावपूर्ण प्रादेशिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर दुबई येथे अडकलेल्या जिल्ह्यातील एकूण १८४ नागरिकांपैकी १११ नागरिक पुण्यात सुखरूप पोहोचले आहेत. तसेच १९ नागरिकांच्या विमान उड्डाणाची वेळ बदलण्यात आली असून ५४ नागरिकांना परत आणण्याची प्रक्रिया सुरु आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली आहे. भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार परदेशात वास्तव्यास असलेल्या भारतीय नागरिकांच्या सुरक्षेसाठी महत्त्वपूर्ण सूचना जारी करण्यात आल्या आहेत. अशा परिस्थितीत नागरिकांनी आवश्यक माहितीसाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी संपर्क साधावा. पॅलेस्टाईन (रामल्लाह), कतार (दोहा), सौदी अरेबिया (रियाध), इस्रायल (तेल अवीव), इराण (तेहरान), इराक (बगदाद), कुवेत, बहारीन, मस्कत, जॉर्डन तसेच संयुक्त अरब अमिरात (अबूधाबी) येथे वास्तव्यास असलेल्या सर्व भारतीय नागरिकांनी अत्यंत सतर्क राहावे, अनावश्यक हालचाली टाळाव्यात व स्थानिक प्रशासन तसेच भारतीय दूतावासांनी दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन शासनाच्या वतीने वेळोवेळी करण्यात आले आहे. आपत्कालीन परिस्थितीत संबंधित देशांतील भारतीय दूतावासांच्या २४x७ हेल्पलाईन क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहनही करण्यात आले असून, दूतावासांकडून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवले जात आहे.

परदेशात वास्तव्यास असलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांनी शांतता व संयम राखावा, अधिकृत माहितीकडेच लक्ष द्यावे, आणि आवश्यक असल्यास तात्काळ भारतीय दूतावासांशी संपर्क साधावा, असे आवाहन महाराष्ट्र शासनाने केले आहे. केंद्र सरकार व संबंधित दूतावासांशी समन्वय ठेवून, महाराष्ट्र शासनाच्या वतीने नागरिकांच्या सुरक्षेबाबत सतर्कता बाळगली जात आहे.

# ७० वर्षीय रुग्णाचे पुण्याच्या डॉक्टरांनी वाचवले जीवन

पुणे (दै. संध्या) :



लेझर सर्जरीनंतर रुग्ण आता पूर्णपणे बरा झाला असून प्रकृती स्थिर झाल्यावर त्यांना घरी सोडण्यात आले. लघवीवाटे रक्त जात असल्यास, विशेषत: रक्त पातळ करणारी औषधे घेणाऱ्या वयोवृद्ध रुग्णांच्या बाबतीत असे होत असल्यास त्याकडे कधीही दुर्लक्ष करून नये, यावर डॉक्टरांनी भर दिला. या केसमधून मणिपाल हॉस्पिटल, खराडी येथे उपलब्ध प्रगत तंत्रज्ञान, मिनिमली इन्व्हेजिव्ह शस्त्रक्रिया करण्यातील अनुभव कुशलता आणि गुंतागुंतीच्या, उच्च जोखमीच्या केस यशस्वी परिणामांसह हाताळताना वापरली जाणारी मल्टिडिसिप्लिनरी कार्यपद्धती ठळकपणे अधोरेखित होते.

कार्डिॲक अँजिओप्लास्टी झाल्यानंतर फक्त तीन दिवसांनी लघवीवाटे रक्तस्त्राव होण्याच्या प्राणघातक स्थितीला सामोरे जात असलेल्या एका ७० वर्षीय गृहस्थांवर मणिपाल हॉस्पिटल खराडी येथील डॉक्टर्सनी यशस्वी उपचार केले. रुग्णाच्या नेहमीच्या कार्डिओलॉजी चेक-अपदरम्यान ईसीजीमध्ये काही बदल झाला आहे का यासाठी रुग्णाचे मूल्यमापन करण्यात आले व त्यांच्यावर यशस्वी अँजिओप्लास्टी करण्यात आली.

रुग्णावर डुएल अँटिप्लेटलेट थेरपी सुरू करण्यात आली होती, मात्र तीनच दिवसांत लघवीवाटे रक्त जात असल्याची तक्रार घेऊन या रुग्णाने युरोलॉजी बाह्यरुग्ण विभागाला भेट दिली. रुग्णाच्या मूत्राशयामध्ये जवळजवळ ३०० मिलीची गुठळी आहे व त्याचबरोबर प्रोस्टेटचा आकारही सुमारे २५० सीसी इतका प्रचंड मोठा झाल्याचे अधिकच्या तपासणीतून आढळून आले. अँटिप्लेटलेट थेरपी प्रोस्टेटमधून रक्तस्त्राव होण्यास निमित्त ठरली होती व त्यामुळे परिस्थिती नाजूक बनली होती.

गुठळी काढून टाकण्याची व रक्तस्त्राव होत असलेल्या रक्तवाहिन्यांवरील फल्गुरेशनची प्रक्रिया तातडीने पार पाडण्यात आली. ज्यानंतर रुग्णावर जवळून देखरेख ठेवण्यासाठी त्यांना ICU मध्ये ठेवण्यात आले. प्रारंभिक हस्तक्षेपानंतरही पुन्हा एकदा गुठळी निर्माण झाली व रक्तस्त्राव सुरू राहिला. अँटिप्लेटलेट थेरपी थांबविणे किंवा सुरू ठेवणे या दोहोंमध्येही असलेली मोठी जोखीम लक्षात घेता कार्डिओलॉजी, युरोलॉजी, इंटरव्हेन्शनल रेडिओलॉजी आणि क्रिटिकल केअर विभागातील तज्ज्ञांचा समावेश असलेल्या मल्टिडिसिप्लिनरी टीमने या केसचे काळजीपूर्वक मूल्यमापन केले.

केसमधील गुंतागुंत विचारात घेऊन डॉ. संतोष पाटील यांनी मिनिमली इन्व्हेजिव्ह प्रोस्टेट आर्टरी अँजिओएम्बोलायझेशनची प्रक्रिया पार पाडली, ज्यामुळे रक्तस्त्रावावर नियंत्रण मिळविण्यात यश आले. रुग्णाची तब्येत स्थिर झाल्यानंतर त्यांना युरिनरी कॅथेटर लावून घरी सोडण्यात आले. सहा महिन्यांनंतर, अँटिप्लेटलेट थेरपी थांबवणे सुरक्षित असल्याचे निश्चित झाल्यावर रुग्णाच्या प्रोस्टेटच्या वाढलेल्या आकारासाठी प्रोस्टटच्या लेझर इन्युक्लिएशनसह त्यांच्यावर अंतिम उपचार करण्यात आले.

या केसविषयी बोलताना मणिपाल हॉस्पिटल खराडी, पुणे येथील युरोलॉजी विभागाचे कन्सल्टन्ट डॉ. अंकित शर्मा म्हणाले, "नुकतेच कार्डिॲक प्रक्रियांना सामोरे गेलेले वयोवृद्ध रुग्ण जीवनरक्षक अशी रक्त पातळ करणारी औषधे घेत असल्याने त्यांच्याबाबतीत रक्तस्त्रावाशी निगडित गुंतागुंती हाताळणे विशेषत्वाने आव्हानात्मक बनते. अशा केसमध्ये रुग्णामध्ये अँजिओप्लास्टीनंतर लगेचच हिमॅटुरिया आणि गुठळी तयार होणे या गोष्टी होतात. तपासणीमधून प्रोस्टेटचा आकार जवळ-जवळ २५० सीसी इतका लक्षणीयरित्या वाढल्याचे दिसत होते व ड्युएल अँटिप्लेटलेट थेरपीमुळे रक्तस्त्रावही सुरू झाला होता."

ते पुढे म्हणाले , "रक्त पातळ करणारी औषधे थांबवणे शक्य नसल्याने, प्रोस्टेटचा आकार प्रचंड वाढल्याने आणि वारंवार गुठळी होत असल्याने एक अत्यंत उच्च-जोखमीची स्थिती तयार झाली होती, जिथे पारंपरिक शस्त्रक्रियेमध्ये अतिशय मोठा धोका होता. या गुंतागुंती असूनही टीमने मिनिमली इन्व्हेजिव्ह प्रक्रिया पार पाडली, ज्यात तातडीने गुठळी बाहेर काढणे, प्रोस्टेट आर्टरी एम्बोलायझेशन, आणि नंतर धोका टळल्यानंतर पार पाडण्यात आलेली लेझर इन्युक्लिएशनची प्रक्रिया यांचा समावेश होता. रक्तस्त्रावावर संपूर्ण नियंत्रण मिळविले गेले व बरे होण्याच्या कालावधीत रुग्णाच्या जीवनमानाच्या दर्जामध्ये लक्षणीय सुधारणा झाली."

## थोडक्यात पण महत्वाचे...




### 'दिलखुलास'मध्ये प्रा. मृदुला दाढे यांची मुलाखत

मुंबई (दैनिक संध्या) : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' कार्यक्रमात मुंबई विद्यापीठाच्या प्रा. मृदुला दाढे यांची मुलाखत प्रसारित होणार आहे. सुगम, लोकसंगीत, शास्त्रीय तसेच चित्रपट संगीताच्या अभ्यासक म्हणून त्यांनी संगीत क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. 'दिलखुलास' कार्यक्रमात ही मुलाखत 5 ते 7 मार्च 2026 दरम्यान दररोज सकाळी 7.25 ते 7.40 या वेळेत आकाशवाणीच्या राज्यातील सर्व केंद्रांवरून प्रसारित होईल. तसेच 'News on AIR' या मोबाईल ॲपवरूनही श्रोत्यांना ती ऐकता येणार आहे.निवेदिका सुषमा जाधव यांनी ही मुलाखत घेतली आहे. प्रा. दाढे यांनी या मुलाखतीत भारतीय शास्त्रीय, सुगम आणि चित्रपट संगीताचा ऐतिहासिक प्रवास उलगडताना विविध घराणी, परंपरा आणि गुरू-शिष्य परंपरेचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले आहे. भाषा आणि संगीत यांचे अतूट नाते स्पष्ट करत संस्कृत ते आधुनिक भारतीय भाषांच्या विकासात संगीताची भूमिका त्यांनी अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडली आहे. शब्द, लय आणि सूर यांच्या एकत्रित प्रभावातून भावविश्व कसे समृद्ध होते, यावरही त्यांनी प्रकाश टाकला आहे. चित्रपटसंगीत आणि शास्त्रीय संगीताचा परस्परसंबंध, लोकसंगीतातून मिळणारी प्रेरणा, ग्रामीण-शहरी समाजातील संगीताची भूमिका तसेच डिजिटल युगातील संधी-आव्हाने, संगीताचा मानसिक आरोग्यावर होणारा सकारात्मक परिणाम आणि ताणतणाव कमी करण्यातील त्याची भूमिका याविषयावर 'दिलखुलास' कार्यक्रमातून प्रा. दाढे यांनी सविस्तर माहिती दिली आहे.

### बारामतीच्या आकाशात संशयाचे ढग; रेकीचा स्फोटक आरोप!

मुंबई (दैनिक संध्या) : राष्ट्रवादी शप पक्षाचे आमदार यांनी आज पुन्हा एकदा पत्रकार परिषदेत सत्ताधाऱ्यांना आणि चौकशी यंत्रणांना धारेवर धरत बारामती विमानतळाभोवतीच्या कथित रेकी केल्याचा मुद्दा ऐरणीवर आणला. अपघातापूर्वी विमानतळाची रेकी झाली होती, अशी चर्चा आहे. आमच्याकडे ठोस पुरावा नाही; पण त्या अँगलने चौकशी झालीच पाहिजे, असा ठाम इशारा रोहित पवार यांनी दिला. अपघाताच्या एआयबी अहवालात तपास अधिकाऱ्याचे नाव नसल्याने संशय अधिकच गडद झाल्याचा आरोप पवार यांनी केला. २३ तारखेच्या दुसऱ्या अहवालात इन्व्हेस्टिगेटरचे नाव आहे; मग याच प्रकरणात नाव का गायब? कागदपत्रांत हेराफेरीची भीती आहे का? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला. पारदर्शकतेचा गजर करणाऱ्या यंत्रणांनीच गोपनीयतेचे कवच का धारण केले, असा रोखठोक प्रश्न त्यांनी विचारला. बारामतीकडे विमान कमी दृश्यतेत कसे वळले? टेक-ऑफ आणि लँडिंगला परवानगी कोणी दिली? दोन्ही पायलटांना रनवे २९ आणि ११ची पूर्ण माहिती होती, ते यापूर्वीही बारामतीत उतरले होते—मग चूक नेमकी कुठे झाली? पवार यांनी या प्रश्नांची उत्तरे जाहीरपणे मागितली. वाय एस राजशेखर रेड्डी यांच्या निधनानंतर नेमलेल्या त्यागी समितीने कमी दृश्यतेत लँडिंग टाळावे, अशी स्पष्ट शिफारस केली होती. "शिफारसी धुळखात आणि जोखीम मात्र जिवावर? असा संतप्त सवाल पवारांनी केला. सिव्हिल एव्हिएशन व सरकारी अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या 'ॲरो' ग्रुपमधील सर्वांवर फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मोठी मागणी त्यांनी केली. क्रिमिनल जबाबदारी ठरवलीच पाहिजे. जबाबदारी शिवाय चौकशी म्हणजे धूर—आणि धूर आहे तर आग कुठे? असा घणाघात त्यांनी केला.बारामतीच्या आकाशात संशयाचे ढग दाटलेले असताना चौकशीचा वेग वाढेल का? की प्रश्नांची मालिका आणखी लांबेल? जनतेच्या मनातील धुकं दूर करण्याची जबाबदारी आता यंत्रणांवरच आहे! असेही रोहित पवार यावेळी म्हणाले.

# धाडसी पोलिसांचा मराठी पत्रकार परिषद व पत्रकार संघाकडून सत्कार

**नीरा (दै. संध्या) :**

भोर तालुक्यातील कापूरहोळ येथून अपहरण झालेल्या तरुणाची सिनेस्टाईल पाठलाग करून सुखरूप सुटका करणाऱ्या नीरा पोलिसांचा अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद, पुरंदर तालुका मराठी पत्रकार संघ आणि नीरा प्रेस क्लब यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. या धाडसी कारवाईमुळे परिसरात पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मंगळवारी दुपारी सुमारे एकच्या सुमारास कापूरहोळ येथील व्यावसायिक लखन दळवी यांच्या मुलाचे अपहरण करण्यात आले होते. अपहरणकर्ते नीरा दिशेने निघाल्याची माहिती मिळताच नीरा दूरक्षेत्रातील पोलिसांनी तात्काळ शहरात नाकाबंदी केली.




तसेच अपहरणकर्ते ज्या मार्गाने येण्याची शक्यता होती त्या दिशेने पोलीस वाहनासह धाव घेतली.

पोलिसांची चाहूल लागताच अपहरणकर्त्यांनी मुख्य रस्ता सोडून कच्च्या मार्गाने पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी पाठलाग कायम ठेवला. घाबरलेल्या अपहरणकर्त्यांनी तरुणाला चालत्या गाडीतून रस्त्यावर ढकलून दिले. पोलिसांनी तत्काळ त्या मुलाला सुरक्षित ताब्यात घेतले आणि पुढील पाठलाग सुरूच ठेवला.

पुढे जाऊन अपहरणकर्त्यांची कार उसाच्या शेतात अडकल्याने त्यांनी पळ काढला. पोलिसांनी मांडकी गावाच्या हद्दीत पाचपैकी दोन आरोपींना ताब्यात घेतले. अपहरणकर्त्यांकडे कोयता, चाकू आणि रिव्हॉल्व्हर अशी घातक शस्त्रे होती. तरीही पोलिसांनी प्रसंगावधान राखत धाडसाने कारवाई केली. सुटका केलेल्या तरुणाला पुढील कार्यवाहीसाठी राजगड पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

या धाडसी कारवाईत नीरा दूरक्षेत्राचे पोलीस उपनिरीक्षक रविराज कोकरे, पोलीस कॉन्स्टेबल हरिश्चंद्र करे आणि प्रसाद कोळेकर यांनी विशेष धाडस दाखवले. त्यांच्या तत्परतेमुळे एका तरुणाचे प्राण वाचले.

या कामगिरीबद्दल पुरंदर तालुका पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष व डिजिटल मीडिया परिषदेचे राज्य सहसचिव राहुल शिंदे, पुणे जिल्हा मीडिया परिषदेचे अध्यक्ष व मराठी पत्रकार परिषदेचे प्रसिद्धी प्रमुख भारत निगडे, पुरंदर तालुका डिजिटल मीडिया परिषदेचे सचिव स्वप्निल कांबळे तसेच मोहम्मद गौस आतार यांनी नीरा पोलीस चौकीत जाऊन तिन्ही पोलिसांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. त्यांच्या धाडसी कारवाईचे कौतुक करत पुढील कारकीर्दीस शुभेच्छा देण्यात आल्या.

या संपूर्ण कारवाईमुळे नीरा परिसरात पोलिसांबद्दल विश्वास अधिक दृढ झाला असून नागरिकांकडून धाडसी पथकावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

> "नीरा परिसरात यापूर्वी दोन अपहरण प्रकरणांत दुर्दैवाने मुलांचा मृत्यू झाला होता. मात्र यावेळी पोलिसांनी स्वतःच्या सुरक्षिततेची पर्वा न करता तातडीने कारवाई करत मुलाची सुटका केली. अशी जोखीम पत्करणाऱ्या पोलिसांचा राज्य सरकारनेही सन्मान करावा."
>
> **- भारत निगडे (प्रसिद्धी प्रमुख, मराठी पत्रकार परिषद, मुंबई)**

> पोलिसांनी केवळ नाकाबंदीवर थांबून न राहता स्वतः पुढाकार घेत अपहरणकर्त्यांच्या दिशेने धाव घेतली. त्यामुळेच मुलाची सुटका शक्य झाली. अशा कार्यतत्पर पोलिसांचा गौरव होणे आवश्यक आहे." या संपूर्ण कारवाईमुळे नीरा परिसरात पोलिसांबद्दल विश्वास अधिक दृढ झाला असून नागरिकांकडून धाडसी पथकावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.
>
> **- राहुल शिंदे (राज्य सहसचिव, डिजिटल मीडिया परिषद, महाराष्ट्र)**

## जिंकण्यासाठी जिद्द, धैर्य व चिकाटी असावी - एव्हरेस्टवीर आनंद माळी

**पिंपरी, पुणे (दै. संध्या) :**

कोणत्याही स्पर्धेत जिंकण्यासाठी आपल्यामध्ये जिद्द, धैर्य व चिकाटी असावी लागते. त्याला योग्य मार्गदर्शकांची साथ मिळाली की यश नक्की मिळते. सांघिक अथवा वैयक्तिक अशा कोणत्याही खेळात सहभाग घेतल्याने मानसिक, भावनिक आणि शारीरिक स्वास्थ्य उत्तम राहते असे मार्गदर्शन ज्येष्ठ क्रीडापटू व एव्हरेस्ट वीर आनंद माळी यांनी केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट तर्फे 'युवोत्सव २०२६' हा तीन दिवसीय क्रीडा महोत्सव आयोजित करण्यात आला होता. या युवोत्सव स्पर्धेत बॉक्स क्रिकेट मुले २० संघ, मुली १२ संघ, हॉलीबॉल २४ संघ, फुटबॉल ३६ संघ आणि आयपीएल ऑक्शन यामध्ये ११ संघांनी भाग घेतला होता. त्यात १००० पेक्षा अधिक विद्यार्थी खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ आनंद माळी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी एसबीपीआयएम च्या संचालिका डॉ. कीर्ती धारवाडकर, समन्वयक प्रा. डॉ. अमरीश पद्मा, डॉ. ऋषिकेश कुमार, प्रा. पूर्वा साने आदी उपस्थित होते. संस्थेच्या संचालिका डॉ. कीर्ती धारवाडकर यांनी विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्राचे महत्त्व सांगताना म्हटले की खेळामुळे नेतृत्वगुण, संघभावना व शिस्त विकसित होते.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे :- मुलींच्या क्रिकेट स्पर्धेत डॉ. डी. वाय. पाटील महाविद्यालयाने इंदिरा महाविद्यालयावर १ धावांनी म्हणजे २० विरुद्ध १९ असा विजय मिळविला.

मुलांच्या क्रिकेट स्पर्धेत डॉ. डी. वाय. पाटील महाविद्यालयाने इंदिरा महाविद्यालयावर ७ धावांनी म्हणजे ३५ विरुद्ध २८ असा विजय संपादन केला.

व्हॉलीबॉल स्पर्धेत पीसीसीओई संघाने एमआयटीएडीटी विद्यापीठावर २-० (२५-२१, २५-२२) असा विजय मिळविला. फुटबॉल स्पर्धेत गरवारे महाविद्यालयाने डॉ. डी. वाय. पाटील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय, पिंपरी संघावर पेनल्टी शूट आऊटमध्ये ५-४ असा विजय मिळविला. श्री बालाजी युनिव्हर्सिटी संघाला तृतीय क्रमांक मिळाला.

## मार्चच्या सुरुवातीलाच उन्हाचा तीव्र चटका

**शेतीपिके, जनावरांचा चारा, पिण्याचे पाणी व नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम ?**



**कवठे येमाई (दै. संध्या) :**

राज्यासह पुणे जिल्ह्यात मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच तापमानात लक्षणीय वाढ झाल्याने नागरिकांना उन्हाचा तीव्र चटका बसू लागला आहे. नेहमी एप्रिल–मे महिन्यात जाणवणारी उष्णतेची तीव्रता यंदा मार्चमध्येच जाणवत असल्याने शेती, पशुधन, पाणीपुरवठा आणि आरोग्य व्यवस्थेवर परिणाम होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

अचानक वाढलेल्या तापमानामुळे गहू, हरभरा, कांदा, भाजीपाला यांसारख्या रब्बी पिकांवर ताण येत आहे.पिकांची वाढ खुंटणे,दाणे भरण्याची प्रक्रिया अपूर्ण राहणे,त्यामुळे उत्पादनात घट येऊ शकते,फुलगळ व पानगळ वाढणे उष्णतेमुळे जमिनीतील आर्द्रता झपाट्याने कमी होत असून शेतकऱ्यांना पिकांना अतिरिक्त पाणी द्यावे लागत आहे. त्यामुळे वीज वापर आणि इतर खर्च वाढत आहे.

उन्हामुळे कुरणातील गवत लवकर वाळत आहे. हिरवा चारा कमी उपलब्ध होत असल्याने पशुपालकांना सुक्या चाऱ्यावर अवलंबून राहावे लागत आहे.दुधाळ जनावरांचे दूध उत्पादन घटणे,जनावरांमध्ये अशक्तपणा,उष्माघाताचा धोका ही होण्याची शक्यता जाणकारांमधून व्यक्त होत आहे.

अनेक ठिकाणी तलाव, विहिरी आणि बोअरवेलमधील पाण्याची पातळी कमी होऊ लागली आहे. ग्रामीण भागात टँकरची मागणी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. पाणीटंचाई तीव्र होण्याची चिन्हे आत्ताच दिसत असून पाण्यासाठी नागरिकांची धावपळ होण्याची शक्यता ही नाकारता येत नाही.शेतीसाठी पाणी सिंचनावर देखील मर्यादा पडण्याची शक्यता आहे.

मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच उन्हाच्या वाढत्या तीव्रतेमुळे उष्माघात, डिहायड्रेशन, डोकेदुखी, त्वचारोग, रक्तदाबातील चढउतार यांसारख्या तक्रारी वाढू शकतात. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि श्रमिक वर्ग यांनी विशेष काळजी घेणे गरजेचे ठरणार आहे. त्या करीता दुपारी १२ ते ४ या वेळेत उन्हात जाणे टाळावे,भरपूर पाणी व द्रवपदार्थ घ्यावेत,डोक्यावर टोपी/रुमाल वापरावा,जनावरांना सावली व स्वच्छ पाणी उपलब्ध करून द्यावे.

> सुरु असलेल्या कडक उन्हाच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठ्याचे योग्य ते नियोजन,प्रसंगी जनावरांसाठी चारा छावण्यांची तयारी,आरोग्य शिबिरे,शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन व मदत मिळणे गरजेचे असेल. मार्चच्या सुरुवातीलाच वाढलेली उष्णता ही आगामी एप्रिल–मे महिन्यात अधिक तीव्र होण्याची शक्यता दर्शवित आहे. त्यामुळे प्रशासन, शेतकरी आणि नागरिकांनी आतापासूनच दक्षता घेणे आवश्यक ठरत आहे.

## जनतेला सर्व शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे मुख्य उद्देश

**मुंबई (दै. संध्या) :**

जनतेला सर्व शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे हा छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाचा (टप्पा-१) मुख्य उद्देश आहे. या अभियानाच्या माध्यमातून अधिकाधिक लोकांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याबरोबरच जिल्ह्यात या अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी, अशा सूचना मुंबई शहर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी आंचल गोयल यांनी दिल्या.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाबाबत जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांची बैठक नियोजन भवनात झाली. बैठकीस अतिरिक्त जिल्हाधिकारी बाप्पासाहेब थोरात,



सामान्य प्रशासन विभागाचे उप जिल्हाधिकारी गणेश सांगळे, उपजिल्हाधिकारी महादेव किरवले, महेश हरिश्चंद्रे यांच्यासह संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी आंचल गोयल म्हणाल्या, ७ मार्च, १४ मार्च, १० एप्रिल, ८ मे आणि १४ मे या दिवशी या अभियानांतर्गत शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानाच्या माध्यमातून १५ प्रकाराच्या सेवांचा लाभ पात्र लाभार्थीला दिला जाणार असल्याने प्रत्येक विभागाने त्यांच्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी पार पाडावी. जिल्हाधिकारी गोयल म्हणाल्या, शालेय विद्यार्थ्यांना आवश्यक दाखले शाळेतच उपलब्ध व्हावेत. यासाठी अधिकारी कर्मचारी यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. शालेय विद्यार्थ्यांना देण्यात येणारे दाखले याबाबत माहिती देण्यासाठी मुख्याध्यापकांची ऑन लाईन कार्यशाळा घ्यावी.

शासकीय कार्यालयात प्राप्त झालेले अर्ज, निवेदने वेळीच निकाली काढावीत. शासनाने प्रत्येक कामासाठी दिवस, वेळ ठरवून दिलेली आहे. त्यामुळे कोणतीही प्रकरणे प्रलंबित राहू नयेत, असे स्पष्ट निर्देश देत जिल्हाधिकारी आंचल गोयल म्हणाल्या, ज्या विभागाकडे प्रलंबित प्रकरणे राहतील त्या विभाग प्रमुखावर कारवाई केली जाईल.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाचा (टप्पा-१) मध्ये फेरफार प्रकरणे, भूमी अभिलेख दुरुस्ती, उत्पन्न, जात, अधिवास, नॉन-क्रीमीलेयर अशी विविध प्रकारची प्रमाणपत्रे, अधिकार अभिलेख अद्ययावत करणे, आदी सेवा या शिबिरांद्वारे तत्काळ उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.



## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे मानले आभार

**मुंबई (दै. संध्या) :**

अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्यात सध्या युद्धाचा भडका उडाला आहे.अशात पुण्यातील इंदिरा युनिव्हर्सिटीचे ८४ विद्यार्थी शैक्षणिक सहलीसाठी दुबईला गेले असता युद्ध सुरू झाल्याने तिथे अडकून पडले होते. ही गोष्ट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना समजताच त्यांनी विशेष विमानाने या सर्व विद्यार्थांना काल रात्री सुखरूप मायदेशी परत आणले. यानंतर इंदिरा युनिव्हर्सिटीच्या अध्यक्ष तरीता शंकर यांनी व्हिडीओ कॉलद्वारे केलेल्या मदतीबद्दल उपमुख्यमंत्री शिंदे यांचे आभार मानले आहेत. आजवर तुमच्याबद्दल केवळ ऐकून होते मात्र तुम्ही खरोखरच मदतीला धावून येता याची खात्री पटली असल्याचे त्यांनी शिंदे यांना सांगितले.


### ग्रामपंचायत कोथळे, ता. पुरंदर, जि. पुणे

**B-1 टेडर नोटीस क्र. १ सन २०२५/२६**

ग्रामपंचायत कोथळे, ता. पुरंदर, जि पुणे यांचेकडुन खालील नमूद केलेल्या कामांची निविदा B-1 निविदा पद्धतीने (दोन सीलबंद लिफाफा) पद्धतीने जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निवेदेचा नमुना ग्रामपंचायत कोथळे ता. पुरंदर जि. पुणे यांच्याकडुन दिनांक ०५/०३/२०२६ ते दिनांक १२/०३/२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत देण्यात येतील व पोस्टाने / समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्वीकारले जातील सदर सीलबंद निविदा मासिक सभे दिवशी /ग्रामपंचायत सोई नुसार उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निवीदा विक्री करण्याचा कालावधी | निवीदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | पाऊस पाणी संकलन यंत्रणा बसवणे. | २०००००/- | दि ०५/०३/२०२६ ते दि १२/०३/२०२६ | २३६/- | २०००/- |

**निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :** निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे. १. कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखुन ठेवला आहे. २. कोऱ्या निविदा फी व इसारा रक्कम ग्रामपंचायत कोथळे PDCC बँक शाखा जेजुरी खाते क्र. ०२६००२५००००००१७ वर किंवा ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्या नंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणे कामी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३. जि.प. रजिस्ट्रेशन, PAN कार्ड, GST certificate व या पूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत.सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत कोथळे यांनी राखुन ठेवला आहे.

ग्रामपंचायत अधिकारी    सरपंच
ग्रामपंचायत कोथळे, ता. पुरंदर, जि. पुणे



### पुणे जिल्हा परिषद, बांधकाम विभाग (दक्षिण)

**ई - निविदांतर्गत खुली बी १ निविदा सुचना क्रं. ६५ सन २०२५-२६ 66**

पुणे जिल्हा परिषद, नवीन प्रशासकीय इमारत, वेलस्ली रोड, कॅम्प पुणे-१ यांच्या वतीने अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा परिषद, पुणे यांचे तर्फे बारामती-८, इंदापूर-५ पुरंदर-२, दौंड-३, शिरूर-४ एकूण-२२ कामांची ई-निविदा http:mahatenders.gov.inया संकेतस्थळावर दि. ०२/०३/२०२६ रोजी दु. ०२.०० वा. प्रसिध्द करणेत आल्या आहेत. ई निविदेबाबत संपूर्ण माहिती http:mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

सही/- कार्यकारी अभियंता (दक्षिण) जिल्हा परिषद, पुणे
सही/- अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पुणे

जा.क्र.जि.प. बांध/ले-६/३२/२५
पुणे दि. ०४/०३/२०२६


## महापालिकेच्या उत्पन्न वाढीसह शहर प्रदूषणमुक्तीवर भर

**पिंपरी (दै. संध्या) :**

- स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांची माहिती
- मनपाच्या पहिल्या स्थायी समितीच्या सभेत विविध विषयांना मान्यता

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची आर्थिक स्थिती भक्कम करण्यासोबतच शहराच्या शाश्वत विकासासाठी 'इन्कम जनरेशन' आणि 'प्रदूषण नियंत्रण' या दोन सूत्रांवर भर दिला जाणार असल्याची माहिती स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी आज दिली. पिंपरी



चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात आज स्थायी समितीची सभा पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी अभिषेक बारणे होते. या बैठकीस आयुक्त श्रावण हर्डीकर,नगरसचिव मुकेश कोळप , अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर यांच्यासह समिती सदस्य व अधिकारी उपस्थित होते. स्थायी समितीच्या बैठकीत विविध विषयांना मंजुरी देण्यात आल्याची माहिती बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत सभापती अभिषेक बारणे यांनी दिली. स्थायी समिती सभापती दालनात प्रशासकीय कामकाजाबाबत सविस्तर भूमिका मांडताना ते बोलत होते.

बैठकीत मनपाच्या मुख्य लेखा विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी रजा मंजुरी कामी सादर केलेल्या विनंती अर्जाला मंजुरी देण्यात आली. तसेच, महापालिकेच्या वतीने "मराठी भाषा गौरव दिना"निमित्त दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमासाठी यामध्ये कलाकार, वक्ते मानधन, सांस्कृतिक कार्यक्रम असा एकूण खर्च र. रु. ७,५०,०००/- (अक्षरी र.रु. सात लाख पन्नास हजार फक्त) इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

शहरात सुरू असलेल्या बांधकामांच्या ठिकाणी सुरक्षेचे नियम धाब्यावर बसवले जात असल्याच्या तक्रारींची दखल घेत सभापती अभिषेक बारणे यांनी कडक पावले उचलली आहेत. "शहरात धुळीचे प्रमाण वाढू नये आणि नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ नये, यासाठी बांधकाम सुरक्षा (Safety) तपासण्यासाठी दोन विशेष पथके तैनात करण्याचे आदेश दिले आहेत. क्षेत्रीय कार्यालयांनी त्यांच्या हद्दीतील मोठ्या कामांची प्रगती आणि सुरक्षिततेची नियमित देखरेख करावी," असे निर्देश सभापती बारणे यांनी बैठकीत दिले.

महापालिकेच्या आर्थिक नियोजनाबाबत बोलताना अभिषेक बारणे यांनी स्पष्ट केले की, सध्या पालिकेवर दायित्व (Liability) अधिक आहे. "नवीन कामांपेक्षा आधीचे प्रकल्प पूर्ण करणे आणि पालिकेचे उत्पन्न वाढवणे हे आमचे प्राधान्य आहे. वाकडसह उपनगरांतील कर संकलन वाढवणे आणि होर्डिंग्जच्या माध्यमातून महसुलात भर टाकणे यावर आम्ही भर देत आहोत. निधी वाढल्यास शहराच्या वैभवात भर घालणारी कामे वेगाने होतील," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच, महापालिकेवर असलेले कर्ज कमी करून शहर कर्जमुक्त करण्याच्या दिशेने सकारात्मक प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले.


### महावितरण — ई - निविदा सूचना

महावितरण तर्फे कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग कार्यालय पुणे अंतर्गत महावितरणचे विविध कार्यालय / उपकेंद्र येथील स्थापत्य दुरुस्तीची कामे करणेसाठी महावितरणमधील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून **T-141/2025-26** ते **T-150/2025-26** साठी ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा महावितरणच्या संकेतस्थळावर **(https://etender.mahadiscom.in/eatApp) दि. 05.03.2026 ते 11.03.2026. पर्यंत सकाळी 13.00 वाजेपर्यंत** उपलब्ध आहेत. तसेच निविदा **दि. 11.03.2026 रोजी दुपारी 15.00 वाजेपर्यंत** स्वीकारण्यात येतील. सदर निविदा **दि. 11.03.2026 रोजी 15.30 वाजता** शक्य असल्यास उघडण्यात येतील. निविदासंदर्भात अधिक माहितीसाठी उप. कार्यकारी अभियंता (स्था) विभाग पुणे **भ्रमणध्वनी क्र. 7875767829** वर संपर्क साधावा. निमस्वाक्षरीकार यांनी कुठलेही कारण न देता सर्व निविदा स्वीकारणे अथवा रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे. तसेच कंत्राटदारांना विनंती करण्यात येते की, महावितरण च्या निविदा संकेतस्थळावर आपली नोंदणी करून घ्यावी. तसेच निविदेबाबत काही मुदतवाढ किंवा शुद्धी पत्रकाबाबत फक्त संकेतस्थळावरील ""Announcements"" मध्येच कळविण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**स्वा/-**
**कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग, पुणे**

PRO No. PRO/PZ/244/2025-26

## थोडक्यात पण महत्वाचे...



### देहू बीज सोहळा : 4 ते 6 मार्चदरम्यान विशेष वाहतूक बदल लागू

देहूगाव (दैनिक संध्या) : जगद्गुरू श्रीसंत तुकाराम महाराज यांच्या बीज उत्सवानिमित्त देहूगाव येथे 5 मार्च रोजी मोठ्या प्रमाणावर वारकरी, भाविक व नागरिक उपस्थित राहणार आहेत. यामुळे परिसरात होणारी गर्दी लक्षात घेऊन पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेकडून 4 ते 6 मार्चदरम्यान विशेष वाहतूक बदल लागू करण्यात आले आहेत. वाहतूक शाखेचे उपायुक्त विवेक पाटील यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत. जुना मुंबई-पुणे महामार्गावरील देहूगाव कमान ते देहूकडे जाणारा मार्ग (सार्वजनिक बसेस व दिंडीतील वाहनांव्यतिरिक्त) 4 ते 6 मार्चदरम्यान बंद राहणार आहे. महिंद्रा सर्कल ते फिजिक्स कॉर्नर, कॅनबे चौक, आयटी पार्क चौक, तळेगाव-चाकण रोडवरील देहूफाटा ते देहूगाव मार्ग, आयटी पार्क-कॅनबे चौक ते काळोखे पाटील चौक, त्रिवेणीनगर चौक (निगडी) ते तळवडे चौक, डायमंड चौक ते देहू मार्ग, तसेच 14 टाळकरी कमान ते भैरवनाथ चौक, काळोखे पाटील चौक ते देहू मुख्य कमान आणि परंडवाल चौक या मार्गांवरही वाहतूक निर्बंध लागू राहणार आहेत. जुना पालखी मार्ग (केंद पाटील चौक ते झेंडे मळा जकात नाका) हा 'वन-वे' करण्यात येणार असून, झेंडेमळ्याकडून केंद पाटील चौकाकडे प्रवेश बंद राहील. पर्यायी मार्ग म्हणून भक्ती-शक्ती चौक, मोशी फाटा, एच.पी. चौक, संविधान चौक, कृष्णानगर चौक, कुंडवडी सर्कल आदी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### संत तुकाराम महाराज बीज सोहळ्यासाठी कडेकोट सुरक्षा व व्यापक तयारी

देहूगाव (दैनिक संध्या) : जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या वैकुंठगमन (बीज) सोहळ्यानिमित्त गुरुवार, दि. 5 मार्च रोजी देहूनगरीत लाखो वारकरी भाविकांची उपस्थिती अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर भाविकांच्या स्वागतासह सुरक्षेच्या दृष्टीने देहूनगर पंचायत प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले आहे. सोहळा सुरळीत व सुरक्षित पार पडावा, चोरी किंवा अनुचित प्रकारांना आळा बसावा तसेच आपत्कालीनप्रसंगी त्वरित कार्यवाही करता यावी यासाठी मोक्याच्या ठिकाणी एकूण 34 सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. कचरा डेपो येथे दोन, एसटीपी प्लांटवर दोन तसेच गर्दीच्या प्रमुख ठिकाणी अतिरिक्त कॅमेरे बसवून संपूर्ण सोहळा सीसीटीव्हीच्या निगराणीखाली ठेवण्यात येणार आहे. स्वच्छतेच्या दृष्टीने मुख्य कमान, मंदिर परिसर, तसेच 14 टाळकरी मार्ग पाण्याने धुऊन स्वच्छ करण्यात आले आहेत. घाट, मुख्य व अंतर्गत रस्ते तसेच बाह्यवळण मार्गावरील खड्डे बुजवून डागडुजीचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. सफाई कर्मचारी सातत्याने स्वच्छता मोहीम राबवत आहेत. वारकऱ्यांसाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था म्हणून गर्दीच्या ठिकाणी 16 टँकर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच सुमारे 96 फिरती शौचालये उभारण्यात येत असून, सुलभ शौचालयांचीही व्यवस्था करण्यात आली आहे. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून तीन अग्निशामक बंब तैनात ठेवण्यात आले आहेत.



### रस्त्याचे काम अपूर्ण; तरीही चऱ्होलीचा पूल वाहतुकीस खुला, सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

चऱ्होली (दैनिक संध्या) : चऱ्होली पंचक्रोशीची जीवनवाहिनी असणाऱ्या चऱ्होलीच्या पुलावरून रस्त्याचे काम अपूर्ण असतानाच नागरिकांनी हा पूल वाहतुकीस खुला केला आहे. परंतु याकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने अपघात घडल्यास याला कोण जबाबदार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. अवजड वाहतूक देखील सुरू झाल्याने नागरिक आणि वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. चऱ्होली बुद्रुक आणि चऱ्होली खुर्द या दोन्ही चऱ्होलींना जोडणाऱ्या सरसेनापती खंडेराव दाभाडे पुलाचे काम 20 डिसेंबरपासून सुरू आहे. या पुलावर आजूबाजूचे सर्व जनजीवन अवलंबून आहे. सर्व प्रकारच्या औद्योगिक आस्थापनांमधील वाहतूक देखील याच पुलावरून होत असते. याशिवाय आळंदी हे महाराष्ट्रातील महत्त्वाची तीर्थक्षेत्र असल्यामुळे आळंदीतील वाहतुकीवर ताण पडू नये म्हणून बहुतांश वाहतूक आणि सर्व प्रकारची अवजड वाहतूक चऱ्होलीच्या पुलावरूनच वळविण्यात येते. त्यामुळे हा पूल लवकरात लवकर सुरू करावा, अशी मागणी होत होती. या पुलाच्या बेअरिंग्स खराब झाल्या होत्या. या बेरिंग्स बदलण्यासाठीच पुलाचे काम काढण्यात आले होते.

### एसटीचे 'एनसीएमसी' कार्ड सक्तीचे; वल्लभनगर आगारात नोंदणीला अडथळे

पिंपरी (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्यमार्ग परिवहन (एसटी) महामंडळाच्या प्रवाशांना रोख व्यवहारांच्या पलीकडे जाऊन पारदर्शकता आणि सोयीस्कर सेवा देण्याच्या उद्देशाने एस. टी. प्रशासनाने नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (एनसीएमसी) प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, पिंपरी-चिंचवड शहरातील वल्लभनगर आगारातील या कार्डच्या नोंदणीप्रकियेत अडथळे येत असल्याने नोंदणीसाठी नाहक हेलपाटे मारावे लागत आहेत. त्यामुळे नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. एस.टी महामंडळाच्या सर्व गाडयांमध्ये, महिला सन्मान योजनेअंतर्गत महिलांना तिकीट दरात 50 टक्के सवलत देण्यात आली आहे; तसेच 65 ते 75 वर्षे वयोगटातील 50 टक्के सवलत आणि 75 वर्षांवरील नागरिकांना अमृत जेष्ठ नागरिक योजना अंतर्गत मोफत प्रवास उपलब्ध आहे. दिव्यांगासह विविध घटकांनाही एसटीत तिकीट दरात सवलत देण्यात आलेली आहे. त्यामुळे प्रवाशांचा ओढा एसटीकडे वाढतो. मात्र आता एसटी महामंडळाने नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (एनसीएमसी) प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील वल्लभनगर आगारातमध्येही स्मार्ट कार्डची नोंदणी सुरू झाली आहे; मात्र, नोंदणीप्रकियेत विविध समस्या येत असल्यामुळे प्रवाशांना नाहक हेलपाटे मारण्याची वेळ येत आहे. आगाराच्या ढिसाळ कारभारामुळे नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली आहे. तसेच होळीनंतर नोंदणी प्रकिया सुरू होणार आहे. विद्यार्थी, जेष्ठ, नगारिक तसेच 75 वर्षावरील महिला, दिव्यांग, स्वातंत्र्यसैनिक, त्यासह राज्यस्तरीय पुरस्कार विजेते यांना सवलतीसाठी एमसीएमसी कार्ड बंधनकारक करण्यात आलेले आहे. एसटी महांमडळाच्या या उपक्रमाचा मुख्य उद्देश सवलतीची अचूक नोंद, पारदर्शक प्रतिपूर्ती, रोख व्यवहार करणे हा आहे. हे कार्ड फक्त ओळखपत्र नसून प्री-पेड वॉलेट म्हणून काम करते.

# सौरऊर्जा प्रकल्पाचे राहुल कलाटे यांच्या हस्ते उद्‌घाटन

■ सोसायटीचा निर्धार आणि सरकारची साथ, वाकडमध्ये सुरू झाला १२० किलोवॅटचा सौरऊर्जा प्रकल्प, महिन्याला २.३० लाख बिलाची बचत होणार ■

वाकड (दै. संध्या) :

सरकारी काम आणि सहा महिने थांब हा अनुभव अनेकदा येतो मात्र वाकड मधील प्रिस्टीन प्रोलाइफ फेज 3 सोसायटीचा अनुभव काहीसा वेगळा आहे. महावितरणच्या सर्व परवानग्या आणि प्रक्रिया पूर्ण होऊन अवघ्या चार महिन्यात सौरऊर्जा प्रकल्पाचे उद्‌घाटनही झाले. यासाठी सोसायटीला २१.६७ लाख रुपयांचे सरकारी अनुदान मिळाले. वाकडमधील प्रिस्टीन प्रोलाईफ फेज ३ सोसायटीत (Pristine Prolife Phase 3, Wakad) नुकताच १२० किलोवॅट क्षमतेचा रूफटॉप सौर ऊर्जा प्रकल्प यशस्वीरित्या कार्यान्वित करण्यात आला. दि.१ मार्च रोजी प्रकल्पाचे उद्‌घाटन स्थानिक नगरसेवक राहुल कलाटे यांच्या हस्ते संपन्न झाले. सुमारे ७६ लाख रुपये



खर्चून उभारण्यात आलेल्या या प्रकल्पासाठी शासनाकडून २१.६७ लाख रुपयांचे अनुदान प्राप्त झाले आहे. तर सोसायटी सभासदांनी प्रत्येकी ७००० अशी वर्गणी जमा करून उर्वरित योगदान दिले. यातून सोसायटीचे दर महिन्याला सुमारे २ लाख ३० हजार इतके वीज बिलाची बचत होणार असून सोसायटीवरील आर्थिक भार कमी होणार आहे. परिणामी हा उपक्रम किफायतशीर व दीर्घकालीन बचत करणारा ठरेल. प्रिस्टीन प्रोलाइफ फेज 3 सोसायटीचा हा उपक्रम शाश्वत विकासाच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण व अनुकरणीय पाऊल ठरेल, असे म्हणत राहुल कलाटे यांनी सोसायटीच्या सदस्यांचे कौतुक केले. हरित ऊर्जा हेच भविष्यातील ऊर्जा स्त्रोत असून नागरी विकासासोबत पर्यावरणाचा समतोल राखणे ही सर्वांची जबाबदारी आहे, असेही ते म्हणाले.

> "प्रिस्टीन प्रोलाइफ फेज ३ सोसायटीतील सदस्यांनी राबवलेला उपक्रम अत्यंत स्तुत्य असून लोकसहभाग, सरकारी प्रक्रियेतील पारदर्शकता आणि गतिमानता, या सगळ्यांच्या संयुक्त परिणामातून हा प्रकल्प अवघ्या चार महिन्यात आकाराला आलाय. सरकारची मदत आणि कालमर्यादा यासाठी हा प्रकल्प संपूर्ण शहरात 'रोल मॉडेल' ठरेल. असे प्रकल्प इतर सोसायटीत राबवले गेले पाहिजेत."
> – राहुल कलाटे , नगरसेवक, पिंपरी चिंचवड महापालिका

सौर प्रकल्पामुळे सोसायटीच्या वीज खर्चात लक्षणीय बचत होणार असून पर्यावरणपूरक व शाश्वत ऊर्जेच्या वापराला मोठी चालना मिळणार आहे.

असे मत सोसायटीचे सचिव स्वरूप पाटील यांनी व्यक्त केले. सुरुवातीला सर्व सदनिका धारकांना विश्वासात घेऊन त्यांना संपूर्ण उपक्रमाचा फायदा समजावून सांगितला. त्यामुळे सर्वांनी वर्गणी देऊन या प्रकल्पाला गती दिली. असे सोसायटी अध्यक्ष अल्पेष म्हणाले.

कार्यक्रमास नगरसेवक राहुल कलाटे, सोसायटीचे अध्यक्ष अल्केश चरपे, सचिव स्वरूप पाटील, खजिनदार अरविंद, अनुराग शिरोडे, भीवाजी सूर्यवंशी, श्रीधर घरपुरे, प्रशांत गोरे, अनुराग तिवारी तसेच इतर सोसायटी सदस्य व रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सोसायटी समितीचे सातत्यपूर्ण प्रयत्न आणि रहिवाशांच्या सहकार्यामुळे हा प्रकल्प यशस्वीरित्या पूर्णत्वास गेला आहे.

## आयसीसी टी-२० सट्टा, चेक फसवणूक व मारहाणीचे प्रकार उघड

पिंपरी (दै. संध्या) :

आयसीसी टी-20 क्रिकेट सामन्यावर मोबाइलद्वारे सट्टा घेत असल्याची माहिती मिळाल्यानंतर गुन्हे शाखेने छापा टाकला. ही कारवाई रविवार (दि. 1) रात्री दहाच्या सुमारास पिंपळे सौदागर येथील ईश्वरी निवास सोसायटीतील फ्लॅटमध्ये करण्यात आली.

जयकुमार सुरेश धनवानी (36, रा. विश्वशांती कॉलनी नं. 2, पिंपळे सौदागर), साहिल सुरेंद्र मंगवानी (25, रा. साई चौक रोड, पिंपरी), विकी जामनदास लोहाना (34, रा. साई चौक रोड, पिंपरी), विकी लालवाणी, जितू माकीजा आणि निलेश रामरख्यानी अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहे. गुन्हे शाखेच्या खंडणी विरोधी पथकातील पोलिस अंमलदार प्रदीप गोरखनाथ मोडांबे (40) यांनी सोमवार (दि. 2) सांगवी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

आरोपी मोबाईल कॉलद्वारे सट्टा स्वीकारत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार खंडणी विरोधी पथकाने रविवारी पिंपळे सौदागर येथील एका सोसायटीमध्ये छापा घातला. कारवाई दरम्यान पोलिसांनी सात मोबाइल फोन, रोख रक्कम, वही व पेन असा एकूण सहा लाख 57 हजार 850 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.


## निगडी ते आकुर्डी मार्गावर महामेट्रोच्या कामामुळे नागरिक त्रस्त

*रस्त्याची दुरुस्ती तातडीने करावी; मनसेकडून 'चक्का जाम'चा इशारा*

पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील निगडी सिग्नल ते चिंचवड स्टेशन या मुख्य मार्गावर सुरू असलेल्या महामेट्रोच्या कामामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असल्याची तक्रार पुढे आली आहे. गेल्या एक ते दीड वर्षांपासून सुरू असलेल्या या कामामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून अनेक लहान-मोठे अपघात घडत आहेत. या रस्त्याचे तातडीने डांबरीकरण करून नागरिकांना दिलासा द्यावा, अन्यथा २५ मार्च रोजी निगडी सिग्नल येथे मनसेच्या वतीने चक्का जाम आंदोलन करण्यात येईल,





असा इशारा मनसेचे शहराध्यक्ष सचिन चिखले यांनी दिला आहे.

निगडी सिग्नल ते आकुर्डी दरम्यानचा रस्ता हा शहरातील अत्यंत वर्दळीचा मार्ग मानला जातो. या मार्गावरून दररोज हजारो प्रवासी तसेच मोठी आणि लहान वाहने ये-जा करतात. मात्र, महामेट्रोच्या कामामुळे रस्त्याची अवस्था बिकट झाली असून नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत मनसेचे पिंपरी-चिंचवड अध्यक्ष तथा माजी नगरसेवक सचिन चिखले यांनी महापालिका आयुक्तांकडे निवेदन दिले आहे.

"महामेट्रोकडे मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध असतानाही कामाकडे दुर्लक्ष केले जात आहे. यामुळे नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे," असे त्यांनी नमूद केले. तसेच श्रीकृष्ण मंदिर परिसरातील रस्ता गेल्या एक वर्षापासून खोदून ठेवला असून तेथे कोणतेही काम झाले नसल्याचीही तक्रार त्यांनी केली. रस्त्याचे तातडीने डांबरीकरण करून नागरिकांना दिलासा द्यावा, अन्यथा २५ मार्च रोजी निगडी सिग्नल येथे मनसेच्या वतीने चक्का जाम आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

## महापालिकेच्या सर्वसाधारण सभेचे 'लाईव्ह' प्रक्षेपण करा

**विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांची मागणी**

पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचे कामकाज नागरिकांना थेट पाहता यावे, यासाठी ते 'लाईव्ह' (थेट प्रक्षेपण) करण्याची मागणी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी केली आहे. याबाबत त्यांनी महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांना निवेदन दिले आहे. भाऊसाहेब भोईर यांनी म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका ही राज्यातील महत्त्वाची आणि 'स्मार्ट सिटी' म्हणून ओळखली जाणारी महानगरपालिका आहे. शहराच्या विकासासंबंधी महत्त्वाचे निर्णय सर्वसाधारण सभेत घेतले जातात. विविध विकासकामांवर चर्चा, ठराव मंजुरी आणि करदात्या नागरिकांच्या निधीचे नियोजन याच सभेत होते. सध्याच्या डिजिटल युगात नागरिकांना त्यांच्या लोकप्रतिनिधींचे कामकाज प्रत्यक्ष पाहण्याची अपेक्षा आहे. प्रशासनात पारदर्शकता राहावी आणि लोकशाहीवरील विश्वास वृद्धिंगत व्हावा, यासाठी सभेचे कामकाज महानगरपालिकेच्या अधिकृत युट्यूब चॅनेल किंवा फेसबुक





पेजवरून थेट प्रक्षेपित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका आणि पुणे महानगरपालिका येथे सर्वसाधारण सभेचे कामकाज 'लाईव्ह' दाखविण्याची सुविधा उपलब्ध असून, पिंपरी-चिंचवडसारख्या स्मार्ट सिटीमध्येही हा उपक्रम राबविणे सहज शक्य असल्याचे भोईर यांनी स्पष्ट केले आहे. जनहित आणि पारदर्शकता लक्षात घेऊन आगामी सर्वसाधारण सभेपासून हे कामकाज 'लाईव्ह' करण्याबाबत संबंधित विभागाला त्वरित आदेश द्यावेत, अशी मागणी भाऊसाहेब भोईर यांनी केली आहे.

## पीसीएमसी अर्थसंकल्प २०२६-२७ वर आर्थिक निर्बंध

पिंपरी (दै. संध्या) :

आयुक्तांनी तयार केलेल्या सन 2026-27 च्या अर्थसंकल्पात स्थायी समिती तसेच, सर्वसाधारण सभेकडून असंख्य उपसूचना दिल्या जातात. मात्र, तीन ऑक्टोबर 2024 च्या नवीन आर्थिक धोरणामुळे तरतुदीमध्ये वाढ व घट करता येणार नाही. नवीन कामांचा समावेश करता येत नाही. खर्चापैकी किमान 25 टक्के तरतूद बंधनकारक आहे. या निर्बंधामुळे स्थायी समितीसह सर्वसाधारण सभेला उपसूचना तसेच, तरतूदींमध्ये वाढ व घट करताना बरीच कसरत करावी लागणार आहे. स्थायी समिती अध्यक्षपदी अभिषेक बारणे यांची निवड शनिवारी (दि. 28) झाली. त्या विशेष सभेनंतर लगेच आयुक्तांनी अध्यक्ष बारणे यांच्याकडे सन 2026-27 चा अर्थसंकल्प सादर केला. ती सभा बुधवारी (दि. 4) दुपारी 2.30 पर्यंत तहकूब करण्यात आली आहे. तहकूब सभेत उपसूचना देऊन समितीकडून अर्थसंकल्पाची शिफारस सर्वसाधारण सभेकडे केली जाईल. महापालिकेच्या 3 ऑक्टोबर 2024 च्या नवीन आर्थिक धोरणामुळे अर्थसंकल्पात आर्थिक निर्णय घेताना बरेच निर्बंध लादले गेले आहेत.

## १० स्वीकृत नगरसेवकांची निवड

भाजपाला ७, राष्ट्रवादीला ३ जागा?

पिंपरी (दै. संध्या) :

■ अर्ज स्वीकृती 4 मार्चला; राजकीय वर्तुळात उत्सुकता, एक वर्षाच्या फॉर्म्युल्यावर चर्चा

पिंपरी-चिंचवड महापालिकेत 128 नगरसेवकांव्यक्तिरिक्त आणखी दहा स्वीकृत नगरसेवकांची नियुक्ती करण्यात येणार आहेत. त्यासाठी महापालिकेतील नगर सचिव विभागात बुधवार (दि. 4) दुपारी 3 ते सायंकाळी 6 या वेळेत उमेदवारी अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. सत्ताधारी भाजपा कोणत्या 7 जणांना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून कोणत्या 3 जणांना संधी मिळणार, याकडे राजकीय क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

महापालिकेत एकूण 128 जागी नगरसेवक निवडून आले आहेत. त्यातील दोन जागा हा बिनविरोध निवडून आल्या आहेत. महापालिकेत सलग दुसऱ्यांदा भाजपाने सत्ता काबीज केली आहे. भाजपाचे 84 नगरसेवक आहेत. तर, विरोधातील राष्ट्रवादी काँग्रेसचे 37, शिवसेनेचे (एकनाथ शिंदे) 6 नगरसेवक आहेत. नगरसेवक संख्याबळानुसार सत्ताधारी भाजपाचे 7 आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडून 3 जणांना स्वीकृत नगरसेवक म्हणून संधी दिली जाणार आहे. महापालिकेची पहिली सर्वसाधारण सभा झाल्यानंतर लगतच्या सर्वसाधारण सभेत स्वीकृत नगरसेवकांची नियुक्ती करण्याचा नियम आहे. त्यानुसार 13 मार्च रोजीच्या सर्वसाधारण सभेत स्वीकृत नगरसेवकांची नियुक्ती केली जाणार आहे. त्यासाठी स्वीकृत नगरसेवकांच्या नावाची शिफारस करण्याच्या सूचना आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी सत्तारुढ पक्षनेते प्रशांत शितोळे आणि विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांना केली आहे. ती नावे सोमवार (दि.2) पर्यंत सादर करण्यास सांगण्यात आले होते. मात्र, त्या दिवशी स्वत: आयुक्त हजर नसल्याने बुधवार (दि. 4) गटनेत्यांच्या शिफारशीने नावे सादर करण्यात सांगण्यात आले आहे. स्वीकृत नगरसेवक पदासाठी उमेदवारी अर्ज नगरसचिव विभागात दुपारी तीन ते सायंकाळी 6 या वेळेत स्वीकारण्यात येणार आहेत.

# निरा नदी पडली काळी

सांगवी (दै. संध्या) :

■ बारामती-फलटण प्रकल्पांतील रसायनमिश्रित सांडपाण्याने प्रदूषण भीषण

■ साखर कारखाने, दूध प्रकल्प आणि कत्तलखान्यांतील सांडपाण्याचा थेट नदीत विसर्ग; आरोग्य व शेतीसमोर गंभीर संकट



> शेतातील पिकांना नदीचे पाणी देताना शेतकऱ्यांच्या अंगाला खाज सुटते. काही नागरिकांना रस्त्यावरून जाताना पाण्याच्या दुर्गंधीमुळे उलट्यांचा त्रास होतो. उग्र वासामुळे लहान बालकांना विविध शारीरिक समस्या निर्माण होऊ लागल्या आहेत. काहींना आरोग्यांच्या तक्रारी उद्भवू लागल्या आहेत. अशा एक ना अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. या बाबीकडे प्रशासनाकडून अक्षम्य दुर्लक्ष केले जात आहे.

बारामती व फलटण तालुक्याच्या सीमेवरून वाहणाऱ्या निरा नदीत या दोन्ही तालुक्यांतील सहकारी व खासगी प्रकल्पांतील रसायनमिश्रित सांडपाण्याने प्रदूषण वाढले आहे. यामुळे नदीच्या पाण्याला काळा रंग चढला आहे. परिणामी नदीकाठच्या भागातील नागरिकांतून अक्षरशः काळ्या पाण्याची शिक्षा भोगावी लागत असल्याची संतप्त भावना व्यक्त केली जात आहे. नदीत सोडण्यात येत असलेल्या या रसायनमिश्रित पाण्याकडे राजकीय नेत्यांसह प्रशासकीय यंत्रणेचे गेली वीस वर्षे दुर्लक्ष होत आहे. या दूषित पाण्यामुळे नदीकाठच्या नागरिकांना जगणे मुश्किल झाले असून, शेतातील पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. या गंभीर प्रकरणाची कोणताही राजकीय पक्ष व प्रशासन दखल घेत नाही. त्यामुळे याबाबत नेमकी दाद मागायची कोणाकडे? असा सवाल उपस्थित होऊ लागला आहे. फलटण तालुक्यातील खासगी दूध प्रकल्प, सहकारी आणि खासगी साखर कारखाने, जनावरांचा कत्तलखाना, फलटण नगरपरिषद आदी प्रकल्पांतील रसायनमिश्रित सांडपाण्यावर कोणत्याही प्रकारची प्रक्रिया न करताच थेट ओढ्यावाटे निरा नदीच्या पाणलोट क्षेत्रात सोडले जात आहे. या सांडपाण्यामुळे नदीकाठच्या भागात मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी पसरली आहे.

परिणामी नदीकाठच्या नागरिकांना घरातही राहणे मुश्किल झाले आहे. नदीकाठच्या चांगल्या जमिनी क्षारपड झाल्याने पिकांचा उत्पादन खर्चही निघत नाही. यातून शेतकऱ्यांना मानसिक व आर्थिक नुकसान सोसावे लागत आहे.

फलटण तालुक्यातील प्रकल्पांमुळे शिरवली बंधाऱ्यातील पाणी दूषित झाले आहे. बारामती तालुक्यातील माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या रसायनमिश्रित सांडपाण्यामुळे निरावागज बंधाऱ्याच्या पाणलोट क्षेत्रातील पाणी प्रदूषित झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. या दोन्ही बंधाऱ्यांच्या पाणलोट क्षेत्रातील जलचर प्राणी मृत पावल्याने मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी पसरली आहे.

हे पाणी ऑईलपेक्षाही काळे दिसत आहे. नदीकाठच्या नागरिकांना, जनावरांच्या आरोग्यावर व शेतीला मोठा धोका निर्माण झाला आहे. आता उन्हाळ्याच्या दिवसांत या प्रदूषित पाण्याचा रंग एका दिवसात तीन वेळा बदलताना दिसतो. सकाळी हिरवा, दुपारी पिवळसर, तर संध्याकाळी काळा असा पाण्याचा रंग बदलत असतो.

# भुलेश्वर येथे बी.एड. विद्यार्थ्यांचा सामुदायिक सहभागाचा आदर्श उपक्रम

## थोडक्यात पण महत्वाचे...



### इलेक्ट्रॉनिक म्युझियम हे नव्या संधी उघडणारे केंद्र ठरेल : डॉ. अमोल कोल्हे

नारायणगाव (दैनिक संध्या) : इलेक्ट्रॉनिक म्युझियम केवळ एक दालन नसून, तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी ज्ञान, संशोधन आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या नव्या संधी उघडणारे केंद्र ठरेल, असा विश्वास शिरूर लोकसभेचे खासदार डॉ अमोल कोल्हे यांनी यावेळी व्यक्त केला. जुन्नर तालुक्यातील बेल्हे येथे समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित,समर्थ कॉलेज ऑफ इंजीनिअरिंग अँड मॅनेजमेंट येथे इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या इलेक्ट्रॉनिक्स म्युझियमचे उद्घाटन खासदार डॉ.अमोल कोल्हे आणि माजी आमदार अतुल बेनके यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच काही गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांच्या मेहनतीचे व यशाचे कौतुक करण्यात आले. या म्युझियम मध्ये इलेक्ट्रॉनिक्सच्या मूळ संकल्पना, कॅपॅसिटर, रेसिस्टर,ट्रांजिस्टर यांपासून तयार केलेले सर्किट आणि त्यांची कार्यप्रणाली प्रदर्शित करण्यात आली आहे. याप्रसंगी माजी आमदार अतुल बेनके यांनी उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, इलेक्ट्रॉनिक्स ची माहिती नसणाऱ्या व्यक्तींमध्ये हे प्रदर्शन पाहिल्यावर कुतूहल निर्माण होईल. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी मिळून त्यांच्या उज्वल भविष्यास निश्चितच दिशा मिळेल. असे यावेळी त्यांनी सांगितले.

### कोठारी यांना युवा उद्योजक पुरस्कार प्रदान

नारायणगाव (दैनिक संध्या) : ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचे विश्वासू सहकारी (स्व.) सुखाशेठ जाधव फुलवाले यांनी आंबेगाव तालुक्यातील अनेकांना मुंबईत रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. गोरगरिबांच्या मदतीसाठी आयुष्यभर झटलेल्या या कार्यकर्त्याच्या २०व्या स्मृतिदिनानिमित्त जाधववाडी (ता. आंबेगाव) येथे विविध मान्यवरांचा गौरव सोहळा पार पडला. यावेळी जुन्नर तालुक्यातील नारायणगाव येथील रहिवासी अभय दिलीप कोठारी यांना म्हाडाचे अध्यक्ष तथा माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या हस्ते तसेच गोवर्धन दूध प्रकल्पाचे देवेंद्र शहा आणि जलसंपदा विभागाचे राज्याचे माजी सचिव व्यंकटराव गायकवाड यांच्या उपस्थितीत 2025-26 चा 'युवा उद्योजक' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### वर्षाताई नाईक यांना 2026 चा राज्यस्तरीय उत्कृष्ट संघटन पुरस्कार जाहीर



कवठे येमाई (दैनिक संध्या) : युवा क्रांती फाउंडेशन अंतर्गत पोलीस मित्र संघटनेच्या वतीने सामाजिक, शैक्षणिक आणि महिला जनजागृती,युवक,युवती संघटन चळवळीमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पुणे,धनकवडी येथील जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या व युवा क्रांती पोलीस मित्र संघटनेच्या राष्ट्रीय युवती उपाध्यक्षा श्रीमती वर्षाताई नाईक यांना सन २०२६ चा "उत्कृष्ट संघटन पुरस्कार" जाहीर करण्यात आला आहे. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रविंद्र सूर्यवंशी यांनी ही माहिती दिली. गेल्या अनेक वर्षांपासून वर्षाताई नाईक या युवा क्रांती संघटनेच्या माध्यमातून महिला,युवती,युवकांचे संघटन बांधणे, शहरी,ग्रामीण भागातील तरुण-तरुणींना मार्गदर्शन करणे, सामाजिक उपक्रम राबवणे तसेच विविध जनजागृती कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन करत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली संघटनेचे कार्य अधिक गतिमान झाले असून अनेक युवती,युवक,महिला संघटनेशी सक्रियपणे जोडले गेले आहेत.पुरस्कार जाहीर झाल्यानंतर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी वर्षाताई नाईक यांचे अभिनंदन करत त्यांच्या कार्याचे कौतुक केले. "त्यांचे कार्य संघटनेसाठी प्रेरणादायी असून भविष्यात ही त्या संघटनेची धुरा समर्थपणे सांभाळतील," असे मत संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रविंद्र सूर्यवंशी व पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले. हा पुरस्कार लवकरच शिर्डी येथे आयोजित करण्यात येणाऱ्या संघटनेच्या चोथ्या वर्धापनदिनाच्या विशेष कार्यक्रमात श्रीमती वर्षाताई नाईक यांना मान्यवरांच्या हस्ते व उपस्थितीत प्रदान करण्यात येणार आहे.वर्षाताई यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याने विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करीत त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.




### अष्टविनायक महामार्गावर इचकेवाडी,बंटी धाब्याजवळ तात्काळ गतिरोधक बसवा

■ शिरूर पंचायत समिती सदस्या कांचनताई सांडभोर यांची मागणी

कवठे येमाई (दैनिक संध्या) : शिरूरच्या पश्चिमेकडील कवठे येमाई इचकेवाडी परिसरातुन जाणाऱ्या गतिमान वाहनातून असलेल्या अष्टविनायक महामार्गावर बंटी धाब्याजवळ व त्याच परिसरात इतर ही ठिकाणी वारंवार होणाऱ्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर तात्काळ झिक झाक गतिरोधक (स्पीड ब्रेकर) बसविण्याची मागणी शिरूर पंचायत समिती सदस्या कांचनताई राजेश सांडभोर यांनी केली आहे. रस्ता गतिमान झाल्याने या महामार्गावरून वाहनांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ सुरु असते. धाबा, स्थानिक दुकाने आणि गावाकडे,वस्ती वाडीकडे वळणारे अनेक रस्ते यामुळे पादचारी, शालेय विद्यार्थी,शेतकरी,दुग्धव्यवसायिक तसेच नागरिकांना रस्ता ओलांडताना अनेकदा मोठा धोका निर्माण होतो. याच अष्टविनायक महामार्गावर कवठे येमाई गावठाण,इचकेवाडी,खार ओढा,काळूबाई नगर,बंटी ढाब्या नजीक अनेकदा किरकोळ तसेच गंभीर स्वरूपाचे अपघात घडले असून नागरिकांना शारीरिक व आर्थिक नुकसान सहन करावे लागले आहे.तर अनेकांना अपघातात जीव देखील गमवावे लागले आहेत. कांचनताई सांडभोर यांनी संबंधित सार्वजनिक बांधकाम विभाग व प्रशासनास या परिसरात महामार्गावर तात्काळ गतिरोधक, सूचना फलक आणि वेगमर्यादा दर्शविणारे बोर्ड लावण्याची मागणी केली आहे. तसेच रात्रीच्या वेळी पुरेशी प्रकाशयोजना करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.स्थानिक नागरिकांनीही या मागणीला पाठिंबा दर्शवून प्रशासनाने त्वरित कारवाई करावी, अन्यथा या प्रश्नी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

---

## भुलेश्वर येथे बी.एड. विद्यार्थ्यांचा सामुदायिक सहभागाचा आदर्श उपक्रम

**यवत (दै. संध्या)**




सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न सुभाषअण्णा कुल शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पाटस (ता. दौंड, जि. पुणे) येथील प्रथम वर्ष बी.एड. अभ्यासक्रमातील कोर्स कोड 208 – व्यक्तिगत सहभाग व सामुदायिक सहभाग या विषयांतर्गत महाविद्यालयाच्या वतीने एक अभिनव व समाजोपयोगी उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला.

महाविद्यालयाने या उपक्रमासाठी भुलेश्वर देवस्थान परिसर व माळशिरस गावाची निवड केली होती. दि (1) रोजी सकाळी 9 ते दुपारी 4 या वेळेत पार पडलेल्या या उपक्रमात बी.एड. विद्यार्थी-शिक्षकांनी प्रत्यक्ष समाजाशी नाते जोडत विविध उपक्रम राबवले.

संयुक्त आयोजन व सहकार्य

हा उपक्रम ग्रामपंचायत माळशिरस व सुभाषअण्णा कुल शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पाटस यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आला. उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी महाविद्यालयाच्या आदरणीय प्राचार्या डॉ. नीलिमा नारायण तिखे, सर्व प्राध्यापक वर्ग व प्राध्यापकेतर कर्मचारी सातत्याने प्रयत्नशील होते.

उपक्रमाचे प्रास्ताविक प्रा. भानुदास पोमणे यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामपंचायत माळशिरसच्या सरपंच सौ. आरती यादव तसेच पंचायत समिती सदस्य मा. माऊली यादव उपस्थित होते. मान्यवरांचे स्वागत प्राचार्या डॉ.नीलिमा तिखे, प्रा. विजय जाधव व प्रा. संतोष वळू यांनी केले.

यावेळी ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कर्मचारी व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. विजय गायकवाड यांनी केले. तसेच या विभागाचे विभागप्रमुख म्हणून त्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीस मोलाचे सहकार्य केले. सरपंच सौ. आरती यादव यांनी महाविद्यालयाच्या या उपक्रमाचे कौतुक करत, अशा प्रकारचे समाजाभिमुख उपक्रम परिसरात पुन्हा पुन्हा राबवावेत, असे आवाहन केले. ग्रामपंचायत व सदस्यांनी भविष्यातही सर्वतोपरी सहकार्य करण्याची भावना व्यक्त केली.

अल्पोपहारानंतर हा उपक्रम यशस्वीपणे संपन्न झाला. परिसरातील विविध गावांतून या उपक्रमाचे कौतुक होत असून, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी समाजाशी जोडलेला शिक्षणाचा आदर्श वस्तुपाठ या उपक्रमातून घडवला, असे गौरवोद्गार उपस्थितांनी काढले.

या पथनाट्यांच्या माध्यमातून श्रमसंस्कृती, स्वच्छता व आधुनिक डिजिटल ज्ञानाचे महत्त्व प्रभावीपणे अधोरेखित करण्यात आले.

**उपक्रमांची ठळक वैशिष्ट्ये**

- भुलेश्वर मंदिर परिसरात सामुदायिक स्वच्छता मोहीम
- वृक्षलागवड व वृक्षसंवर्धन
- माळशिरस गावात डिजिटल साक्षरता अभियान
- पर्यावरण संरक्षण, सार्वजनिक स्वच्छता, श्रमाचे महत्त्व, आरोग्य संवर्धन व डिजिटल साक्षरता या विषयांवर प्रभावी पथनाट्य
- भाविक व ग्रामस्थांशी थेट संवाद साधून जनजागृती

---



## बाधितांना ३ कोटी रुपयाहून अधिक रक्कम धनादेशाद्वारे अदा

**बारामती (दै. संध्या)**

उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर यांच्या उपस्थितीत मौजे कऱ्हावागज येथील २२.३० हेक्टर आर क्षेत्र नवीन पदवी पशु वैदयकीय व पशु विज्ञान महाविद्यालय स्थापनेकरिता खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने भुसंपादनाची कार्यवाही करण्यात आली आहे. मौजे कऱ्हावागज येथील संपादन होणाऱ्या गट नंबर ७४ पैकी ०.६४३० हेक्टर आर.चौरस मीटर, गट क्रमांक ७२ पैकी १.९४९० हेक्टर आर. चौरस मीटर क्षेत्राचे खरेदी खत करण्यात आले. या गटाचे खातेदार रघुनाथ नाळे, नंदिनी बाळासो गाढवे व इतरांना नुकसान भरपाईचा मोबादला एकूण ३ कोटी ३४ लाख ३३ हजार ५ रुपयाचा धनादेश उपविभागीय अधिकारी बारामती यांच्या हस्ते व महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विदयापीठ नागपूर तर्फे डॉ. विकास वासकर यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आले.

## पुणेकरांसाठी ग्रामीण संस्कृतीची मेजवानी!

**७ मार्चपासून 'मिनी सरस : सावित्री जत्रा' प्रदर्शनाचे आयोजन**

**नाझरे सुपे (दै. संध्या)**

ग्रामीण भागातील महिला बचत गटांच्या हाताला काम आणि त्यांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ मिळवून देण्यासाठी जिल्हा परिषद, पुणे आणि 'उमेद' - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातर्फे 'मिनी सरस: सावित्री जत्रा' या भव्य जिल्हास्तरीय विक्री प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रदर्शन ७ मार्च ते ११ मार्च २०२६ या कालावधीत शिवाजीनगर येथील ॲग्रीकल्चर कॉलेज मैदानावर रंगणार आहे.

पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने आयोजित केल्या जाणाऱ्या या प्रदर्शनाचे मुख्य उद्दिष्ट ग्रामीण भागातील महिला उद्योजिकांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हे आहे. 'पुणेकरांची शॉपिंग म्हणजे फक्त खरेदी नसते, तर ती असते निर्णयक्षमता' आणि 'ग्रामीण संस्कृती अनुभवायला तयार आहात ना?' अशा आकर्षक संकल्पनांसह हे प्रदर्शन पुणेकरांच्या भेटीला येत आहे.




प्रदर्शनातील मुख्य आकर्षणे:

या पाच दिवसीय जत्रेत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडणार आहे. यामध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश असेल:

अस्सल ग्रामीण खाद्यपदार्थ: घरगुती पद्धतीने तयार केलेले मसाले, चटण्या, पापड, लोणची आणि विविध पारंपरिक खाद्यपदार्थांची मेजवानी.

हस्तकला आणि कलाकुसर: ग्रामीण कारागिरांनी हाताने तयार केलेल्या आकर्षक वस्तू, बांबूकाम, मातीकाम आणि गृहसजावटीचे साहित्य.

ग्रामीण फॅशन आणि दागिने: हाताने विणलेली वस्त्रे आणि पारंपरिक दागिने यांचे वैविध्यपूर्ण स्टॉल्स.

सांस्कृतिक ठेवा: प्रदर्शनाच्या निमित्ताने पुणेकरांना ग्रामीण जीवनशैली आणि संस्कृती जवळून अनुभवता येईल.

पुणे जिल्हा परिषदेने हे प्रदर्शन सर्व सामान्य नागरिकांसाठी पूर्णपणे विनामूल्य ठेवले असून, मोठ्या संख्येने पुणेकरांनी या प्रदर्शनाला भेट द्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. या प्रदर्शनामुळे केवळ ग्राहकांना दर्जेदार वस्तू मिळतील असे नाही, तर ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणाला मोठा हातभार लागणार आहे.

जिल्हा परिषद पुणे आणि उमेद अभियानाच्या वतीने सांगण्यात आले की, "पुणेकर नेहमीच दर्जेदार आणि नवनवीन गोष्टींचे स्वागत करतात. ग्रामीण भागातील भगिनींनी अत्यंत कष्टाने आणि कौशल्याने तयार केलेल्या वस्तू थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी हे प्रदर्शन एक दुवा ठरेल. त्यामुळे पुणेकरांनी या सावित्री जत्रेला नक्की भेट द्यावी."

**प्रदर्शनाची वेळ आणि स्थळ:**
दिनांक: ७ मार्च ते ११ मार्च २०२६
वेळ: सकाळी १०:०० ते रात्री १०:०० (अंदाजे)
स्थळ: ॲग्रीकल्चर कॉलेज मैदान, सिंचन नगर, शिवाजीनगर, पुणे - ४११००५.
विशेष आवाहन: "नक्की भेट द्या!"

---

## खोडद येथील विज्ञान प्रदर्शनात २३० हून अधिक प्रकल्पांचे सादरीकरण



**नारायणगाव (दै. संध्या)**

आकाशातील गूढ विश्वाचा शोध घेणाऱ्या खोडद (ता. जुन्नर) येथील जायंट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोप (जीएमआरटी) परिसरात जागतिक विज्ञान दिनानिमित्त भव्य विज्ञान प्रदर्शन संपन्न झाले. या दोन दिवसीय विज्ञानाच्या जत्रेत सुमारे 230 विज्ञान प्रकल्प सादर झाले असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या जिज्ञासू वृत्तीने आणि कल्पकतेने उपस्थित मान्यवरांची मने जिंकली.


या प्रदर्शनाचे उद्घाटन पुणे येथील राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्राचे संचालक डॉ. कौशिक बॅनर्जी यांच्या हस्ते झाले. यावेळी जीएमआरटीचे केंद्र संचालक डॉ. यशवंत गुप्ता, अधिष्ठाता ईश्वर चंद्रा, डॉ. सदानंद राऊत, सरपंच मनीषा गुळवे यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी अवकाश संशोधन, पर्यावरण, आरोग्य, शेती तंत्रज्ञान आणि रोबोटिक्स अशा वैविध्यपूर्ण विषयांवर आपल्या प्रतिकृती सादर केल्या होत्या. वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी अभिजित जोंधळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले.

जगप्रसिद्ध दुर्बिणींच्या साक्षीने भरलेल्या या विज्ञान प्रदर्शनाने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला नवे आकाश दिले आहे. खोडदच्या जीएमआरटीमध्ये रंगलेली ही 'विज्ञानाची जत्रा' केवळ प्रकल्पांचे प्रदर्शन न ठरता, भविष्यातील वैज्ञानिक घडवण्याची नांदी ठरली आहे. शालेय स्तरावरील या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक दृष्टी निर्माण होत असल्याचे दिसून आले.

> "विज्ञान माणसात प्रश्न निर्माण करते आणि त्या प्रश्नांची चिकित्सा करायला शिकवते. जिज्ञासा हीच प्रगतीची खरी ताकद आहे. ड्रोन व एआय तंत्रज्ञानामुळे शेतीत मोठी क्रांती झाली असून, विज्ञान केवळ प्रयोगशाळेत मर्यादित न राहता ते शेतात आणि दैनंदिन जीवनात उतरले पाहिजे."
> **– डॉ. कौशिक बॅनर्जी, संचालक, राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र**

> "हे विज्ञान प्रदर्शन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी व्यासपीठ ठरत आहे. दरवर्षी सहभागी विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे, हे विज्ञानाविषयी वाढत्या आकर्षणाचे लक्षण आहे. विज्ञान माणसाला विवेक, विनम्रता आणि चिकित्सक दृष्टी देते."
> **– डॉ. यशवंत गुप्ता, केंद्र संचालक, जीएमआरटी**

## चाकण : दिंडीतील भाविकांचे स्वागत



**चाकण (दै. संध्या)**

ज्ञानोबा तुकोबाचा जयघोष करत टाळ मृदुंगाच्या गजरात तुकाराम बीजेनिमित्त देहू येथे पायी निघालेल्या दिंडीतील भाविकांना चाकणमध्ये आरके ग्रुप, राहुल दादा कांडगे मित्र परिवार व शामभाऊ राक्षे मित्र मंडळाच्या वतीने चहा, पिण्याचे पाणी व बिस्किटांचे वाटप करत स्वागत करण्यात आले. चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, नगरसेविका रूपाली कांडगे, जयश्री नायकवाडी, अनिल लोहकरे आदींनी दिंड्यांतील भाविकांचे स्वागत केले. उद्योजक राहुल कांडगे, उद्योजक शामभाऊ राक्षे, किरण कौटकर, अशोक मांडेकर, योगेश राजापूरकर आदींच्या हस्ते भाविकांना बिस्किटे व पिण्याच्या पाण्याचे वाटप करून त्यांचा सन्मान करण्यात आला.

---

## जुन्नर नगरपालिकेचा १५० कोटी १३ लक्ष रुपये खर्चाचा अर्थसंकल्प मंजूरी

**जुन्नर (दै. संध्या)**

जुन्नर नगरपालिकेची अर्थसंकल्प मंजुरीची सभा दिनांक 27 रोजी सायंकाळी ४ वाजता संपन्न झाली.या सभेमध्ये नगर पालिकेच्या 150 कोटी 13 लक्ष रुपये खर्चास मंजुरी देण्यात आल्याची माहिती जुन्नर नगर पालिकेच्या नगराध्यक्षा सुजाता काजळे यांनी दिली. सभेसाठी नगराध्यक्ष सौ सुजाता काजळे, उपाध्यक्ष रूपाली परदेशी, गटनेता वैष्णवी पांडे, गटनेता विक्रम परदेशी, अलकाताई फुलपगार, समीर पुरवंत,अंजली शिंदे, अनुजा पातुरकर, जाधव, खोंड, मुमताज बानो पटेल, सना मंसूरी, मंदार बुट्टे, नरेंद्र तांबोळी, अनिल रोकडे, कागदी, अकीफ इनामदार, वाजीद इनामदार, साकी सय्यद, प्रशांत सराईकर, मयूर महाबरे, उपस्थित होते. या सभेमध्ये आर्थिक वर्ष 26 - 27 मधील प्रस्थावीत नगरपालिका खर्च, उत्पन्न, शासन योजना इत्यादी विषयांवर चर्चा करण्यात आली. चर्चेमध्ये सर्व सदस्यांनी सहभाग घेतला. व कुठल्याही प्रकारची कर वाढ करू नये अशी भूमिका जुन्नर विकास आघाडीच्या सदस्यांनी घेतली.व नगरपालिका उत्पन्न व खर्च याचा ताळमेळ साधला गेला पाहिजे असे मत मांडले. व कोणत्या प्रकारची कर वाढ करण्यात आली याची माहिती घेण्यात आली. नगरपालिकेच्या वापराविना असलेल्या इमारती एस. एम. जोशी हॉल, वरली आळी सभागृह इ. चा योग्य वापर होऊन शासनाकडून भाडे निर्मिती करून त्या इमारती वापरात आणाव्यात व उत्पन्न वाढवावे असे मत यावेळी मांडण्यात आले. महिला बालकल्याण, दिव्यांग कल्याणकारी योजना याच्यावर ५% तरतूद करून संबंधीत घटकांना जास्तीत जास्त फायदा कसा होईल यासाठी प्रयत्न करावा अशी भूमीका देखील घेण्यात आली. आर्किटेक्ट फी साठी 50 लक्ष रुपये मंजुरीचा निर्णय तातडीने रद्द करावा. व नगर परिषदेतील इंजिनियर व कर्मचारी यांच्याकडून काम करून घ्यावे.

## आळंदीच्या जडणघडणीत सुरेशकाकांचे मोलाचे योगदान : नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे

**माजी नगराध्यक्ष सुरेशकाका वडगावकर यांचा सहस्र चंद्रदर्शन सोहळा उत्साहात**

**आळंदी (दै. संध्या)**

"राजकारणासोबत शिक्षण आणि समाजकारण या क्षेत्रांत सुरेशकाकांनी उभारलेली भक्कम पायाभरणी आजही मार्गदर्शक ठरत आहे. विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे, तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी दूरदृष्टीने काम करत असताना सुरेश काकांचे आळंदीच्या जडणघडणीत योगदान आहे" असे प्रतिपादन नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांनी केले. तीर्थक्षेत्र आळंदीच्या शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जडणघडणीत मोलाची भूमिका बजावणारे माजी नगराध्यक्ष सुरेशकाका वडगावकर यांच्या सहस्र चंद्रदर्शन सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.



नगरपरिषदेच्या वतीने मानपत्र, शाल-श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन सुरेशकाकांचा गौरव करण्यात आला. सोहळ्यास हभप नारायण महाराज जाधव, आमदार बाबाजी काळे, आमदार बापूसाहेब पठारे, आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त भावार्थ देखणे, विश्वस्त चैतन्य महाराज लोंढे, उपनगराध्यक्ष सुजाता तापकीर, शिक्षणाधिकारी डॉ.भाऊसाहेब कारेकर यांच्यासह विविध सामाजिक संस्था, शिक्षणसंस्था आणि वारकरी संप्रदायातील मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी सुरेशकाकांच्या कार्याचा आढावा घेत, त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. सायंकाळी हभप जगन्नाथ महाराज पाटील यांच्या कीर्तनातून सुरेशकाकांच्या जीवनातील कर्मयोग, ज्ञानयोग आणि भक्तियोगाचा वेध घेण्यात आला. ८३ मृदंगांच्या निनादात झालेला हरिपाठ आणि 'माझ्या वडिलांची मिराशी गा देवा' या पंडित कल्याण गायकवाड यांच्या सुमधुर गायनाने वातावरण भारावून गेले.दरम्यान ग्रंथतुला, हस्तलिखित ज्ञानेश्वरी प्रकाशन, संतपूजन, आरोग्य शिबिर, रक्तदान, रांगोळी, निबंध, वक्तृत्व व चित्रकला स्पर्धा तसेच वृक्षारोपण अशा समाजोपयोगी उपक्रमांनी सोहळ्याची उंची अधिकच वाढवली. कार्यक्रमाचे आभार अजित वडगावकर यांनी मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### नेरुळ येथे आरोग्य शिबिर उत्साहात संपन्न

नवी मुंबई (दैनिक संध्या) : नेरुळ मधील सेक्टर २ येथे राजीव गांधी ब्रिजच्या जवळ साई जनसेवा प्रतिष्ठान व सिद्धिविनायक केअर सेंटर चे संचालक डॉ. रविंद्र गोसावी यांच्या संयुक्त विद्यमाने साई भंडाऱ्याच्या निमित्ताने दिनांक २८. २. २६ रोजी भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. सुमारे दोनशे गरजू नागरिकांनी त्याचा लाभ घेतला. तसेच महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या सफाई कामगार यांनीही या शिबिराचा लाभ घेतला. शिबिराची सुरुवात साई प्रतिष्ठानचे अध्यक्ष रतन मांडवे, नवनिर्वाचित नगरसेवक अभिजीत देसाई, सिद्धिविनायक केअर सेंटरचे संचालक डॉ. रविंद्र गोसावी, इंद्रधनुष्य अपार्टमेंटचे साई भक्त रमेश शिवतरकर तसेच श्री. चव्हाण व श्री. मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत दीपप्रज्वलन करुन करण्यात आली. डॉक्टर गोसावी यांनी शिबिराचे आयोजन कल्पकतेने केले होते. नागरिकांना त्यांनी विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या त्यात प्रामुख्याने साई दृष्टी आय हॉस्पिटल यांच्या तर्फे प्रदीप सर व त्यांच्या टीमने मोफत डोळे तपासणी केली व गरजूंसाठी नाममात्र दरात चष्म्यांचे वाटप करण्यात आले. मयुरेश हॉस्पिटल यांच्या मार्फत सर्व रुग्णांची मोफत रक्तदाब, शुगर व प्राथमिक तपासणी, ईसीजी तसेच फ्री कन्सल्टेशन देण्यात आले. तसेच रुग्णांसाठी माफक दरात अँजिओग्राफी व इतर वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. निओ डायग्नॉस्टिक सेंटर यांच्या तर्फे सर्व रुग्णांची मोफत CBC, कोलेस्टेरॉल व TSH तपासणी करण्यात आली. समाजाच्या आरोग्य हितासाठी भविष्यातही असे उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती डॉ. रविंद्र गोसावी यांनी दिली. साई जनसेवा प्रतिष्ठानच्या वतीने सचिन धुमाळ तसेच सिद्धिविनायक केअर सेंटरच्या डायरेक्टर सौ. अनिता रविंद्र गोसावी यांनी शिबिराच्या शेवटी सर्व वैद्यकीय टीमचे आभार मानले.


### जप्त वाहनांचा 6 मार्च रोजी जाहिर ई-लिलाव

पुणे (दैनिक संध्या) : प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वायुवेग पथकाद्वारे मोटार वाहन कायद्यातील विविध गुन्ह्यांमध्ये अटकावून ठेवलेली, मोटार वाहन कर न भरलेली तसेच हक्क सांगून सोडवून न घेतलेली एकूण ७ वाहने www.mstcindia.co.in या संकेतस्थळावर ऑनलाईन जाहिर ई-लिलावाद्वारे विक्रीस ठेवण्यात आली आहेत. ही वाहने आळंदी रस्ता कार्यालयाच्या आवारात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत पाहणीकरिता उपलब्ध आहेत. सदर ई-लिलाव रद्द अथवा तहकूब ठेवण्याचे अधिकार उप प्रादेशिक परिवहन अधिकारी तथा कराधान प्राधिकारी, पुणे यांच्याकडे राखीव आहेत.या जप्त वाहनांचा जाहिर ई-लिलाव ६ मार्च रोजी करण्यात येणार आहे. वाहन मालक, चालक, वित्तदाते किंवा ज्या कोणाचे हितसंबंध आहेत त्यांनी लिलावाच्या तारखेपूर्वी महसूल भरून किंवा हक्क सांगून वाहने सोडवून घेता येतील. लिलावानंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरली जाणार नाही, असे आवाहन कराधान प्राधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.

### जनगणनेच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय प्रशिक्षण सत्राचे आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : भारत सरकारच्या सहसंचालक जनगणना कार्य निदेशालयाच्या आदेशानुसार जनगणनेच्या अनुषंगाने घरयाद्यांबाबत जिल्हास्तरीय प्रशिक्षण ६ मार्च २०२६ पर्यंत सकाळी ९.३० ते सायंकाळी ६ या वेळेत बहुउद्देशीय सभागृह, पाचवा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे आयोजित करण्यात आले आहे. या प्रशिक्षणास जिल्ह्यातील अतिरिक्त जनगणना अधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, जनगणना महसूल सहायक, लिपीक व तांत्रिक सहायक उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा जनगणना अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांनी केले आहे.

### अर्थसंकल्प अधिवेशनामध्ये बांबू लागवडीसाठी आमदार शेखर निकम यांची ठोस मागणी




मुंबई (दैनिक संध्या) : अर्थसंकल्प अधिवेशन 2025-26 मध्ये आमदार शेखर निकम यांनी बांबू लागवडीबाबत अत्यंत महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला. आसाम राज्याच्या धर्तीवर सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) मध्ये किमान 10% बांबू उत्पादन आरक्षित करण्याचे धोरण, शासकीय फर्निचरमध्ये 10% बांबूचा अनिवार्य वापर, तसेच CRZ क्षेत्रातील हॉटेल व्यवसायात बांबूचा सक्तीने समावेश करण्याची मागणी त्यांनी केली. त्यांनी स्पष्ट केले की कोकणासाठी बांबू लागवड ही "वरदान" ठरू शकते-एकेक शेतकरी कोट्यवधींचे उत्पन्न मिळवू शकतो. मात्र राज्यात सक्षम नर्सरी व्यवस्था नसल्याने शेतकऱ्यांना महागडी रोपे घ्यावी लागतात, याकडेही त्यांनी लक्ष वेधले. यावर उत्तर देताना मंत्री गणेश नाईक यांनी सांगितले की राज्य शासन बांबू लागवडीसाठी शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात अनुदान देत आहे-टिश्यू कल्चर रोपे, लागवड व देखभाल अनुदान अशा विविध योजनांद्वारे प्रोत्साहन दिले जात आहे. तसेच कृषी, पर्यावरण आणि वन विभागामार्फत कोकणातही याला चालना देण्याचे आश्वासन देण्यात आले. बांबू म्हणजे पर्यावरणपूरक उत्पन्नाचा मजबूत आधार योग्य धोरण आणि शासकीय पाठबळ मिळाल्यास कोकणातील शेतकऱ्यांसाठी ही सुवर्णसंधी ठरू शकते.

### भारतात स्पॅम संरक्षण वाढवण्यासाठी एअरटेल आणि गुगलचा सहयोग

■ भारतात एआय-सक्षम, अधिक सुरक्षित समृद्ध मेसेजिंग अनुभवाचा प्रारंभ

मुंबई (दैनिक संध्या) : भारतातील अग्रगण्य दूरसंचार सेवा प्रदात्यांपैकी एक असणाऱ्या भारती एअरटेल आणि गूगल यांनी भारतातील लाखो वापरकर्त्यांना सुरक्षित आणि आकर्षक मेसेजिंग अनुभव देण्यासाठी सहयोगात काम करण्याची घोषणा केली आहे. एअरटेलची नेटवर्क इंटेलिजन्स आणि गूगलच्या रिच कम्युनिकेशन्स सर्व्हिसेस (आरसीएस) प्लॅटफॉर्म तसेच स्पॅम फिल्टरिंग यांचा संगम करून, वापरकर्त्यांना उच्च-गुणवत्तेचे फोटो/व्हिडिओ आणि मेसेज रिॲक्शन्ससारख्या परस्परसंवादी वैशिष्ट्यांसह आरसीएस मेसेजिंगचा अनुभव मिळेल. त्याचबरोबर, सुधारित संरक्षणामुळे मोबाईल स्पॅम आणि डिजिटल फसवणूक लक्षणीयरीत्या कमी होण्यास मदत होईल. मागील दीड वर्षात, एअरटेलने कॉल्स आणि संदेशांमधून ग्राहकांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने उद्योगातील पहिल्या एआय-सक्षम उपक्रमांच्या मालिकेद्वारे भारतातील स्पॅम आणि डिजिटल फसवणुकीविरुद्धच्या लढ्याचे नेतृत्व केले आहे. ग्राहक संरक्षणातील उत्तम कामगिरी करत, एअरटेलने आपल्या सर्व नाविन्यपूर्ण स्पॅमविरोधी उपक्रमांद्वारे आतापर्यंत तब्बल 71 अब्ज स्पॅम कॉल्स आणि 2.9 अब्ज स्पॅम एसएमएस रोखले आहेत. यामुळे त्याच्या नेटवर्कवरील आर्थिक नुकसानीच्या मूल्यात तब्बल 68.7% घट झाली आहे. तरी देखील, डिजिटल परिसंस्थेमध्ये एक महत्त्वाची सुरक्षा उणीव अद्याप कायम आहे. पारंपरिक मोबाईल नेटवर्क्स, जी मेसेजिंग सेवा देतात, ती सुरक्षा मानकांखाली आणि टेलिकॉम-स्तरीय संरक्षण व्यवस्थेसह कार्यरत असतात.

# महाराष्ट्राची क्रीडा परंपरा अधिक बळकट करण्यासाठी राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा

मुंबई (दै. संध्या)

■ राज्यस्तरीय हॉलीबॉल स्पर्धा अंबरनाथ, कबड्डी स्पर्धा नागपूर, कुस्ती स्पर्धा बीड तर खो-खो स्पर्धेचे बारामती येथे आयोजन

■ उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत निर्णय - उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

यंदाच्या छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय हॉलीबॉल स्पर्धा अंबरनाथ येथे, छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा नागपूर येथे, स्वर्गीय खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा बीड येथे तसेच कै. भाई नेरुरकर चषक राज्यस्तरीय खो-खो स्पर्धा बारामती येथे आयोजित करण्याचा निर्णय आज घेण्यात आला. उपमुख्यमंत्री तथा क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

सन २०२५-२६ या वर्षात विविध राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाबाबत सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे उपमुख्यमंत्री तथा क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी क्रीडा विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, क्रीडा व युवक कल्याण विभागाच्या आयुक्त शीतल तेली-उगले यांच्यासह कबड्डी, कुस्ती, हॉलीबॉल व खो-खो या खेळांच्या संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, राज्यातील क्रीडा संस्कृतीला चालना देण्यासाठी आणि युवा खेळाडूंना व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी विविध राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. राज्यातील क्रीडा क्षेत्र सक्षम करण्यासाठी अशा स्पर्धांचे आयोजन अत्यंत महत्त्वाचे आहे. ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंना समान संधी मिळावी, त्यांना दर्जेदार सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि राष्ट्रीयस्तरावर चमक दाखविण्यासाठी आवश्यक व्यासपीठ मिळावे, यासाठी शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

राज्यस्तरीय स्पर्धांमुळे नवोदित खेळाडूंना आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळणार असून क्रीडा क्षेत्रात स्पर्धात्मक वातावरण निर्माण होईल. यामुळे महाराष्ट्राची समृद्ध क्रीडा परंपरा अधिक बळकट होऊन राज्याला भविष्यात अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू मिळतील, असा विश्वास उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी व्यक्त केला.



## शिरूर तालुक्यामध्ये पीसीपीएनडीटी कायद्याअंतर्गत कारवाई

पुणे (दै. संध्या)

गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा १९९४ (पीसीपीएनडीटी) कायद्याअंतर्गत जिल्ह्यातील शिरुर तालुक्यातील ढोकसांगवी अंतर्गत पाचंगेवस्ती येथील लाइफ केअर रुग्णालयामध्ये गर्भलिंग निदान चाचणी होत असल्याच्या पार्श्वभुमीवर आरोग्य विभाग व गुन्हे शाखेच्या संयुक्त पथकाने धडक कारवाई केली. प्राप्त माहितीच्या आधारे करण्यात आलेल्या कारवाईत बी.ए.एम. एस शिक्षण घेतलेले डॉ. आकाश मालगुंडे यांच्या रुग्णालयामध्ये पीसीपीएनडीटी कायद्याचे उल्लंघन झाल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले. वाघोली पोलीस स्टेशनच्या पोलीस शिपाई प्रतीक्षा पानसरे यांनी रुग्णासोबत जाऊन प्रत्यक्ष सापळा रचला. दलाल नरेंद्र ठाकरे, रा. केसनंद, ता. हवेली, जि. पुणे याच्या मार्फत मोबाईल ॲपच्या सहाय्याने विविध रुग्णांची गर्भलिंग निदान तपासणी केल्याचे संयुक्त तपासात




उघड झाले. तपासणीदरम्यान रुग्णालयात गर्भपातासाठी वापरण्यात येणाऱ्या गोळ्यांचा साठा आढळून आला असून संबंधित साहित्य जप्त करण्यात आले आहे. पीसीपीएनडीटी कायद्यानुसार गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असून संबंधितांवर कारवाई करण्यात येणार आहे. आरोग्य सेवा, पुणे मंडळाचे उपसंचालक डॉ.भगवान पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच गुन्हे शाखेच्या पथक क्रमांक ७ चे सहायक पोलीस आयुक्त राजेंद्र मुळीक तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई यांच्या कारवाई करण्यात आली. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागनाथ यमपल्ले, ग्रामीण रुग्णालय शिरूरचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन धस यांच्या उपस्थितीत संयुक्त तपासणी करण्यात आली.

## मुघलकालीन स्वयंपाकघरांपासून प्रेरित 'सुहाना नूर' मसाला श्रेणीचे सादरीकरण

पुणे (दै. संध्या)

भारतातील वेगाने विकसित होत असलेल्या मसाले आणि फूड सोल्युशन्स क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी प्रविण मसालेवाले यांनी आपल्या उत्पादन पोर्टफोलिओचा विस्तार करत 'सुहाना नूर' या नवीन मिश्र मसाल्यांच्या श्रेणीचे सादरीकरण केले आहे. पारंपरिक मुघलाई पाककृतींचा अस्सल स्वाद घरच्या घरी अनुभवता यावा, या उद्देशाने ही मसाल्यांची विशेष श्रेणी विकसित करण्यात आली आहे.

भारतीय पाककलेचा इतिहास हजारो वर्षांचा असून विविध संस्कृतींच्या प्रभावातून ती अधिक समृद्ध होत गेली आहे. पर्शियन आणि पाश्चिमात्य आशियाई प्रभावांमधून विकसित झालेली मुघलाई पाककला आज भारतीय खाद्यसंस्कृतीचा अविभाज्य भाग बनली आहे. कोरमा, टिक्का, कबाब तसेच बिर्याणीच्या विविध प्रकारांमध्ये मुघलाई शैलीचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो.

मुघलाई पाककलेची खासियत म्हणजे संथ शिजवण्याची पद्धत आणि मसाल्यांचे अचूक मिश्रण. या पारंपरिक पद्धतींमुळे पदार्थांचा




गहिरा आणि समृद्ध स्वाद खुलून येतो. याच पार्श्वभूमीवर विकसित करण्यात आलेली 'सुहाना नूर' श्रेणी ग्राहकांना घरच्या घरी मुघलाई पदार्थ सहजपणे तयार करता यावेत आणि तरीही त्यांचा पारंपरिक स्वाद कायम राहावा, यासाठी तयार करण्यात आली आहे.

या श्रेणीत बिर्याणी, ग्रेव्ही आणि स्टार्टरसाठी खास मसाला मिश्रणांचा समावेश आहे. त्यामध्ये शाही बिर्याणी मसाला, बॉम्बे बिर्याणी मसाला, सिंधी बिर्याणी मसाला, चिकन कोरमा मसाला, मटण कोरमा मसाला, कडाही मसाला, आचार गोश्त मसाला, दालचा/दाल गोश्त मसाला, निहारी मसाला, शामी कबाब मसाला आणि सीख कबाब मसाला यांचा समावेश आहे.

मुघलकालीन स्वयंपाकघरांच्या परंपरेतून प्रेरणा घेत कंपनीच्या संशोधन आणि विकास (R&D) टीमने दोन वर्षांहून अधिक काळ सखोल अभ्यास करून ही मसाला मिश्रणे तयार केली आहेत. या प्रक्रियेत मुघलाई इतिहासाचा अभ्यास, प्रादेशिक स्वयंपाक पद्धतींचे विश्लेषण तसेच तज्ज्ञांचा सल्ला घेण्यात आला. काही मसाला मिश्रणांमध्ये पारंपरिक चव अधिक खुलवण्यासाठी सुकवलेल्या आलुबुखाऱ्यासारख्या वैशिष्ट्यपूर्ण घटकांचाही समावेश करण्यात आला आहे.

याबाबत प्रतिक्रिया देताना कंपनीचे स्ट्रॅटेजी, मार्केटिंग आणि फायनान्स संचालक विशाल चोरडिया म्हणाले, "सुहाना ब्रँडद्वारे आम्ही नेहमीच स्थानिक चवींना अनुसरून उत्पादने विकसित करण्यावर भर दिला आहे. घरच्या घरी मांसाहारी पदार्थ बनवण्याचे प्रमाण वाढत असताना विशिष्ट पाककलेनुसार तयार केलेल्या मसाला मिश्रणांची मागणीही वाढत आहे. 'सुहाना नूर'च्या माध्यमातून मुघलाई पाककृती घरच्या घरी सहज आणि अस्सल चवीसह तयार करता याव्यात, हा आमचा प्रयत्न आहे."

सध्या ही श्रेणी निवडक बाजारपेठांमध्ये जनरल ट्रेड आणि मॉडर्न रिटेल आउटलेट्समध्ये टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून देण्यात येत असून प्रमुख ई-कॉमर्स आणि क्विक-कॉमर्स प्लॅटफॉर्म्सवरही ती उपलब्ध आहे. पुढील काही महिन्यांत या उत्पादनांचे वितरण अधिक व्यापक पातळीवर विस्तारण्याची कंपनीची योजना आहे.

प्रविण मसालेवाले ही रेडी-टू-कूक मसाला मिश्रणांच्या क्षेत्रातील अग्रणी कंपनी असून देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये ४० हून अधिक उत्पादनांची श्रेणी ती उपलब्ध करून देते. कंपनीच्या ब्रँड पोर्टफोलिओमध्ये सुहाना, अंबारी आणि सर्वम या ब्रँड्ससह प्रविण हा प्रमुख लोणच्यांचा ब्रँड समाविष्ट आहे.

## विनोदी, विडंबन कविसंमेलनातील हास्यरंगात श्रोते चिंब



पिंपरी (दै. संध्या)

'जीवनात हास्यविनोद खूप महत्त्वाचा असतो. तो आपले दुःख दूर करीत नसला तरी सुसह्य नक्कीच करतो!' असे विचार प्रसिद्ध हास्यकवी भालचंद्र कोळपकर यांनी मंगळवार, दिनांक ०३ मार्च २०२६ रोजी तीर्थस्वरूप ज्येष्ठ नागरिक संघ, पेठ क्रमांक २९, रावेत येथे नवयुग साहित्य व शैक्षणिक मंडळ आणि तीर्थस्वरूप ज्येष्ठ नागरिक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने होलिकात्सव आणि धूलिवंदनाचे औचित्य साधून

आयोजित केलेल्या 'रंगात रंगुनी साऱ्या...' या विनोदी, विडंबन कविसंमेलनात अध्यक्षीय मनोगतातून व्यक्त केले. याप्रसंगी पिंपरी - चिंचवड महापालिका विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, ज्येष्ठ साहित्यिक आणि कामगारनेते अरुण बोऱ्हाडे, नवयुगचे अध्यक्ष राज अहेरराव, उपाध्यक्ष प्रा. तुकाराम पाटील, उपाध्यक्ष राजेंद्र घावटे, सचिव माधुरी ओक, तीर्थस्वरूप ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव शिरीष कुंभार यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पिंपरी - चिंचवड महानगरपालिकेतविरोधी पक्षनेतेपदी निवड झाल्याप्रीत्यर्थ नवयुगच्या वतीने आणि अरुण बोऱ्हाडे यांच्या हस्ते भाऊसाहेब भोईर यांचा सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना भोईर यांनी, 'जीवनात खूप आघात सोसले; मात्र कला आणि साहित्य क्षेत्राने मला जगायला शिकवले. आता पालिकेच्या माध्यमातून शहरातील साहित्यिक अन् कलाकार यांच्यासाठी खूप काम करायचे आहे!' अशी ग्वाही दिली. त्यापूर्वी राज अहेरराव यांनी,

गेली नऊ वर्षे आर्थिकदृष्ट्या दुर्बल साहित्यिकांची १०० पुस्तके पिंपरी - चिंचवड महापालिकेने विकत घ्यावी किंवा त्यांच्या पुस्तक प्रकाशनासाठी रुपये १५०००/- (रुपये पंधरा हजार) सानुग्रह अनुदान देण्यात यावे, ही मागणी करत आलो आहोत. या वेळी ही मागणी पूर्ण होईल ही आशा आहे!' अशी भूमिका मनोगतातून मांडली. राजेंद्र घावटे यांनी प्रास्ताविकातून चौतीस वर्षांपासून कार्यरत असलेल्या नवयुग साहित्य व शैक्षणिक मंडळाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

## बांधकाम कामगार साहित्य वाटपात गैरव्यवहार : विजय वडेट्टीवार

मुंबई (दै. संध्या)

राज्यातील अमरावती, यवतमाळ जिल्ह्यात बांधकाम कामगारांना गृहउपयोगी साहित्याचे वाटप करताना उडालेला गोंधळ आणि कामगार विभागातील गैरव्यवहार आणि विशेषतः एका अधिकाऱ्याला मिळत असलेली नियमबाह्य मुदतवाढ यावर लक्षवेधीच्या मुद्द्यावरून विजय वडेट्टीवार आणि विरोधकांनी सरकारला धारेवर धरले. कामगारांचे साहित्य वाटप याबाबतच्या लक्षवेधी सुचनेच्या माध्यमातून विजय वडेट्टीवार यांनी प्रश्न उपस्थित करत सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार आणि केंद्राच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार कामगार विभागाला असे साहित्य वाटप करण्याचे अधिकार आहेत का? हा निधी बांधकाम कामगारांचा असून त्याचा विनियोग योग्य पद्धतीने होत नसल्याचे त्यांनी सांगितले. यवतमाळच्या पुसद आणि दारव्हा येथे साहित्य घेण्यासाठी कामगारांची प्रचंड झुंबड उडाली होती. ५० हजार कामगार नोंदणीकृत असताना केवळ ३ हजार लोकांना ऑनलाइन वेळ देण्यात आली, ज्यामुळे व्यवस्थेचे वाभाडे निघाले. अधिकारी विवेक कुंभार यांच्यावर प्रचंड कमिशनखोरी आणि गैरव्यवहाराचे आरोप करत, त्यांचा कार्यकाळ संपूनही त्यांना दोन-दोन वर्षे मुदतवाढ कोणाच्या आशिर्वादाने मिळत आहे, असा प्रश्न वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

# "एस्थेटिक मेडिसिन आणि कौशल्य विकास क्षेत्रातील लीडर" सन्मान

मुंबई (दै. संध्या)

प्रतिष्ठित अॅडव्हांटेज विदर्भ 2026 शिखर परिषदेत स्किनटिलेटिंग (Skintillatingg) आणि क्रोमोकोस्मो इन्स्टिट्यूट ऑफ एस्थेटिक्स, ट्रायकॉलॉजी अँड न्यूट्रिशन (CIATN) यांच्या संस्थापक डॉ.अक्षया जैन यांना "एस्थेटिक मेडिसिन आणि कौशल्य विकास क्षेत्रातील लीडर" हा मानाचा किताब प्रदान करण्यात आला. केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला असून, एस्थेटिक मेडिसिन आणि संरचित व्यावसायिक प्रशिक्षण क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेण्यात आली.

अॅडव्हांटेज विदर्भ 2026 हे उद्योजकता, नवोन्मेष आणि विविध क्षेत्रांतील नेतृत्वाचा गौरव करणारे महत्त्वाचे व्यासपीठ ठरले. धोरणनिर्माते, उद्योगतज्ज्ञ आणि मान्यवरांच्या उपस्थितीत डॉ. जैन यांचे कार्य विशेषत्वाने अधोरेखित



झाले—ज्यात क्लिनिकल उत्कृष्टता आणि कौशल्य विकास या दोन्ही क्षेत्रांतील प्रभाव स्पष्ट दिसून आला.

कॉस्मेटिक आणि एस्थेटिक मेडिसिन क्षेत्रातील 12 वर्षांहून अधिक अनुभवासह डॉ. जैन यांनी पुण्यातील विश्वासार्ह एस्थेटिक कॉस्मेटोलॉजिस्ट म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या 'स्किनटिलेटिंग' क्लिनिकमार्फत त्वचा आणि केसांच्या उपचारांमध्ये प्रगत तंत्रज्ञानाधारित सेवा दिल्या जातात. अँटी-एजिंग, स्किन रीजुव्हनेशन, हेअर रिस्टोरेशन आणि विविध एस्थेटिक उपचारांमध्ये आधुनिक लेसर तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. नैसर्गिक परिणाम आणि नैतिक वैद्यकीय पद्धती यांना विशेष प्राधान्य दिले जाते.

एस्थेटिक्स आणि वेलनेस क्षेत्रातील संरचित शिक्षणाची वाढती गरज ओळखून डॉ. जैन यांनी क्रोमोकोस्मो इन्स्टिट्यूट ऑफ एस्थेटिक्स, ट्रायकॉलॉजी अँड न्यूट्रिशन (CIATN) ची स्थापना केली. 'स्किल इंडिया', कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय, भारत सरकार यांच्या अंतर्गत नोंदणीकृत असलेले CIATN हे एस्थेटिक मेडिसिन, ट्रायकॉलॉजी आणि क्लिनिकल न्यूट्रिशन या क्षेत्रांतील प्रमाणित आणि नियमसंगत शिक्षण देणारे केंद्र म्हणून ओळखले जाते. संस्थेच्या अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, CIATN येथे डॉक्टर आणि नॉन-डॉक्टर दोघांसाठीही अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. एस्थेटिक्स आणि वेलनेस क्षेत्रात करिअर घडवू इच्छिणाऱ्या, अतिरिक्त उत्पन्नाचे स्रोत निर्माण करू इच्छिणाऱ्या किंवा उद्योजक बनू इच्छिणाऱ्या महिला व पुरुष उमेदवारांसाठी हे अभ्यासक्रम खुले आहेत. ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही पद्धतींमध्ये प्रशिक्षण दिले जाते. प्रत्यक्ष क्लिनिकल सेटअपमध्ये पर्यवेक्षणाखाली प्रात्यक्षिक प्रशिक्षण देऊन विद्यार्थ्यांना वास्तव अनुभव प्रदान केला जातो. अभ्यासक्रमानुसार पात्रतेची निकष वेगवेगळे असून किमान शैक्षणिक पात्रता आवश्यक आहे. प्रवेश प्रक्रिया, अभ्यासक्रमाची रचना आणि पात्रतेबाबत सविस्तर माहितीसाठी इच्छुक उमेदवारांनी संस्थेशी थेट संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. शैक्षणिक प्रशिक्षणाबरोबरच CIATN कडून इंटर्नशिप, प्लेसमेंट सहाय्य आणि व्यवसाय उभारणीसाठी मार्गदर्शन देखील दिले जाते. पदवीधरांना एस्थेटिक क्लिनिक, डर्मोटोलॉजी केंद्रे, हेअर रिस्टोरेशन सुविधा, वेलनेस क्लिनिक येथे नोकरीच्या संधी उपलब्ध होऊ शकतात किंवा ते स्वतंत्र व्यवसाय सुरू करू शकतात. उद्योग निरीक्षकांच्या मते, सरकारी मानकांशी सुसंगत असलेले संरचित कौशल्य प्रशिक्षण रोजगारक्षमतेत आणि व्यावसायिक विश्वासार्हतेत लक्षणीय वाढ घडवून आणते, विशेषतः एस्थेटिक मेडिसिनसारख्या उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये. CIATN सारख्या संस्था भारतातील आरोग्य आणि वेलनेस क्षेत्रातील नियमबद्ध व कौशल्याधारित शिक्षणाच्या वाढत्या प्रवाहाचे प्रतीक आहेत.

अॅडव्हांटेज विदर्भ 2026 मध्ये "एस्थेटिक मेडिसिन आणि कौशल्य विकास क्षेत्रातील लीडर" हा पुरस्कार मिळणे हे डॉ. जैन यांच्या व्यावसायिक प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे. हा सन्मान त्यांच्या क्लिनिकल कौशल्यासोबतच कुशल व्यावसायिक घडवण्याच्या आणि एस्थेटिक्स उद्योगातील मानदंड उंचावण्याच्या त्यांच्या बांधिलकीचीही दखल घेतो. CIATN च्या आगामी बॅचेससाठी प्रवेश प्रक्रिया सध्या सुरू असून, निवडक अभ्यासक्रमांसाठी मर्यादित कालावधीसाठी विशेष लाभ जाहीर करण्यात आले आहेत. एस्थेटिक मेडिसिन आणि वेलनेस क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या इच्छुकांसाठी ही सुवर्णसंधी असल्याचे संस्थेकडून सांगण्यात आले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### प्रशासकीय भवन येथे स्वच्छता मोहिम संपन्न

■ कार्यालयीन परिसरात स्वच्छता राखण्याचे उपविभागीय अधिकाऱ्यांचे आवाहन

बारामती (दैनिक संध्या) : उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर यांच्या उपस्थितीत प्रशासकीय भवन येथे स्वच्छता मोहिम आयोजित करण्यात आली. यावेळी कार्यालय प्रमुखाने कार्यालयासोबत परिसर स्वच्छ राहील याबाबत दक्षता घ्यावी, प्रशासकीय भवन परिसरात पाण्याच्या बाटल्या, चहाचे कागदी कप आदी वस्तू टाकू नये, असे आवाहन श्री. नावडकर यांनी केले. यावेळी उप विभागीय व तहसील कार्यालयाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### सोनालिकाची फेब्रुवारीमधील 12,890 ट्रॅक्टरची आजवरची सर्वाधिक विक्री



■ शेतकऱ्यांच्या विश्वासाच्या ३० वर्षांच्या पूर्तीचा आनंदोत्सव साजरा

पुणे (दैनिक संध्या) : कृषी यांत्रिकीकरणाच्या राष्ट्र उभारणीच्या स्वतःच्या ऐतिहासिक ३० व्या वर्षात सोनालिका ट्रॅक्टरने आपल्या प्रवासात एका नवीन सोनेरी अध्यायाची भर घातली आहे. कंपनीने आर्थिक वर्ष २०२६ मध्ये फेब्रुवारीमध्ये आतापर्यंतची सर्वाधिक १२,८९० ट्रॅक्टर विक्री नोंदविली आहे. ही नवीन ऐतिहासिक कामगिरी म्हणजे तिच्या व्यापक पातळीवरील दमदार कार्यान्वयनाची जोरदार पुष्टी असून 'जीतने का दम' (विजयाचा विश्वास) देण्याच्या सोनालिकाच्या मूळ विश्वासाचे मूर्त स्वरूप आहे. हा विश्वास म्हणजे शेतकऱ्यांना उज्ज्वल भविष्याचे आश्वासन देणारे तिचे अंतर्भूत सामर्थ्य आहे. अचूकतायुक्त शेती आणि प्रगत कृषी-तंत्रज्ञान सर्व प्रदेशांमध्ये वाढत आहे. अशा वेळेस स्पर्धेमध्ये पुढे राहण्यासाठी सोनालिका उत्पादन नाविन्यपूर्णतेचा सखोल शेतकरी सहभाग आणि बाजारपेठेतील गतिमान संपर्क यांच्याशी संयोग घडवून आणत आहे. भारताचे कृषी क्षेत्र एका निर्णायक टप्प्यातून जात आहे. समर्थ धोरणात्मक पाठबळ, डिजिटल उपक्रमांद्वारे झपाट्याने यांत्रिकीकरण, कर्जाची सुलभ उपलब्धता तसेच शेती उत्पादकता आणि उत्पन्न वाढवण्याच्या उद्देशाने ग्रामीण पायाभूत सुविधांवर खर्च वाढला आहे. सोनालिकाने अलीकडेच लॉंच केलेल्या सोनालिका गोल्ड मालिकेसारखे भविष्यानुकूल ट्रॅक्टर विकसित करून जागतिक अभियांत्रिकी उत्कृष्टतेला सातत्याने चालना दिली आहे. ते तळागाळातील शेतीच्या वास्तविकतेशी सुसंगत असून सोन्यासारखी भविष्यातील सुरक्षितता आणि शेतकऱ्यांसाठी दीर्घकालीन मूल्य निर्मितीची ते हमी देतात. शाश्वत शेतीसाठी यांत्रिकीकरण ही केवळ एक गरज नव्हे तर अधिक काही आहे, असे सोनालिकाचे मत आहे. भारतीय शेतकऱ्यांसाठी दीर्घकालीन विकासाचा भागीदार म्हणून आपली भूमिका अधिक मजबूत करण्यासाठी ती कायमच संलग्न, गतिमान आणि महत्त्वाकांक्षी आहे.

### पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत चाचणीचे आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : पोलीस अधिक्षक यांच्या आस्थापनेवरील रिक्त पोलीस शिपाई चालक पदाच्या भरतीकरीता अर्जदारांची वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी ५ व ६ मार्च, २०२६ रोजी मे. आयडीटीआर येथे होणारी चाचणी रद्द करण्यात आली आहे. तरी प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवडमार्फत मे. आयडीटीआर येथे ५ व ०६ मार्च २०२६ रोजी होणाऱ्या वाहन चालक चाचणी ह्या सकाळच्या सत्रात नेहमीप्रमाणे सुरू राहणार आहे, अशी माहिती पिंपरी चिंचवडचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये दिली आहे.

### मंचर नगरपंचायतीत हजेरीशिवाय कारभार; मुख्याधिकाऱ्यांची अचानक तपासणी

मंचर (दैनिक संध्या) : मंचर - मंचर (ता. आंबेगाव) नगरपंचायतीत कार्यरत काही अधिकारी व कर्मचारी हजेरीपत्रकावर स्वाक्षरी न करता तसेच गैरहजर असताना रजेचा अर्ज देत नसल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. अतिरिक्त मुख्याधिकारी अंबादास गरकळ यांनी अचानक भेट देत केलेल्या तपासणीत हा प्रकार समोर आला.

## महिला दिनानिमित्त ‘उजास’च्या महाराष्ट्रातील उत्पादन नेटवर्कचा विस्तार

**महिलांच्या नेतृत्वाखालील उपजीविकेच्या संधींना देणार बळकटी**

पुणे (दै. संध्या)

आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या अंतर्गत अद्वैतेशा बिर्ला यांनी स्थापन केलेल्या 'उजास' या संस्थेने महिलांच्या नेतृत्वाखालील उत्पादन नेटवर्कचा विस्तार केला आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण उपजीविका अभियानाच्या सहकार्याने वर्धा येथे नवीन 'उजास ग्रीन मॅन्युफॅक्चरिंग युनिट' सुरू करून हा विस्तार करण्यात आला आहे. महिला दिन जवळ येत असल्याचे औचित्य साधणारा हा उपक्रम स्केलेबल ग्रासरूट एंटरप्राइझ मॉडेल्सद्वारे महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्याला चालना देण्याच्या 'उजास'च्या कटिबद्धतेला बळकटी देणारा आहे. ही भर पडल्यामुळे 'उजास' आता महाराष्ट्रात दोन 'उजास' ग्रीन मॅन्युफॅक्चरिंग युनिट्स चालवत असून ती एकत्रितपणे ४५ स्वयंसेवा गटांतील महिलांना रोजगार पुरवत आहे. तसेच विदर्भ आणि मराठवाडा प्रदेशातील सुमारे १,५०० अतिरिक्त महिलांसाठी उपजीविकेच्या संधी निर्माण करत आहे. जालना येथील पूर्वीच्या युनिटने दोन वर्षांत १,११,१२५ पुनर्वापरयोग्य कापडी पॅड तयार करून उत्कृष्ट फलनिष्पत्ती दाखवली आहे. तसेच स्थानिक आर्थिक सहभागाला शाश्वत चालना देणारा म्हणून समुदाय-चालित उत्पादनाला सुस्थापित केले आहे. जालन्यातील युनिटने स्थानिक पातळीवर आणि संभाजीनगर, नांदेड, परभणी, बीड आणि बुलढाणा यांसारख्या शेजारच्या जिल्ह्यांमध्ये कापडी पॅडचे यशस्वीरित्या वितरण केले आहे. तसेच 'उजास' मेन्स्ट्रुअल हेल्थ एक्सप्रेस मोहिमेद्वारे महाराष्ट्र आणि संपूर्ण भारतात आपली व्याप्ती वाढविली आहे. या मोहिमेमुळे २५ राज्ये आणि १२१ शहरांमध्ये मोफत पॅडचे वितरण सुलभ झाले आहे. त्यामुळे जागरूकता, सुलभता आणि व्याप्ती लक्षणीयरीत्या वाढली आहे. 'उजास'च्या प्रमुख पूनम पाटकर म्हणाल्या, “'उजास' ग्रीन मॅन्युफॅक्चरिंग युनिटची रचना कटिंग आणि स्टिचिंगपासून ते गुणवत्ता नियंत्रण, पॅकेजिंग, मार्केटिंग आणि विक्री समन्वयापर्यंत पूर्णपणे महिलांच्या व्यवस्थापनाखाली असलेली उत्पादन परिसंस्था म्हणून करण्यात आली आहे. आमच्या जालना युनिटच्या कामगिरीकडे पाहता प्रत्येक सहभागी महिला कौशल्य आणि उत्पादनानुसार सुमारे ७५,००० रुपयांचे स्थिर वार्षिक उत्पन्न मिळवू शकते, त्यामुळे तिच्या कुटुंबासाठी अपेक्षित आर्थिक आधार मिळतो तर प्रत्येक बचत गटाला सामूहिकरीत्या शाश्वत उद्यमी उत्पन्नाचा फायदा होतो. उत्पादनाव्यतिरिक्त महिलांना आर्थिक साक्षरता, स्वच्छता मानके आणि व्यवसाय प्रक्रियांचे प्रशिक्षण दिले जाते, जेणेकरून त्या स्वतंत्रपणे युनिटचे व्यवस्थापन आणि विस्तार करू शकतील. हा केवळ रोजगार नाही - ही उपजीविकेची सुरचित मालकी असून ती आत्मविश्वास, कौशल्ये आणि दीर्घकालीन आर्थिक सुरक्षितता निर्माण करते.” या नवीन सुविधेतून दरवर्षी ५५,००० हून अधिक पुनर्वापरयोग्य कापडी पॅडचे उत्पादन होण्याचा अंदाज आहे. त्यातून महिलांच्या नेतृत्वाखालील उत्पादन केंद्रांचे 'उजास'च्या वाढणारे नेटवर्क आणखी मजबूत होईल. सक्रिय स्वयंसेवा गट परिसंस्था असलेले प्रदेश उद्योगनिर्मितीच्या जोडीने उत्पन्न निर्माण करणारे स्थानिक पातळीवरचे व्यवस्थापन असलेले उद्योग कसे उभारू शकतात आणि त्याच वेळेस आवश्यक आरोग्य गरजा पूर्ण करू शकतात, हे या उपक्रमातून दिसून येते. उद्योगनिर्मितीच्या जोडीलाच सहभागी महिला त्यांच्या समुदायांमध्ये मासिक पाळीच्या माहितीपूर्ण आरोग्य पद्धतींना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यातील प्रवाद कमी करण्यासाठी जागरूकता सत्रांचे नेतृत्व करतात.'उजास' ग्रीन क्लॉथ पॅड पुन्हा वापरता येण्याजोगे आणि रसायनमुक्त असून ते मासिक पाळीतील कचरा कमी करून आणि पर्यावरणीयदृष्ट्या जबाबदार वापराला आधार देऊन डिस्पोजेबल उत्पादनांना परवडणारा पर्याय देतात.



हा विस्तार म्हणजे महाराष्ट्राच्या तळागाळातील महिलांद्वारे संचालित उद्यमांना पाठबळ देण्याच्या 'उजास'च्या मिशनचे पुढचे पाऊल आहे. उपजीविकेची निर्मिती, उद्यमशीलता आणि समुदायांच्या नेतृत्वाखालील विकासासाठी ते नवीन वाटा तयार करत आहे.

## एअरबीएनबीकडून २०२६ एअरबीएनबी कम्युनिटी फंडसोबत आठ भारतीय ना नफा संस्थांना केली मदत



पुणे (दै. संध्या)

एअरबीएनबीने आज एअरबीएनबी कम्युनिटी फंड देणग्या देण्यात आलेल्या नवीन संस्थांची घोषणा केली असून त्यात समुदायांमध्ये अर्थपूर्ण बदल घडवणाऱ्या भारतभरातील आठ ना-नफा संस्थांचा समावेश आहे. एअरबीएनबी कम्युनिटी फंडची स्थापना २०२० मध्ये झाली असून हा १०० दशलक्ष डॉलर्सचा उपक्रम आहे. त्यातून स्थानिक समुदायांना आणि रहिवाशांना मदत केली जाते. यंदा एअरबीएनबीने जगभरातील समुदायांना बळकट करण्यासाठी कार्यरत संस्थांना पाठिंबा देत जागतिक स्तरावरील ना-नफा संस्थांना सुमारे १० दशलक्ष डॉलर्सच्या देणग्या दिल्या. एअरबीएनबी यजमान आपल्या समाजाशी जोडले गेलेले आहेत आणि दरवर्षी आम्ही यजमान समुदायाशी महत्त्वपूर्ण समस्या समजून घेऊन देणग्या मिळवणाऱ्या अनेक ना-नफा संस्थांचा गौरव करण्यासाठी अभिमानाने भागीदारी करतो. जागतिक स्तरावर यजमान सल्लागार मंडळाच्या सदस्यांनी यंदाच्या देणग्यांसाठी आर्थिक सक्षमीकरण, शाश्वत आणि ग्रामीण पर्यटन, पर्यावरणीय शाश्वतता व गैरवर्तन आणि शोषण समाप्ती यावर लक्ष केंद्रित करण्यात मदत केली. त्यांनी त्यांच्या प्रदेशातील नामांकनांचाही आढावा घेतला आणि प्रत्येक निर्णयात योगदान दिले. एअरबीएनबी कम्युनिटी फंडचे वितरण भारतातील देणग्या मिळवणाऱ्या ना-नफा संस्था खालीलप्रमाणे आहेतः गुंज, समुदायाच्या नेतृत्वाखालील विकासाला पाठिंबा देणे आणि शहरी आणि ग्रामीण भारतात सन्मानाने उपजीविकेचे सक्षमीकरण करणे.

## कांद्याने केला वांदा, कांद्याला योग्य बाजारभाव नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात



पुरंदर (दै. संध्या)

कांद्याने वांदा केला असून, कांदा उत्पादक शेतकरी चिंतेत आहेत.कांदा हा नाशवंत माल असल्यामुळे कांद्याचे दर कधीही स्थिर नसतात. कधी खाणाऱ्यांच्या डोळ्यात पाणी आणतो तर कधी पिकविणाऱ्यांच्या. राज्यात सध्या कांद्याला योग्य बाजारभाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.उत्पादन खर्च वाढत असताना बाजारात कांद्याचे दर घसरले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना किमान उत्पादन खर्चही निघत नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. खते, बियाणे, औषधे, मजुरी आणि वाहतूक खर्च मोठ्या प्रमाणावर वाढला आहे.मात्र बाजारात कांद्याला अपेक्षित दर मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांवर सोसायट्यांचे कर्ज, बँकांचे पीककर्ज तसेच खासगी सावकारांची देणी फेडणे कठीण झाले आहे. शासनाने तातडीने हस्तक्षेप करून कांद्याला हमीभाव द्यावा, निर्यात धोरण सुलभ करावे आणि कर्जमाफीचा निर्णय घ्यावा, अशी मागणी शेतकरी करत आहेत.

## सासवडसह जेजुरी परिसरात धर्माधिकारी प्रतिष्ठानचे महास्वच्छता अभियान

सासवड (दै. संध्या)

महाराष्ट्र भूषण डॉ. नारायण विष्णू तथा नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दी प्रीत्यर्थ एक स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. पद्मश्री महाराष्ट्र भूषण डॉ. दत्तात्रय नारायण तथा आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या प्रेरणेने आणि डॉ. सचिन धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार, डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान (रेवदंडा, ता. अलिबाग) यांच्या वतीने पुरंदर तालुक्यातील सासवड, जेजुरी तसेच हवेली तालुक्यातील लोणी काळभोर आणि भेकराईनगर परिसरात 'महास्वच्छता अभियान' मोठ्या उत्साहात राबविण्यात आले.

सासवडसह इतर ठिकाणी सकाळी साडेसात पासून या अभियानाला सुरुवात झाली. यामध्ये सासवड परिसरातील शासकीय कार्यालये आणि रस्ते चकाचक करण्यात आले. प्रतिष्ठानच्या एकूण ५२५ श्रीसदस्यांनी अत्यंत शिस्तबद्ध



### ३३ टन कचरा संकलित

पद्धतीने या श्रमदानात सहभाग नोंदवला. एकाच वेळी हे अभियान राबवून स्वच्छतेचा संदेश देण्यात आला.

या महास्वच्छता अभियानामध्ये दिवसभरात एकूण २४ टन सुका कचरा आणि ९ टन ओला कचरा, असा एकूण ३३ टन कचरा संकलित करण्यात आला. हा कचरा वाहून नेण्यासाठी एकूण ११ ट्रॅक्टर व ट्रॉलींचा वापर करण्यात आला. या अभियानांतर्गत एकूण ४ लाख १७ हजार चौरस फूटांहून अधिक परिसर आणि अडीच किलोमीटर लांबीचा रस्ता स्वच्छ करण्यात आला.

सासवड शहरातील पुरंदर पंचायत समिती कार्यालय (३५ हजार चौरस फूट), पशुवैद्यकीय दवाखाना (२५ हजार चौरस फूट), नवीन प्रशासकीय कार्यालय (१५ हजार चौरस फूट), महावितरण कार्यालय (१५ हजार चौरस फूट) परीसरातील स्वच्छतेबरोबरच जेजुरी नाका ते महावितरण पर्यंतच्या रस्त्याची स्वच्छता प्रतिष्ठानच्या श्रीसदस्यांनी केल्याची माहिती प्रतिष्ठानकडून देण्यात आली.

# मुळा-मुठा नदी प्रदूषणाविरोधात ‘एमआयटी’च्या विद्यार्थ्यांचा एल्गार

**नदीपात्रात अवैध कचरा टाकण्याविरोधात विद्यापीठ प्रवेशद्वारावर आंदोलन; आगी व विषारी धुरामुळे आरोग्य धोक्यात**



लोणी-काळभोर (दै. संध्या)

पुणे शहराची जीवनवाहिनी असणाऱ्या मुळा-मुठा नदीपात्रात कुठलीही प्रक्रिया न करता अवैधरित्या टाकण्यात येणारा कचरा त्वरित बंद करावा, या मागणीसाठी एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ (एडीटी) शैक्षणिक संकुलातील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी बुधवारी विद्यापीठाच्या प्रवेशद्वारावर तीव्र निदर्शने केली.

या आंदोलनात शैक्षणिक संकुलातील एमआयटी विश्वशांती गुरुकुल, एमआयटी ज्युनिअर महाविद्यालय व एमआयटी एडीटी विद्यापीठातील हजारो विद्यार्थी व निवासी कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. यावेळी सर्वांनी या विषयाची गंभीरता, भविष्यातील संभाव्य धोके, मुळा-मुठा नदीचे अस्तित्व, परिसरातील पर्यावरणाबाबत स्थानिक ग्रामपंचायतींची उदासीनता तसेच स्थानिक व जिल्हा प्रशासनाकडून या अत्यंत गंभीर प्रश्नाकडे होणारे अक्षम्य दुर्लक्ष यांच्या विरोधात तीव्र घोषणाबाजी केली. तसेच विद्यार्थ्यांनी विद्यापीठ प्रशासनाला नदीत कुठलीही प्रक्रिया न करता दररोज टाकला जाणारा ३५ ते ४० ट्रॅक्टर कचरा तातडीने थांबविण्याची तसेच विद्यापीठाच्या प्रवेशद्वारावरच सदर वाहने आडविण्याची विनंती केली. यावेळी विद्यार्थ्यांनी विद्यापीठ प्रशासनासह स्थानिक पोलिसांनाही याबाबत पत्र दिले.

नुकतीच नदीपात्रात टाकण्यात येणाऱ्या कचऱ्यांच्या ढिगाऱ्यांना २६ फेब्रुवारी २०२६ रोजी भयंकर आग लागली, जी पुढील तब्बल चार दिवस धुमसत राहिली. त्यामुळे परिसरात प्रचंड विषारी धुराचे लोट पाहायला मिळाले. यामुळे २७ फेब्रुवारी रोजी एमआयटी एडीटी शैक्षणिक संकुलातील ६–७ विद्यार्थ्यांना श्वास घेण्यास त्रास होऊन गुदमरल्याने त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात भरती करावे लागले. या आगीमुळे व धुरामुळे शैक्षणिक संकुलातील विद्यार्थी, स्थायी कर्मचारी व परिसरातील नागरिकांना श्वसनाचा गंभीर त्रास झाला. नदीपात्रात टाकलेल्या कचऱ्याला लागलेली आग पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा (पीएमआरडीए) एकमेव बंब आणि एमआयटी एडीटी विद्यापीठातील २५–३० कर्मचाऱ्यांनी पाच दिवस प्रयत्नांची पराकाष्ठा करून मंगळवारी (२ मार्च) विझवली. मात्र लागलेल्या या आगीमुळे चार दिवस परिसरात विषारी धुराचे प्रचंड लोट जमा झाले. यामुळे वसतिगृहातील तसेच परिसरातील नागरिकांना श्वास घेण्यास त्रास होणे, डोळ्यांची जळजळ होणे, घसा बसणे इत्यादी त्रास झाला. तसेच शिक्षण संकुलातील विद्यार्थ्यांना विषारी धुरामुळे शुक्रवारी मध्यरात्री अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात भरती करावे लागले होते.

एमआयटी शैक्षणिक संकुलात सध्या राज्यासह देश-विदेशातून आलेले जवळपास २०,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यापैकी जवळपास ५,००० विद्यार्थी व १,००० कर्मचारी शैक्षणिक संकुलाच्या परिसरात वास्तव्यास आहेत. त्यामुळे, प्रशासनाने लवकरात-लवकर या गंभीर विषयाची दखल घेत, तातडीने नदीपात्रात कचरा टाकणे थांबवावे अशी, आग्रही मागणी विद्यार्थ्यांनी यावेळी केली.

मुळा-मुठा नदीपात्रात थेट टाकला जाणारा कचरा, त्याला सातत्याने लागणाऱ्या आगी, त्यातून निघणारा प्रचंड विषारी धूर आणि त्यामुळे होणारा श्वसनाचा त्रास या घटनांबाबत एमआयटी एडीटी शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट निर्माण झाली आहे. त्यातून विद्यार्थ्यांनी आज विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारावर तीव्र आंदोलन केले. या आंदोलनातून नदीपात्रात थेट टाकला जाणारा कचरा तातडीने थांबविण्यात यावा, असा ठाम सूर उमटला.

**- डॉ. महेश चोपडे,**
**कुलसचिव, एमआयटी एडीटी विद्यापीठ, लोणी-काळभोर, पुणे.**

गेल्या काही वर्षांपासून स्थानिक लोणी-काळभोर, कदमवाकवस्ती व इतर काही जवळच्या गावांकडून थेट मुळा-मुठा नदीपात्रात अवैधरित्या व कुठलीही प्रक्रिया न करता रोज तब्बल ३५ ते ४० ट्रॅक्टर कचरा टाकला जातो. नदीपात्रात आता कचऱ्याचे ढीग तयार झाले आहेत. यामुळे केवळ वायुप्रदूषणच नव्हे तर जलप्रदूषणही वाढत असून मुळा-मुठा नदीचे पाणी प्रचंड दूषित होवून जलचरांच्या अस्तित्वालाही धोका निर्माण झाला आहे. नदीपात्रातील कचऱ्यामुळे निर्माण होणारे प्रदूषण, दुर्गंधी इत्यादींमुळे पुणे शहराची तसेच महाराष्ट्राची प्रतिमाही मलीन होत आहे.

**— दादासाहेब भोसूरे, विद्यार्थी प्रतिनिधी**

पुणे शहराची जीवनवाहिनी असलेल्या मुळा-मुठा नदीपात्रात थेट कचरा टाकणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. नदीपात्रात कचऱ्याचे डोंगर उभे असून त्यास सातत्याने आग लागण्याच्या घटना घडत आहेत. त्यामुळे विषारी धुराचे लोट तयार होऊन आम्हा विद्यार्थ्यांना श्वसनाच्या समस्या जाणवत आहेत. जिल्हा प्रशासनाने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने हस्तक्षेप करावा. नदीपात्रात अवैधरित्या थेट कचरा टाकणे त्वरित थांबवावे. विद्यार्थी व परिसरातील नागरिकांच्या चांगल्या आरोग्यासाठी स्थानिक ग्रामपंचायतींच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी जिल्हा प्रशासनाने तातडीने जागा उपलब्ध करून द्यावी.

**— मुग्धा सोनवणे, विद्यार्थीनी**

मुळा-मुठा नदीच्या सानिध्यात असणारा आमचा एमआयटी एडीटी विद्यापीठाचा परिसर अतिशय निसर्गसंपन्न आहे. मात्र स्थानिक ग्रामपंचायतींकडून कुठलीही प्रक्रिया न करता टाकण्यात येणाऱ्या या कचऱ्यामुळे नदीचे पाणी अतिशय घाण झाले आहे. त्यामुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरत आहे. कचऱ्याला सातत्याने लागणाऱ्या आगींमुळे वायू प्रदूषण वाढले असून नुकतेच महाराष्ट्र प्रदूषण मंडळाकडून येथील हवेचा गुणवत्ता निर्देशांक तब्बल ३४० इतकी गंभीर नोंदविण्यात आली. या कचऱ्यामुळे परिसरातील लोकांचे आरोग्य धोक्यात आल्याने प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून कारवाई करावी.

**— अनय अहिरे, विद्यार्थी**